१०४ शतकोत्तर वाटचाल

एकमेव स्वतंत्र दैनिक
# नवाकाळ
NAVAKAL

• मुंबई, शुक्रवार १२ जून, २०२६ • वर्ष-१०४, अंक-९९, पाने-८, किंमत: ₹ ७
• R.N.I.No.1814/57 • Vol.- 104, Issue - 99 Marathi - Daily - Mumbai, 12 June, 2026 Page - 8 Price- Rs. 7/-
• संपादक- रोहित रमाकांत पांडे
24x7 : www.navakal.in Email- contact@navakal.in

नवाकाळच्या Digital बातम्या पाहण्यासाठी Scan करा!
सुनेत्रा पवारांचा विमान प्रवास पुन्हा चर्चेत!
navakal.in
@navakal.news Navakal Digital Network @_NDN_Offical @NavakalNews

## थोडक्यात...

### अमित शहा २ दिवस कोल्हापूर दौऱ्यावर

**कोल्हापूर -** केंद्रीय गृहमंत्री अमित शहा हे १९ आणि २० जून रोजी दोन दिवसांच्या कोल्हापूर दौऱ्यावर येणार आहेत. २० जून रोजी अमित शहा यांच्या हस्ते अंबाबाई विकास आराखड्यांतर्गत पूर्ण झालेल्या विविध कामांचे उद्घाटन करण्यात येणार आहे. या आराखड्याअंतर्गत सध्या सुरु असलेल्या कामांची ते प्रत्यक्ष पाहणीही करणार आहेत. अंबाबाई मंदिर परिसरातील विकासकामांचा आढावा घेतल्यानंतर अमित शहा यांची जाहीर सभा आयोजित करण्यात आली आहे. या सभेकडे भाजपा कार्यकर्ते तसेच नागरिकांचे लक्ष लागले आहे. शहा यांच्या दौऱ्यामुळे कोल्हापूरमधील राजकीय व प्रशासकीय घडामोडींना विशेष महत्त्व प्राप्त झाले असून, या भेटीमुळे स्थानिक पातळीवरील विकासकामांना वेग मिळण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

### मे महिन्याचा हप्ता बहिणींना आज मिळणार

**मुंबई -** राज्यातील 'लाडकी बहीण' योजनेच्या पात्र लाभार्थी महिलांच्या खात्यात मे महिन्याचा हप्ता उद्या म्हणजेच १२ ते १५ जूनदरम्यान बँक खात्यात जमा होणार असल्याची माहिती भाजपा आमदार मोनिका राजळे यांनी सोशल मीडियावरून दिली आहे. या हप्त्यासाठी राज्य सरकारकडून सुमारे ३४४ कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला असून, यासंदर्भातील शासन निर्णय १० जून रोजी जारी करण्यात आला आहे. सामाजिक न्याय विभागाने हा निधी महिला व बालविकास विभागाकडे वर्ग करण्यास मान्यता दिली आहे. पात्र महिलांच्या खात्यात मे महिन्याचा १५०० रुपयांचा हप्ता जमा होणार आहे.

### एसटी कर्मचाऱ्यांच्या महागाई भत्त्यात वाढ

**मुंबई -** आर्थिक संकटात सापडलेल्या राज्य एसटी महामंडळाने कर्मचाऱ्यांच्या महागाई भत्त्यात ५ टक्क्यांची वाढ केली. आज राज्याचे परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत हा निर्णय घेण्यात आला. या निर्णयामुळे एसटी कर्मचाऱ्यांचा महागाई भत्ता ५३ टक्क्यांवरून ५८ टक्के झाला आहे. प्रताप सरनाईक यांनी या बैठकीनंतर सांगितले की, या बैठकीत वेतनातील फरक, निवृत्तीवेतन व प्रलंबित भत्त्यांवरही चर्चा करण्यात आली आहे. ज्या ठिकाणी महामंडळाचे नुकसान होत आहे त्याठिकाणी एसटी सेवेला ना नफा ना तोटामध्ये कसे आणता येईल, याची खबरदारी घेतली जाणार आहे.

आज परिवहन मंत्र्यांनी ५% महागाई भत्ता जरी जाहीर केला असला तरी तब्बल दहा वर्षांची देणी बाकी आहेत. १% वेतनवाढीचा दर प्रशासनाने आज नाकारल्यामुळे कर्मचा-यांचे आतोनात नुकसान होणार आहे. घरभाडे भत्त्याचाही काहीच निर्णय झाला नाही. त्यामुळे कृती समिती आपल्या आंदोलनावर ठाम आहे.

# अजित पवारांच्या मृत्यूस कारणीभूत चार्टर विमानानेच सुनेत्रा पवारांचा प्रवास? व्हीएसआर की सीएमआर?

■ मुंबई



**उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार या दोन दिवसांपूर्वी दिल्लीतील एनडीएच्या बैठकीसाठी रवाना होत असताना त्यांच्या चार्टर विमानात अचानक तांत्रिक बिघाड झाला. उड्डाणापूर्वीच वैमानिकाच्या ही बाब लक्षात आल्याने संभाव्य अनर्थ टळला. मात्र धक्कादायक बाब अशी की, उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या मृत्यूस कारणीभूत असलेल्या व्हीएसआर कंपनीच्या चार्टर विमानानेच सुनेत्रा पवार यांनी हा प्रवास केला, अशी जोरदार चर्चा होती. मात्र, त्यानंतर असा खुलासा करण्यात आला की, संबंधित विमान व्हीएसआर कंपनीचे नसून सीएमआर कंपनीचे होते. तरीही व्हीएसआरच्या विमानानेच त्यांनी प्रवास केल्याचा दावा होत राहिल्याने त्यांचे विमान व्हीएसआर कंपनीचे होते की सीएमआरचे होते हा प्रश्न कायम राहिला आहे. ज्या कंपनीवर रोहित पवार सतत आरोप करीत आहेत त्या विमानाने सुनेत्रा पवार कशा गेल्या हा प्रश्न उपस्थित केला जात आहे.**

**९ जून रोजी** संध्याकाळी ५ वाजता सुनेत्रा पवार या खासगी विमानाने मुंबईहून दिल्लीसाठी उड्डाण करणार होत्या. मात्र, ऐनवेळी विमानात तांत्रिक बिघाड झाल्याचे वैमानिकाच्या निदर्शनास आले. या तांत्रिक बिघाडामुळे विमान तब्बल २ तास मुंबई विमानतळावरच थांबवून ठेवावे लागले. अखेर सर्व तांत्रिक बाबी तपासून आणि आवश्यक ती दुरुस्ती केल्यानंतर हे विमान दोन तास उशिराने म्हणजेच रात्री ७ वाजता दिल्लीसाठी रवाना झाले. या विमानामध्ये उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्यासोबत त्यांचे पुत्र आणि खासदार पार्थ पवार व खासदार सुनील तटकरे हेदेखील प्रवास करत होते.

बिघाड झालेले खाजगी विमान हे व्हीएसआर कंपनीचे असल्याची चर्चा सुरू झाली. मात्र काही वेळाने राष्ट्रवादी पक्षाने जाहीर केले की ते विमान 'सीएमआर' कंपनीचे होते. ते व्हीएसआर कंपनीचे नव्हते. सीएमआर ही आंध्र प्रदेशातील भाजपा खासदार सी. एम. रमेश यांच्या मालकीची कंपनी आहे. राष्ट्रवादीचा खुलासा झाल्यानंतरही त्या व्हीएसआर कंपनीच्या विमानाने गेल्याची चर्चा सुरूच राहिली.

या घटनेबद्दल माध्यमांशी बोलताना गोलमाल उत्तर देत सुप्रिया सुळे म्हणाल्या की, सुनेत्रा वहिनी खरंच व्हीएसआर विमानाने गेल्या होत्या की नाही, याची मला पूर्ण माहिती नाही. पण जर असे झाले असेल आणि विमानामध्ये तांत्रिक बिघाड झाला असेल, तर तो अत्यंत चिंताजनक विषय आहे. मी नेहमीच प्रवासाच्या साधनांच्या सुरक्षेबद्दल संसदेत सातत्याने आवाज उठवत असते. त्यामुळे मला वहिनींची आणि सोबत असलेल्यांची काळजी वाटणे स्वाभाविक आहे. व्हीएसआर कंपनीबद्दल आरोप-प्रत्यारोप होत राहतात. पण दोन-तीन मुद्दे महत्त्वाचे आहेत. सुनेत्रा वहिनी खरेच त्या विमानाने गेल्यात की नाही मला माहिती नाही. कारण पंतप्रधान मोदींनी काटकसरीचे आवाहन केलेले आहे. त्यामुळे महाराष्ट्र सरकार अजूनही खासगी विमानाने किंवा हेलिकॉप्टर प्रवासासाठी वापरते की नाही याची माहिती नाही. खासगी विमान, हेलिकॉप्टर यांच्या मेन्टेनन्ससाठी वारंवार तपासणी करणे आवश्यक » पान ७ वर

## शिंदे दिल्लीहून थेट दरे गावी दोन दिवस मुक्काम करणार



**उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे दिल्ली दौरा आटोपल्यानंतर थेट सातारा जिल्ह्यातील महाबळेश्वर तालुक्यातील त्यांच्या मूळ दरे गावी आले आहेत. मध्यरात्री साधारण अडीच वाजताच्या सुमारास ते दरेगावातील निवासस्थानी दाखल झाले. त्यांच्या या अचानक दौऱ्यामुळे राजकीय वर्तुळात चर्चांना उधाण आले आहे.**

■ सातारा

**पुढील** दोन दिवस ते येथे मुक्काम करणार असून, हा दौरा खासगी स्वरूपाचा असल्याचे सांगितले जात आहे. या मुक्कामादरम्यान शिंदे दरे आणि परिसरातील विविध विकासकामांचा आढावा घेणार आहेत. विशेषतः रस्ते, पाणीपुरवठा, नागरी सुविधा तसेच पर्यटन विकासाशी संबंधित प्रकल्पांची पाहणी ते स्वतः करणार असल्याची माहिती आहे.

दरे आणि आसपासच्या भागात समूह शेती आणि जागतिक दर्जाच्या पर्यटनाला चालना देण्यासाठी शासनातर्फे विविध प्रकल्प राबवले जात आहेत. या कामांच्या प्रगतीची पाहणीही शिंदे करणार असल्याचे बोलले जात आहे. आपल्या दौऱ्यात ते नेहमीप्रमाणे स्थानिक ग्रामस्थ आणि कार्यकर्त्यांशी संवाद साधून त्यांच्या अडीअडचणी जाणून घेणार आहेत. या दौऱ्यातून स्थानिक प्रशासकीय अधिकारीही दरे गावात उपस्थित राहणार आहेत.

राज्यात १८ जूनला होत असलेल्या विधान परिषदेच्या निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर राजकीय घडामोडी घडत असताना शिंदेंचा हा दौरा होत असल्याने त्यावरून चर्चा सुरू झाली आहे. शिंदे जेव्हा नाराज असतात, तेव्हा त्यांच्या दरे गावी जातात, असे आतापर्यंत अनेकदा दिसून आले आहे. त्यामुळे आताही शिंदे कुठल्या कारणावरून नाराज आहेत का, अशी कुजबूज सुरू आहे.

## 'कॉकरोच'चे दुसरे आंदोलनही फेल युवांच्या हातून निसटून नेत्यांच्या हातात

■ पुणे

**नीट** परीक्षेतील पेपरफुटी आणि निकालातील गोंधळाच्या विरोधात अभिजित दीपके याच्या 'कॉकरोच जनता पार्टी'ने दिल्लीनंतर आज पुण्यात आंदोलन केले. मात्र, दिल्लीप्रमाणेच पुण्यातील हे आंदोलनही अपेक्षित प्रतिसाद न मिळाल्याने अयशस्वी ठरले. या आंदोलनाला चळवळीतील काही नेत्यांनी मंचाचा कब्जा घेतल्याने हे आंदोलन युवांच्या हातून निसटून नेत्यांच्या हातात गेले आहे, अशी चर्चा होत आहे.



सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ परिसरात झालेल्या या आंदोलनाला विद्यापीठ प्रशासनाने काही अटी-शर्तींसह आंदोलनास » पान ७ वर

### पंतप्रधान मोदी- दीपकेची अमेरिकेत भेट संजय राऊत यांचा खळबळजनक दावा

कॉकरोच जनता पार्टीचे संस्थापक अभिजित दीपके आणि पंतप्रधान नरेंद्र मोदींची अमेरिकेत बैठक झाली होती. मोदींच्या भेटीनंतरच दीपके भारतात आल्याचा खळबळजनक दावा उबाठाचे खासदार संजय राऊत यांनी केला. राऊत यांच्या या दाव्याने चर्चेला उधाण आले आहे.
संजय राऊत म्हणाले की, अभिजित दीपके आणि पंतप्रधान मोदी यांची अमेरिकेत एक बैठक झाली. या बैठकीचे फोटो एकाने पाठवले आहेत. त्याच्यानंतर दीपके भारतात आला, अशी माहिती काही लोकांनी सांगितली. मी हे आरोप करत नाही, माझी माहिती लोकांनी पोहोचवलेली आहे, ती मी सांगत आहे, आम्ही त्यांच्या भूमिकेला समर्थन दिले. मात्र जेव्हा काही माहिती या सगळ्या संदर्भात » पान ७ वर

## तेलवाहू जहाजावरील अमेरिकेच्या हल्ल्यात तीन भारतीयांचा मृत्यू

■ नवी दिल्ली

**अमेरिकन** सैन्याने काल होर्मुज सामुद्रधुनीजवळ एमटी सेटबेल्लो या तेलवाहू जहाजावर केलेल्या हल्ल्यात तीन भारतीय खलाशांचा मृत्यू झाला आहे. मर्चंट नेव्ही कर्मचाऱ्यांशी संबंधित फॉरवर्ड सिमेन्स युनियन ऑफ इंडिया (एफएसयूआय) या कामगार संघटनेने ही माहिती दिली आहे. अमेरिकन नौदलाने एमटी जलवीर या तिसऱ्या जहाजावरही आज हल्ला केला. भारताने या हल्ल्याचा तीव्र शब्दांत निषेध केला आहे.

परराष्ट्र मंत्रालयाने सांगितले होते की, जहाजावरील २४ भारतीय खलाशांपैकी २१ खलाशांना सुरक्षित वाचवण्यात आले आहे. ३ भारतीय खलाशांचा मृत्यू झाला असून, त्यात एका कॅडेट आणि एका फिटरचा समावेश असून, ते हिमाचल प्रदेश, उत्तर प्रदेशातील देवरिया आणि आंध्र प्रदेशचे रहिवासी होते.

अमेरिकन लष्कराने दिलेल्या माहितीनुसार, एमटी सेटबेल्लो या पलाऊ देशाचा ध्वज असलेल्या तेलवाहू जहाजाने अमेरिकेने लागू केलेल्या सागरी » पान ७ वर

## विमान अपघात पीडितांवर दबाव रुपाणींच्या मुलीचा आरोप

■ अहमदाबाद

**गेल्या** वर्षी अहमदाबादमध्ये झालेल्या एअर इंडियाच्या विमान अपघातातील मृतांचे नातेवाईक आणि जखमी झालेल्यांनी दावा करण्याचा आपला कायदेशीर हक्क सोडावा आणि अपघाताची चौकशी पूर्ण होण्याआधीच त्यांना एकरकमी नुकसान भरपाई स्वीकारावी यासाठी कंपनी दबाव आणत आहे, असा गंभीर आरोप या अपघातात मरण पावलेले गुजरातचे माजी मुख्यमंत्री विजय रुपाणी यांच्या कन्या राधिका मिश्रा यांनी केला आहे.

राधिका यांनी टाटा सन्सचे अध्यक्ष एन चंद्रशेखरन यांच्याकडे यासंबंधी ई-मेल द्वारे तक्रार केली आहे. चंद्रशेखरन हे एअर इंडियाचेदेखील अध्यक्ष आहेत.

या अपघाताची चौकशी पूर्ण होण्याआधी अशाप्रकारे पीडितांकडून कायदेशीर हक्क सोडण्यासाठी दबाव आणणे बंद करावे, अशी मागणी राधिका मिश्रा यांनी केली आहे. अपघाताचा तपास अद्याप पूर्ण झालेला नाही. अशा परिस्थितीत एअर इंडिया पीडितांकडून कायदेशीर हक्क सोडण्यासाठी दबाव टाकत आहे. आम्हाला नुसती नुकसान भरपाई नको, आम्हाला उत्तरे हवी आहेत, तपासात पारदर्शकता हवी आहे, असे राधिका यांनी ई-मेल संदेशात म्हटले आहे.

## इथेनॉल मिश्रित पेट्रोलवरील उत्पादन शुल्क पूर्णपणे माफ

■ नवी दिल्ली

**इथेनॉल** मिश्रित पेट्रोलच्या वापराला प्रोत्साहन देण्यासाठी आणि कच्च्या तेलासाठी आयातीवरील अवलंबित्व कमी करण्यासाठी केंद्र सरकारने मोठा निर्णय घेतला आहे. केंद्र सरकारच्या ताज्या अधिसूचनेनुसार २२ ते ३० टक्के इथेनॉल असलेल्या पेट्रोलवरील उत्पादन शुल्क पूर्णपणे माफ करण्यात आले आहे. या निर्णयामुळे ई-२२, ई-२५,ई-२७ आणि ई-३० पेट्रोलवर उत्पादन शुल्क आकारले जाणार नाही. सध्या देशात वीस टक्के इथेनॉल असलेल्या ई-२० पेट्रोलच्या वापराला प्रोत्साहन दिले जात आहे. मात्र आता सरकारने २२ ते ३० टक्के इथेनॉल असलेल्या पेट्रोलच्या वापराचाही मार्ग मोकळा केला आहे. पेट्रोलमध्ये इथेनॉलचे प्रमाण ३० टक्क्यांपर्यंत वाढवणे हे सरकारचे दीर्घकालीन उद्दिष्ट आहे. या दिशेने पाऊल पुढे टाकत भारतीय मानक ब्युरोने (बीआयएस) उच्च इथेनॉल मिश्रीत पेट्रोलसाठी नवीन गुणवत्ता आणि सुरक्षा निकष जाहीर केले आहेत.

## वाढदिवसाला राज्यभर वृक्षारोपण करा मनसैनिकांना राज ठाकरेंचे आवाहन

■ मुंबई

**महाराष्ट्र** नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांचा १४ जून रोजी वाढदिवस असून दरवर्षीप्रमाणे यंदाही मनसैनिकांमध्ये मोठा उत्साह आहे. पण वाढदिवसाच्या दिवशी आपण मुंबईत नसल्याने कार्यकर्त्यांना प्रत्यक्ष भेटणे शक्य होणार नसल्याची माहिती राज ठाकरे यांनी एक्सवर पोस्टद्वारे दिली आहे. त्याचबरोबर वाढदिवस होर्डिंग, फलक आणि जल्लोषाऐवजी राज्यभर वृक्षारोपण आणि लोकोपयोगी उपक्रमांद्वारे साजरा करण्याचे आवाहन त्यांनी केले आहे.

राज ठाकरे यांनी पोस्टमध्ये



म्हटले की, १४ जून या माझ्या वाढदिवसाच्या दिवशी गेली अनेक वर्षे तुम्ही सगळे जण मला उत्साहाने भेटायला येतात. पण यावर्षी मी माझ्या वाढदिवसाच्या दिवशी मुंबईत नसल्यामुळे तुमची भेट होऊ शकणार नाही. पण माझी तुम्हा सगळ्यांना विनंती आहे की, माझा वाढदिवस लोकोपयोगी

सविस्तर वाचण्यासाठी व शेअर करण्यासाठी हा क्युआर कोड स्कॅन करा

उपक्रमातून साजरा करा. शुभेच्छांची होर्डिंग लावून, शहरंच्या शहरं रंगवण्याच्या ऐवजी हा वाढदिवस जरा वेगळ्या पद्धतीने तुम्ही साजरा करावा. यावर्षी १४ जूनला राज्यभर » पान ७ वर

## वरळी हिट अँड रन प्रकरणी मिहीरसह ड्रायव्हरवर सदोष मनुष्यवधाचा आरोप

■ मुंबई

**२०२४ च्या** वरळीतील हिट अँड रन प्रकरणी मुख्य आरोपी मिहीर शहा व त्याचा वाहन चालक राजऋषी बिडवत यांच्यावर सत्र न्यायालयाने काल सदोष मनुष्यवधाचा आरोप निश्चित केला. त्यामुळे या खटल्यावर सुनावणीचा मार्ग मोकळा झाला आहे. मिहीरचे वडील राजेश शहा यांनी दाखल केलेला मिहीरला दोषमुक्त करण्याचा अर्जही न्यायालयाने फेटाळून लावला.

७ जुलै २०२४ रोजी मिहीर शहाच्या बीएमडब्ल्यू गाडीने एका दुचाकीला जोरदार धडक दिली. या अपघातात दुचाकी चालवत असलेले प्रदीप नाखवा हे गंभीररित्या जखमी झाले. तर त्यांच्या पत्नी कावेरी यांचा जागीच मृत्यू झाला. अपघातात कावेरी गाडीच्या पुढचा टायर आणि मडगार्ड यांच्यामध्ये अडकल्या होत्या. त्याच स्थितीत मिहीरने त्यांना साधारण दीड किलोमीटरपर्यंत फरफटत नेले. त्यात त्यांचा मृत्यू झाला. अपघात झाला तेव्हा मिहीरचा चालक गाडीत होता. त्याला त्याच दिवशी अटक करण्यात आली. मात्र मिहीर अपघातानंतर फरार झाला होता. दोन दिवसांनंतर ९ जुलै रोजी त्याला अटक करण्यात आली होती. अपघातानंतर प्रदीप नाखवा यांनी जखमी अवस्थेतही उठून उभे राहत अपघात घडवणारी सफेद रंगाची बीएमडब्ल्यू गाडी आणि तिचा नंबर नोंद करून ठेवला होता.

## प्रसिद्ध एस कुमार कंपनीची कोटींची बँक फसवणूक
### बंगला जप्त

**ईडी इंदूर विभागाने एस कुमार या प्रसिद्ध कापड उद्योग कंपनीच्या बँक फसवणूक प्रकरणात रायगड जिल्ह्यातील मुरूड येथे समुद्रकिनाऱ्यालगत असलेली ६० कोटी रुपयांपेक्षा अधिक किमतीची मालमत्ता जप्त केली आहे. ही मालमत्ता एस. कुमार नेशनवाईड लिमिटेड मधून दुसरीकडे वळवण्यात आलेल्या निधीतून खरेदी करण्यात असली असून, मालमत्तेचे लाभार्थी मालक एस. कुमारचे माजी अध्यक्ष आणि व्यवस्थापकीय संचालक नितीन शंभूकुमार कासलीवाल आल्याचा आरोप ईडीने केला आहे.**

■ मुंबई

**एकेकाळी** भारतातील वस्त्रोद्योग व परिधान क्षेत्रातील आघाडीची कंपनी असलेल्या एस. कुमार्स नेशनवाईड लिमिटेडकडे रीड



अँड टेलर सारखे प्रसिद्ध ब्रँड होते. कंपनीने विविध व्यावसायिक बँकांच्या समूहाकडून मोठ्या प्रमाणात कर्जसुविधा घेतल्या होत्या. ईडीच्या मनी लाँड्रिंग तपासानुसार, कंपनीने घेतलेला निधी संबंधित कंपन्या व संस्थांमधून वळवण्यात आला, ज्यामुळे कर्ज देणाऱ्या बँकांना सुमारे १४०० कोटीं रुपयांचे नुकसान झाले. ईडीचा आरोप आहे की, कासलीवाल यांनी स्वतःच्या व कुटुंबियांच्या नियंत्रणाखालील परस्परसंबंधित कंपन्या व संस्थांच्या माध्यमातून एस. कुमार नेशनवाईड लिमिटेडला मिळालेल्या कर्जाचा निधी वळवला. तपास यंत्रणांच्या मते, हा निधी मंजूर करण्यात आलेल्या उद्देशांऐवजी इतर कारणांसाठी वापरण्यात आला व त्यातील काही हिस्सा मुरूडमधील ही आलिशान मालमत्ता खरेदी करण्यासाठी वापरण्यात आला. विविध बँकांनी एस. कुमार नेशनवाईड लिमिटेडला कर्ज मंजूर केले.

## एल्गार परिषद आरोपींचा जामीन रद्द करण्याची एनआयएची मागणी

■ मुंबई

**एल्गार** परिषद प्रकरणीच्या खटल्यात आरोपी वर्नन गोन्साल्वीस आणि अरुण फरेरा यांनी अटींचा भंग केल्याने त्यांना दिलेला जामीन रद्द करावा, अशी मागणी राष्ट्रीय तपास संस्थेने (एनआयए) विशेष न्यायालयाकडे केली आहे.

याच मुद्यावर एनआयएने गेल्या महिन्यात या खटल्यातील अन्य आरोपी सुधा भारद्वाज आणि सामाजिक कार्यकर्ते वरवरा राव यांचा जामीन रद्द करण्याची मागणी केली होती. वर्नन गोन्साल्वीस, अरुण फरेरा, सुधा भारद्वाज आणि वरवरा राव हे चौघेही १९ जानेवारी रोजी मुंबईतील प्रेस क्लबच्या टेरेसवर आयोजित करण्यात आलेल्या बैठकीला उपस्थित होते. बंदी घालण्यात आलेल्या माओवादी कम्युनिस्ट पार्टीचा अजेंडा पुढे रेटण्याच्या उद्देशाने या बैठकीचे आयोजन करण्यात आले होते, असा एनआयएचा आरोप आहे. न्यायालयाने जामीन मंजूर करताना आरोपींनी खटल्याशी संबंधित कोणत्याही व्यक्तीशी संपर्क साधता कामा नये, अशी अट घातली होती. त्या अटीचा या चार आरोपींनी भंग केला आहे. त्यामुळे त्यांना दिलेला जामीन रद्द करावा, असे एनआयएचे म्हणणे आहे.

नवाकाळ
Email- contact@navakal.in www.navakal.in /navakalofficial

# छोट्या जाहिराती

संपर्क करा
८४२२८१७४४५/८१०८११६४२३

## पाहिजेत

पेशंटकेअरसाठी आया, बाई, पुरुष त्वरित पाहिजेत. संपर्कः **9321205984** {NC260803}

बालाजी पेस्ट कंट्रोल कंपनीसाठी टेक्निशियन पाहिजेत पगार 18000/- कांदिवली पश्चिमः **9769723507** {NC260851}

इंटरनॅशनल शाळेमध्ये मीरारोडयेथे सफाई कर्मचारी बाई/पुरुष पाहिजेतः **8169862708/ 9004949778** {NC260879}

भांडूप येथे सीडी मशीनसाठी फिडरमन, बॉयलर, पंचिंग ऑपरेटर, बाईंडर पाहिजे. संपर्कः **9820930362/ 9930589715** {NC260801}

परेल येथे ऑफीससाठी फ्रेशर्स ऑफिस असिस्टंट आणि मार्केटिंगसाठी पाहिजेत. **9920053121** {NC260857}

मालाड वेस्ट येथे इमिटेशन ज्वेलरी कामासाठी मुली/महिला पाहिजेत. **9987577655** {NC260871}

ऑफिस कामांसाठी मुलीची आवश्यकता आहे. डोंबिवली वेस्ट संपर्क **8369864046** {NC260885}

अंधेरी (पश्चिम) मधील प्रसिद्ध हॉटेलसाठी मोरीवाला / हेल्पर त्वरीत पाहिजेत. पगार 15 हजारपासून (राहण्याची - जेवणाची सोय) ओळखपत्र, फोटो, बायोडेटासह भेटाः ''सत्कार राईसप्लेट हाऊस'', G4, तळमजला, मोरया क्लासिक इन्फीनिटी मॉलशेजारी, ग्लान्झ फॅब्रिक स्टोअरजवळ, ओशिवरा लिंक रोड, अंधेरी (पश्चिम). **7738395357 / 9867271372** {NC260834}

## पाहिजेत

इमिटेशन ज्वेलरीच्या कामासाठी मुलगी पाहिजे आकर्षक पगार (मालाड वेस्ट)- **9136731541** {NC260790}

मालाड- सराऑगी हॉस्पिटलमध्ये बाई आणि नर्स पाहिजेत. पगार अनुभवानुसार.- **9372179410/8169717250/ 8850941620** {NC260796}

बँक जॉबसाठी मुला, मुलींची भरती. पगार 18800/- ते 35000/- **8788968016** {NC260858}

पाहिजेत महिला डेन्टल असिस्टंट/ रिसेप्शनिस्ट आणि ड्रायव्हर- डॉ. कर्वेज डेन्टेक ठाणे पश्चिम. (ठाणे, मुलुंड, कळवा राहणाऱ्यांना प्राधान्य) संपर्कः **8779790919** (संपर्क वेळ दुपारी 12.00 - सायंकाळी 7.00 फक्त) ईमेलः adentech7@gmail.com {NC260869}

कंपनीसाठी ड्रायव्हर पाहिजेतः भांडुप आणि भिवंडी निवासी फक्त. पगारः- २२,००० ते २५,००० रुपये प्रति महिना. OT, PF, अपघात विमा अनेक सवलती. वेळः- सकाळी ९ ते संध्याकाळी ७ (रविवारी सुट्टी), शिक्षणः १०वी, 'टी' परमिट असणे अनिवार्य. संपर्कः + **91 9867395432** {NC260880}

DTP ऑपरेटर्स व ऑफीस कामासाठी Tally चे ज्ञान आवश्यक महिला, पुरुष तसेच पुरुष हेल्पर्स पाहिजेत त्वरीत संपर्क- विजय मोहन आर्ट, शिव मार्केट, ११ वी गल्ली, अंबरनाथ (पश्चिम) भ्रमणध्वनी **9890506901** {NC260888}

मुंबई सबर्बमध्ये दुकानात फिरून ऑर्डर घेण्यासाठी सेल्समन पाहिजे. **9362222222** {NC260808}

## पाहिजेत

मुंबई आणि इगतपुरीकरिता इलेक्ट्रिशियन, हेल्पर पाहिजेत. राहण्याची खाण्याची सोय. मोबाईल- **9220848134/ 9820432190** {NC260864}

24 तास घरकामासाठी बाई पाहिजे. मालाड (प.) मोबाईल- **9987662220** {NC260847}

कुरीअर पिकअपबॉय जोगेश्वरीत हवे आहेत कामाची वेळ दुपारी 1 ते 10 पगार 18000+ गाडीभाडे. संपर्कः **8828350396** {NC260848}

सानपाडा स्टेशन आणि बेलापूर जवळ तातडीने DTP व डिझायनिंग ऑपरेटरची आवश्यकता आहे, संपर्कः **9322987465/ 9920887465** {NC260855}

फेलिसिटा चॉकलेट्स मुलुंड, हेल्पर/पॅकींग/ ऑफीस स्टाफ महिला पाहिजे **8080998658** {NC260859}

ठाणेमध्ये हॉटेलसाठी मोरीवाले, सफाई कामगार वॉचमन पाहिजेत. संपर्क : **9867789369** {NC260891}

भायखळा/ माझगांव विभागात कुरियर डिलीव्हरीसाठी कमिशन/ पगारावर मुले पाहिजे. (Daily payment) **7208841538** {NC260886}

कर्जत स्टेशनपासून अर्धा KM अंतरावर डॉक्टर दाम्पत्यास २४ तास सोबत राहणारी घरकामासाठी बाई पाहिजे. पगार 12000 ते 15,000 भोजन+ निवास मोफत आधारकार्ड आवश्यक. संपर्क- डॉ. अरुणः **9322176080** व्हाट्सअॅपः **9769252629** {NC260887}

चर्चगेट, दहिसर चेकनाका येथे हाऊसकिपिंगसाठी अनुभवी मुले पाहिजेत. पगार- 14500/- PF/ ESIC, बोनस **9820219764/ 8591074394** {NC260889}

ड्रायव्हर पाहिजे, कंपनीच्या ऑफीससाठी, कायमस्वरुपी, सर्व फायद्यांसहीत. उत्तम वेतन. 30,000. संपर्क. **9324804788** {NC260890}

जोगेश्वरी, अंधेरी पूर्वमध्ये जेन्ट्स आणि लेडीज पाहिजेत सिक्युरिटीगार्ड आणि लिफ्टमेन पगार १८००० ते २००००/- सिक्युरिटी सुपरवायझर पगार २२००० ते २४०००/- वयाची अट 25 वर्ष ते 55 वर्ष १२ तास ड्युटी. संपर्कः **8779843308 / 9820661640**. {NC260892}

## वधु वर मेळावा

वधु वर मेळावा, शिबीर सर्वजाती, मुलींना फ्रि, कल्याण- **9869868620** {NC260820}

## Situation Vacant

**A Chemical Factory at Vasai East- Urgently requires 1) Male Graduate (in any discipline) to manage & coordinate day-to-day factory activities 2) Helpers (12th studied). Salary negotiable for both post. Candidates can contact on mobile- 9321630032/ 9321630011. {NC260838}**

PEON REQUIRED - ARYAN COLLEGE Jogalekarwadi, BMC School Building, Sion (E), Mumbai - 22 Contact: **24073599/ 9082654282** {NC260854}

## शैक्षणिक

हमखास पासाची गॅरंटी खर्डीकर क्लासेस. ७वी नापास? डायरेक्ट १०वी. ११वी नापास? डायरेक्ट १२वी. डोंबिवलीः **9820627580 / 9820904646** {NC260552}

**वाचकांना सूचना**

दैनिक 'नवाकाळ' वर्तमानपत्रात प्रसिद्ध झालेल्या जाहिरातींच्या सत्यतेबाबत दैनिक 'नवाकाळ'ची कोणतीही जबाबदारी नाही. वाचकांनी स्वतः पडताळणी करून स्वतःच्या जबाबदारीने निर्णय घ्यायचा आहे, याची नोंद घ्यावी.
**- मॅनेजर, 'नवाकाळ'**

# एक एकर जमीन मोफत घ्या पण शिवरायांचा पुतळा उभारा

**शेतकऱ्याची सरकारकडे मागणी**

■ धाराशिव

**महाराष्ट्र** शासनाच्या महत्त्वाकांक्षी शक्तिपीठ महामार्ग प्रकल्पाला राज्यभरातील अनेक शेतकरी आणि विविध संघटनांकडून जमीन संपादनाच्या मुद्यावरून विरोध होत असताना धाराशिव जिल्ह्यातील एका शेतकऱ्याने वेगळीच भूमिका घेतली आहे. चिखली येथील शेतकरी धनंजय तांबे यांनी या महामार्गासाठी स्वतःची एक एकर जमीन मोफत देण्याची तयारी दर्शवली असून, त्याबदल्यात महामार्गावर छत्रपती शिवाजी महाराजांचा भव्य पुतळा उभारण्याची मागणी केली आहे.

शक्तिपीठ महामार्गासाठी धनंजय तांबे यांची दोन एकरांहून अधिक जमीन संपादित होणार आहे. या भूसंपादनाबाबत आपली भूमिका स्पष्ट करताना त्यांनी सांगितले की, आपल्या जमिनीपैकी एका एकर जमिनीचा जो काही मोबदला मिळेल, तो संपूर्ण पैसा शासनाला परत करण्यास आपण तयार आहोत. त्याबदल्यात शासनाने तुळजापूर-कळंब मार्गावर छत्रपती शिवाजी महाराजांचा भव्य आणि देखणा पुतळा उभारावा. शिवरायांचे विचार आणि कार्य पुढील पिढ्यांपर्यंत पोहोचावे. तसेच महामार्गावरून प्रवास करणाऱ्या नागरिकांना प्रेरणा मिळावी.

# गोदावरी नदीतील बोट सेवा बंद दुर्घटनेनंतर प्रशासनाचा निर्णय

■ बीड

**बीड** जिल्ह्यातील पुरुषोत्तमपुरी येथे गोदावरी नदी पात्रात काल झालेल्या बोट दुर्घटनेनंतर प्रशासनाने बोट सेवा बंद ठेवण्याचा निर्णय घेतला आहे. अधिक मासाचे पाच दिवस शिल्लक असल्याने कोणतीही अनुचित घटना घडू नये, यासाठी नदीतील सर्व बोटी बंद ठेवण्याचे आदेश देण्यात आले आहेत.

अधिक मासानिमित्त पुरुषोत्तमपुरी येथे राज्यभरातून मोठ्या संख्येने भाविक दर्शनासाठी व गोदावरी स्नानासाठी येतात. नदीच्या एका तीरावरून दुसऱ्या तीरावर जाण्यासाठी बोटींची व्यवस्था असते. मात्र, बोटीत क्षमतेपेक्षा जास्त म्हणजे तब्बल ४० ते ५० भाविकांना बसवण्यात आल्याने काल दुर्घटना झाल्याचा आरोप बचावलेल्या एका महिलेने केला होता. या घटनेत दोन महिलांचा दुर्दैवी मृत्यू झाला असून, एक महिला गंभीर जखमी आहे. तिच्यावर सध्या खासगी रुग्णालयात उपचार सुरू आहेत. यापूर्वीही प्रशासनाने बोट चालकांना नियमांचे पालन करण्याबाबत नोटिसा दिल्या होत्या. मात्र, तरीही बोट मालक व चालकांकडून नियमांचे उल्लंघन होत नाही. आता प्रशासनाने कठोर भूमिका घेत बोटींची वाहतूक तात्पुरती बंद केली आहे.

# काशिदच्या समुद्रात बुडून जळगावच्या तरुणाचा मृत्यू

■ रायगड

**जिल्ह्यातील** मुरुड तालुक्यातील काशीद समुद्रात जळगाव जिल्ह्यातील २५ वर्षीय तरुणाचा समुद्रात बुडून मृत्यू झाला,तर दुसऱ्या तरुणाला लाईफगार्ड आणि पोलिसांनी सुखरूप बाहेर काढून जीवदान दिले. या घटनेतील मृत तरुणाचे नाव अमीन मजीद शेख (२५) असे आहे.

जळगाव जिल्ह्यातील एरंडोल तालुक्यातील इम्रान अन्वर खान (३७), अमीन मजीद शेख (२५) आणि मलिक नजीर शेख (२१) हे तिघेजण ताडपत्री विक्रीच्या व्यवसायानिमित्त काशीद व मुरुड परिसरात आले होते. कामानिमित्त आलेले हे तिघे मोकळ्या वेळेत काशीद बीचवर फिरण्यासाठी गेले होते. यावेळी समुद्रात पोहण्यासाठी उतरलेल्या अमीन शेख आणि मलिक शेख यांना पाण्याचा अंदाज न आल्याने ते खोल पाण्यात बुडू लागले.

या घटनेची माहिती मिळताच मुरुड पोलीस ठाण्याचे पोलीस कर्मचारी रोटकर, तसेच लाईफगार्ड मयुरेश बालकावडे आणि अरफाज सौदागर यांनी तातडीने बचावकार्य सुरू केले. त्यांनी मलिक शेख याला सुखरूप बाहेर काढले. त्याला हॉस्पिटलमध्ये दाखल केले. मात्र अमीन शेख याला वाचविण्यात यश आले नाही. त्याचा पाण्यात बुडून मृत्यू झाला.

# भाईंदरच्या उत्तन भागात जिवंत तोफगोळा सापडला

■ भाईंदर

**भाईंदर** पश्चिमेकडील उत्तन परिसरात जिवंत तोफगोळा आढळल्याने खळबळ उडाली आहे. राष्ट्रीय सुरक्षा दलाने विशेष तांत्रिक प्रक्रियेद्वारे हा तोफगोळा निकामी करण्यात यश मिळवले. भाईंदर पश्चिमेकडील उत्तन येथील समुद्रकिनारी जमिनीत गाडलेला एक संशयास्पद धातूचा गोळा नागरिकांना आढळून आला. त्याची माहिती नागरिकांनी त्वरीत पोलिसांना दिली. ती वस्तू स्फोटक सामग्री असण्याची शक्यता होती. त्यामुळे पोलिसांनी राष्ट्रीय सुरक्षा दलाला (एनएसजीशी) पाचारण केले. एनएसजीच्या पथकाने परिसर सील केला. त्यानंतर विशेष तांत्रिक प्रक्रियेद्वारे सदर तोफगोळा निकामी करण्यात आला. तपासादरम्यान ही सामग्री स्फोट न झालेला दारुगोळा असल्याचे स्पष्ट झाले.

# गीतेंची माघार की दबावाचे राजकारण? नाशिकच्या राजकारणात चर्चेला उधाण

■ नाशिक

**नाशिक** विधान परिषद निवडणुकीत महायुतीत निर्माण झालेल्या राजकीय तणावावर अखेर पडदा पडला आहे. भाजपाचे बंडखोर उमेदवार गोकुळ गीते यांनी आपली भूमिका मागे घेत शिंदे गटाचे उमेदवार नरेंद्र दराडे यांना पाठिंबा जाहीर केला आहे. अशी माहिती राज्याचे मंत्री गिरीश महाजन यांनी महायुतीच्या संयुक्त पत्रकार परिषदेत दिली. महायुतीच्या प्रमुख पदाधिकाऱ्यांच्या उपस्थितीत झालेल्या पत्रकार परिषदेत गोकुळ गीते आणि नरेंद्र दराडे हे दोघेही एकत्र उपस्थित होते.

गोकुळ गीते यांच्या या माघारीनंतर राजकीय वर्तुळात नव्या चर्चांना उधाण आले आहे. गीते यांचे बंधू गणेश गीते यांना नाशिक म्हाडा प्रकरणात उच्च न्यायालयाने अटकपूर्व जामीन मंजूर केला आहे. त्यानंतर राज्य सरकारच्या कायदेशीर सल्लागार सहसचिवांनी अतिरिक्त सरकारी वकिलांना पत्र पाठवून या जामिनाविरोधात सर्वोच्च न्यायालयात दाद मागण्याबाबत सूचना केल्याची माहिती आहे. या घडामोडींमुळे गोकुळ गीते यांनी महायुतीतील वरिष्ठ नेत्यांच्या मनधरणीनंतर माघार घेतली, अशी चर्चा होत आहे. गोकुळ गीते यांच्या बंडखोरीमुळे महायुतीसमोर मोठे संकट उभे राहिले होते. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यासोबत मुंबईत चर्चा झाल्यानंतर मंत्री गिरीश महाजन, उदय सामंत आणि दादा भुसे यांनी नाशिकमध्ये गीते बंधूंच्या निवासस्थानी जाऊन त्यांची भेट घेतली. यावेळी नरेंद्र दराडे यांच्या उपस्थितीत बंद दाराआड झालेल्या बैठकीत गोकुळ गीते यांनी आपली नाराजी स्पष्टपणे व्यक्त केली होती. त्यानंतर मंत्र्यांनी त्यांची समजूत काढली. भविष्यात कोणतीही वादग्रस्त वक्तव्ये होणार नाहीत, याबाबतही दराडे यांना सूचना देण्यात आल्याचे सांगितले जाते.




# पुरुषांच्या मृतदेहांवर बोलताना महिला डॉक्टरची जीभ घसरली

**प्रणित मोरेचा शो पुन्हा वादात**

■ मुंबई

**स्टँडअप** कॉमेडियन प्रणित मोरे पुन्हा एकदा वादाच्या भोवऱ्यात अडकला आहे. या शोमध्ये एका डॉक्टरने मृतदेहांवर केलेल्या वादग्रस्त विधानांमुळे सोशल मीडियावर संताप व्यक्त केला जात आहे. '३७० रुपयांची बिर्याणी' प्रकरणावरून प्रणित मोरेचा शो आधीच वादात सापडला आहे. त्यावरून टीका होत असतानाच आता त्याच शोमधील आणखी एक व्हिडिओ व्हायरल झाला आहे. या नव्या व्हिडिओमध्ये सेजल पवार नावाची डॉक्टर तरुणी पुरुष मृतदेहांच्या खासगी अवयवांबाबत विनोद करताना दिसते. मेडिकल रूममध्ये मित्रमैत्रिणींमध्ये अशा प्रकारचे विनोद केले जात असल्याचे ती सांगते. यावर प्रणित मोरेही हसत तिला आणखी प्रश्न विचारताना दिसतो.

'तुम्ही खऱ्या डॉक्टर आहात की कसाई?' असा सवाल तो करताना ऐकू येतो. हा व्हिडिओ व्हायरल होताच सोशल मीडियावर संतापाची लाट उसळली आहे. देहदानासारख्या उदात्त कृतीचा अपमान होत असल्याची भावना अनेकांनी व्यक्त केली आहे. काहींनी या प्रकरणात प्रणित मोरेला जबाबदार धरत त्याच्यावर कारवाईची मागणी केली आहे.

दरम्यान, वाढत्या टीकेनंतर प्रणीत मोरे आणि सेजल पवारने माफी मागितली. मात्र प्रणीत, सेजल आणि हिमांशू जांगडा यांच्यावर सायबर पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे.

# जळगावातून रेश्मा काळे निवडणूक लढण्यावर ठाम

■ जळगाव

**नाशिकमध्ये** अपक्ष उमेदवार गोकुळ गीते यांनी माघार घेत महायुतीचे उमेदवार संजय पवार यांना पाठिंबा दिला. मात्र जळगावमध्ये शिंदे गटाच्या बंडखोर उमेदवार रेश्मा काळे यांनी निवडणूक लढवण्याची ठाम भूमिका घेतली आहे.

महायुतीचे अधिकृत उमेदवार असतानाही रेश्मा काळे यांनी अपक्ष उमेदवारी दाखल केल्याने मतविभाजनाची शक्यता निर्माण झाली आहे. माझ्या माघारीबाबत चर्चा सुरू असल्या तरी सध्या मी निवडणूक लढणारच, असे स्पष्ट करत काळे यांनी माघार घेण्यास नकार दिला आहे. दरम्यान, त्यांच्या समर्थनार्थ काही पदाधिकारी सक्रिय झाले आहेत. शिंदे गटाच्या नेत्या सरिता माळी-कोल्हे यांनी भाजपाचे काही नगरसेवक आमच्या संपर्कात आहेत, असा दावा केल्याने चर्चांना उधाण आले आहे. यामुळे जळगाव विधान परिषद निवडणूक अधिक चुरशीची होण्याची शक्यता आहे.

# आजचे राशी भविष्य

शुक्रवार ता. १२ जून २०२६
ज्योतिष पंडीत शिरीष प्रभू

| | |
|---|---|
| मेष | रखडलेली कामे सुरळीत पार पाडाल. त्यामुळे मनाचा ताण कमी होईल. प्रिय व्यक्तींच्या भेटीचा योग. |
| वृषभ | आर्थिक स्थिती सुधारण्यासाठी प्रयत्नशील राहाल. खर्चाचे प्रमाण देखील वाढेल. चैनीच्या गोष्टी खरेदी कराल. |
| मिथुन | नोकरीमध्ये विरोधकांवर मात करण्यात यश मिळेल. फसवणुकीपासून सावध राहा. स्वादिष्ट भोजनाचा आस्वाद घ्याल. |
| कर्क | नोकरीत नवीन जबाबदारी येईल. आर्थिक लाभही मिळतील. नातेवाईकांच्या गाठीभेटी होतील. |
| सिंह | कामानिमित्त प्रवास फायदेशीर ठरतील. अडलेली कामे मार्गी लागतील. सामाजिक उपक्रमांमध्ये भाग घ्याल. |
| कन्या | अचानक धनलाभाचे योग. तुमच्या बोलण्याने इतरांचे मन दुखावले जाणार नाही याची काळजी घ्या. |
| तूळ | कार्यक्षेत्रात नवनवीन संकल्पना राबवण्यासाठी प्रयत्नशील राहाल. प्रेमविवाहास उत्सुक मंडळींना अनुकूलता. वडिलधाऱ्यांचे सहाय्य लाभेल. |
| वृश्चिक | उत्साहाने कार्यरत राहाल. नोकरीत तुमच्या कामाचे कौतुक होईल. जोडीदाराचे सहकार्य चांगले राहील. |
| धनु | योजलेल्या कामांमध्ये सफलता मिळेल. घरातील जबाबदारी चांगल्या रीतीने पार पाडाल.तरुण मंडळींना विवाहाचे प्रस्ताव येतील.अचानक धनलाभ होईल. |
| मकर | नोकरीत नवीन संधी उपलब्ध होऊ शकते.व्यवसायात फायदा होईल. जोडीदार सहकार्य करेल. प्रवास करावा लागू शकतो. |
| कुंभ | परिश्रमांचे चीज होईल. आर्थिक आवक वाढेल. मोठी उलाढाल करताना जाणकारांचा सल्ला घेणे आवश्यक. |
| मीन | व्यवसायात अपेक्षित यश मिळेल. नोकरीच्या प्रयत्नांना यश मिळेल. घरात खेळीमेळीचे वातावरण राहील. चविष्ट भोजनाचा आस्वाद घ्याल. |

# लॉटरी

## महाराष्ट्र आकर्षक पुष्कराज विकली लॉटरी

सोडत दर गुरुवारी • तिकीट किंमत रु. 50/- • सोडत क्र. 24 • सोडत दिनांक 11/06/2026

| | | |
|---|---|---|
| पहिले सामाईक बक्षिस रु. 7 लाख | AP-01 : 9399 | |
| प्रोत्साहनपर बक्षिस रु. 2500/- | पहिल्या बक्षीसाची विजेता मालिका सोडून इतर सर्व मालिकांसाठी 9399 | जय जलाराम लॉटरीज् - गोरेगाव |
| दुसरे बक्षिस रु. 5000/- | 9407 | महावीर लॉटरी सेंटर - कोल्हापूर |

सर्व मालिकांसाठी • FOLLOWING NO.'S ARE COMMON TO ALL SERIES • सर्व मालिकांसाठी

| | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| तिसरे बक्षिस रु. 2000/- | 2620 | 4906 | 5424 | 5745 | 6017 | 6634 | 7685 | 8429 | 8533 | 8561 |
| चौथे बक्षिस रु. 1000/- | 0800 | 1026 | 1212 | 4650 | 4760 | 4809 | 5299 | 7468 | 7481 | 7998 |
| पाचवे बक्षिस रु. 500/- | 1406 | 1846 | 2378 | 3193 | 4069 | 5566 | 7353 | 7415 | 8967 | 9785 |
| सहावे बक्षिस रु. 200/- | 0478 | 0768 | 1835 | 4144 | 5327 | 5711 | 6933 | 8387 | 8769 | 9355 |

सातवे बक्षीस रु. 100/- (सर्व मालिकांसाठी)

| | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| सातवे बक्षीस रु.100/- (सर्व मालिकांसाठी) | | 1173 | 1837 | 2300 | 3220 | 4339 | 4936 | 5758 | 6505 | 7373 | 8141 | 8873 | 9451 |
| | | 1174 | 1850 | 2307 | 3278 | 4410 | 4947 | 5858 | 6514 | 7374 | 8157 | 8876 | 9453 |
| | | 1193 | 1886 | 2336 | 3315 | 4421 | 4974 | 5901 | 6526 | 7375 | 8169 | 8882 | 9466 |
| | | 1211 | 1904 | 2390 | 3333 | 4423 | 4975 | 5915 | 6531 | 7387 | 8181 | 8886 | 9470 |
| | | 1214 | 1915 | 2395 | 3377 | 4428 | 4991 | 5925 | 6577 | 7411 | 8198 | 8888 | 9499 |
| 0001 | 0610 | 1219 | 1951 | 2402 | 3399 | 4436 | 5005 | 5951 | 6591 | 7435 | 8206 | 8889 | 9534 |
| 0006 | 0634 | 1243 | 1990 | 2431 | 3456 | 4439 | 5018 | 5955 | 6613 | 7449 | 8208 | 8897 | 9556 |
| 0016 | 0650 | 1246 | 1998 | 2444 | 3482 | 4443 | 5032 | 5958 | 6626 | 7520 | 8225 | 8898 | 9557 |
| 0025 | 0696 | 1251 | 2008 | 2501 | 3494 | 4445 | 5056 | 5965 | 6641 | 7613 | 8243 | 8899 | 9605 |
| 0035 | 0728 | 1257 | 2021 | 2525 | 3533 | 4470 | 5057 | 5978 | 6662 | 7627 | 8284 | 8906 | 9677 |
| 0044 | 0792 | 1261 | 2027 | 2530 | 3542 | 4474 | 5107 | 6013 | 6663 | 7631 | 8298 | 8941 | 9691 |
| 0065 | 0795 | 1297 | 2039 | 2540 | 3549 | 4478 | 5115 | 6040 | 6666 | 7647 | 8304 | 8972 | 9693 |
| 0086 | 0805 | 1311 | 2043 | 2619 | 3580 | 4483 | 5157 | 6041 | 6669 | 7672 | 8328 | 8974 | 9695 |
| 0088 | 0820 | 1328 | 2068 | 2623 | 3588 | 4496 | 5243 | 6069 | 6677 | 7697 | 8381 | 8985 | 9701 |
| 0090 | 0853 | 1371 | 2081 | 2629 | 3594 | 4506 | 5251 | 6070 | 6689 | 7704 | 8383 | 8998 | 9769 |
| 0100 | 0900 | 1374 | 2088 | 2656 | 3628 | 4507 | 5253 | 6088 | 6690 | 7706 | 8388 | 9029 | 9779 |
| 0109 | 0906 | 1419 | 2091 | 2674 | 3638 | 4542 | 5299 | 6122 | 6744 | 7709 | 8405 | 9045 | 9798 |
| 0111 | 0920 | 1437 | 2113 | 2696 | 3651 | 4555 | 5323 | 6128 | 6768 | 7718 | 8415 | 9080 | 9801 |
| 0116 | 0940 | 1440 | 2145 | 2699 | 3656 | 4640 | 5371 | 6142 | 6786 | 7722 | 8446 | 9090 | 9809 |
| 0150 | 0954 | 1451 | 2160 | 2714 | 3730 | 4644 | 5382 | 6147 | 6856 | 7739 | 8448 | 9109 | 9817 |
| 0180 | 0980 | 1470 | 2171 | 2729 | 3736 | 4646 | 5392 | 6161 | 6859 | 7773 | 8506 | 9220 | 9847 |
| 0190 | 1005 | 1483 | 2175 | 2756 | 3743 | 4651 | 5458 | 6185 | 6886 | 7787 | 8541 | 9248 | 9858 |
| 0204 | 1015 | 1485 | 2188 | 2797 | 3747 | 4654 | 5462 | 6201 | 6918 | 7788 | 8581 | 9272 | 9878 |
| 0241 | 1021 | 1517 | 2200 | 2800 | 3773 | 4677 | 5525 | 6274 | 6969 | 7804 | 8582 | 9338 | 9886 |
| 0242 | 1022 | 1537 | 2209 | 2822 | 3813 | 4684 | 5526 | 6329 | 6983 | 7842 | 8588 | 9342 | 9888 |
| 0270 | 1031 | 1581 | 2215 | 2823 | 3854 | 4704 | 5527 | 6332 | 6990 | 7878 | 8597 | 9349 | 9909 |
| 0285 | 1056 | 1584 | 2223 | 2829 | 3896 | 4706 | 5530 | 6336 | 6996 | 7886 | 8598 | 9362 | 9920 |
| 0300 | 1060 | 1591 | 2224 | 2871 | 3926 | 4710 | 5532 | 6362 | 7011 | 7910 | 8617 | 9364 | 9923 |
| 0302 | 1080 | 1598 | 2229 | 2938 | 3932 | 4729 | 5549 | 6366 | 7013 | 7970 | 8684 | 9371 | 9925 |
| 0309 | 1086 | 1655 | 2230 | 2946 | 3958 | 4753 | 5564 | 6388 | 7015 | 7976 | 8686 | 9372 | 9928 |
| 0316 | 1112 | 1663 | 2235 | 2958 | 3973 | 4764 | 5576 | 6417 | 7019 | 7979 | 8690 | 9378 | 9932 |
| 0355 | 1114 | 1692 | 2237 | 2967 | 3976 | 4784 | 5591 | 6422 | 7022 | 7987 | 8698 | 9389 | 9970 |
| 0377 | 1118 | 1693 | 2239 | 2972 | 4009 | 4809 | 5594 | 6430 | 7033 | 8031 | 8704 | 9390 | 9973 |
| 0401 | 1133 | 1711 | 2243 | 3086 | 4022 | 4839 | 5647 | 6432 | 7057 | 8033 | 8712 | 9395 | 9977 |
| 0408 | 1137 | 1719 | 2252 | 3098 | 4089 | 4847 | 5656 | 6436 | 7071 | 8047 | 8721 | 9406 | 9979 |
| 0429 | 1139 | 1721 | 2253 | 3118 | 4134 | 4860 | 5695 | 6463 | 7176 | 8068 | 8754 | 9409 | 9980 |
| 0438 | 1148 | 1749 | 2261 | 3151 | 4150 | 4862 | 5715 | 6464 | 7241 | 8097 | 8770 | 9436 | 9983 |
| 0531 | 1157 | 1783 | 2273 | 3157 | 4224 | 4875 | 5737 | 6468 | 7297 | 8098 | 8789 | 9445 | 9990 |
| 0600 | 1161 | 1805 | 2281 | 3187 | 4311 | 4887 | 5743 | 6472 | 7299 | 8118 | 8802 | 9447 | 9992 |
| 0602 | 1167 | 1808 | 2292 | 3193 | 4324 | 4931 | 5754 | 6486 | 7368 | 8137 | 8860 | 9449 | 9993 |

छपाईतील कोणत्याही चुकीबद्दल आम्ही जबाबदार नाही. अचुक निकालासाठी अधिकृत गॅझेट पहावे. प्रस्तुतकर्ताः महाराष्ट्र राज्य लॉटरी

## गणेशलक्ष्मी गौरव विकली लॉटरी

निकाल • सोडत सायं. 5:00 वाजता
सोडत दर गुरुवार • सोडत क्रमांक 24 • तिकिट किं. रु. 10/- • सोडत दिनांक 11/06/2026

| | | |
|---|---|---|
| पहिले सामायिक बक्षिस रु. 10000/- | MG-08 : 7003 | न्यू जय अंबे लॉटरी भंडार, यवतमाळ |

सर्व मालिकांसाठी - FOLLOWING NO.'S ARE COMMON TO ALL SERIES - सर्व मालिकांसाठी

| | | |
|---|---|---|
| दुसरे बक्षिस रु. 5000/- | 2558 | |
| तिसरे बक्षिस रु. 2000/- | 6807 | महाराजा असोसिएट्स, इचलकरंजी |

| | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| चौथे बक्षिस रु. 1000/- | 2490 | 2588 | 2791 | 4150 | 5434 | 6434 | 7241 | 7349 | 8050 | 9138 |
| पाचवे बक्षिस रु. 500/- | 0660 | 2947 | 4051 | 5816 | 6408 | 6687 | 7184 | 7914 | 8105 | 9204 |
| सहावे बक्षिस रु. 200/- | 0531 | 1720 | 2596 | 3972 | 4886 | 4965 | 6536 | 6771 | 8764 | 9821 |

सातवे बक्षीस रु. 100/- (सर्व मालिकांसाठी)

| | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| सातवे बक्षीस रु.100/- (सर्व मालिकांसाठी) | | 1786 | 2811 | 3841 | 4926 | 5592 | 6651 | 7690 | 8683 | 9305 |
| | | 1832 | 2922 | 3899 | 4986 | 5705 | 6659 | 7714 | 8686 | 9337 |
| | | 1887 | 2947 | 3979 | 5035 | 5775 | 6669 | 7761 | 8722 | 9338 |
| 0021 | 1031 | 1912 | 2953 | 3993 | 5054 | 5859 | 6764 | 7774 | 8739 | 9422 |
| 0045 | 1033 | 1971 | 3073 | 4038 | 5101 | 5887 | 6790 | 7784 | 8768 | 9439 |
| 0049 | 1116 | 1986 | 3093 | 4104 | 5150 | 5901 | 6818 | 7804 | 8780 | 9440 |
| 0191 | 1133 | 2008 | 3145 | 4224 | 5155 | 5908 | 6896 | 7870 | 8796 | 9457 |
| 0205 | 1143 | 2127 | 3260 | 4284 | 5259 | 5959 | 6968 | 7876 | 8820 | 9580 |
| 0241 | 1158 | 2132 | 3292 | 4305 | 5275 | 6131 | 6999 | 8042 | 8824 | 9592 |
| 0313 | 1180 | 2202 | 3308 | 4409 | 5285 | 6136 | 7070 | 8058 | 8911 | 9603 |
| 0337 | 1200 | 2204 | 3317 | 4414 | 5326 | 6138 | 7142 | 8080 | 8937 | 9649 |
| 0453 | 1212 | 2242 | 3327 | 4462 | 5343 | 6164 | 7268 | 8130 | 8942 | 9727 |
| 0463 | 1226 | 2294 | 3368 | 4473 | 5355 | 6218 | 7362 | 8140 | 8981 | 9750 |
| 0464 | 1282 | 2340 | 3378 | 4477 | 5438 | 6262 | 7378 | 8170 | 8985 | 9769 |
| 0471 | 1353 | 2493 | 3394 | 4584 | 5472 | 6464 | 7388 | 8246 | 8986 | 9835 |
| 0513 | 1465 | 2560 | 3519 | 4586 | 5523 | 6483 | 7413 | 8278 | 8988 | 9859 |
| 0590 | 1511 | 2598 | 3525 | 4685 | 5525 | 6556 | 7495 | 8435 | 8989 | 9916 |
| 0720 | 1512 | 2650 | 3526 | 4716 | 5546 | 6587 | 7511 | 8462 | 9005 | 9948 |
| 0791 | 1601 | 2720 | 3643 | 4860 | 5553 | 6602 | 7567 | 8498 | 9089 | 9959 |
| 0831 | 1639 | 2782 | 3679 | 4864 | 5574 | 6605 | 7657 | 8588 | 9092 | 9974 |
| 0909 | 1670 | 2795 | 3827 | 4899 | 5589 | 6613 | 7668 | 8633 | 9114 | 9997 |

छपाईतील कोणत्याही चुकीबद्दल आम्ही जबाबदार नाही. अचुक निकालासाठी अधिकृत गॅझेट पहावे. प्रस्तुतकर्ताः महाराष्ट्र राज्य लॉटरी

## महाराष्ट्र राज्य लॉटरी महाराष्ट्र सह्याद्री • दीपलक्ष्मी विकली लॉटरी •

निकाल • सोडत सायं. 4:30 वाजता
सोडत दर गुरुवार • सोडत क्रमांक 24 • तिकिट किं. रु. 15/- • सोडत दिनांक 11/06/2026

| | |
|---|---|
| पहिले सामायिक बक्षिस रु. 10000/- | SD-08 : 9647 |

सर्व मालिकांसाठी • FOLLOWING NO.'S ARE COMMON TO ALL SERIES • सर्व मालिकांसाठी

| | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| दुसरे बक्षिस रु. 2000/- | 1640 | 1773 | 1905 | 2285 | 3072 | 4556 नीलम लॉटरी, परभणी | 5710 | 7848 | 8416 | 9740 |
| तिसरे बक्षिस रु. 1000/- | 0072 | 1191 | 1793 | 1854 | 2686 | 6162 | 6826 | 7845 | 8040 | 9716 |
| चौथे बक्षिस रु. 500/- | 1201 | 1469 | 1883 | 4257 | 4759 | 6631 | 7111 | 7957 | 8263 | 9303 |

पाचवे बक्षीस रु. 300/- (सर्व मालिकांसाठी)

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| पाचवे बक्षिस रु. 300/- | 0975 | 2520 | 3865 | 4743 | 5865 | 7140 | 8118 | 9160 |
| | 1103 | 2596 | 4082 | 5005 | 5926 | 7366 | 8209 | 9173 |
| 0001 | 1197 | 2721 | 4117 | 5019 | 6028 | 7381 | 8268 | 9199 |
| 0041 | 1415 | 2823 | 4214 | 5035 | 6201 | 7385 | 8379 | 9313 |
| 0079 | 1574 | 2952 | 4295 | 5057 | 6345 | 7435 | 8420 | 9314 |
| 0119 | 1719 | 2954 | 4347 | 5105 | 6364 | 7493 | 8458 | 9393 |
| 0440 | 1910 | 3030 | 4413 | 5432 | 6511 | 7519 | 8489 | 9523 |
| 0478 | 1993 | 3356 | 4430 | 5452 | 6622 | 7766 | 8558 | 9543 |
| 0585 | 2125 | 3375 | 4434 | 5476 | 6665 | 7777 | 8661 | 9779 |
| 0699 | 2222 | 3639 | 4586 | 5589 | 6688 | 7862 | 8788 | 9891 |
| 0780 | 2249 | 3730 | 4634 | 5595 | 6696 | 7976 | 8857 | 9949 |
| 0814 | 2273 | 3766 | 4641 | 5694 | 6776 | 8010 | 9092 | 9950 |
| 0860 | 2429 | 3836 | 4735 | 5740 | 7052 | 8106 | 9124 | 9970 |

छपाईतील कोणत्याही चुकीबद्दल आम्ही जबाबदार नाही. अचुक निकालासाठी अधिकृत गॅझेट पहावे. प्रस्तुतकर्ताः महाराष्ट्र राज्य लॉटरी

## महाराष्ट्र राज्य लॉटरी महाराष्ट्र गजलक्ष्मी गुरु विकली लॉटरी

निकाल • सोडत संध्या. 4:45 वाजता
सोडत दर गुरुवार • सोडत क्रमांक 24 • तिकिट किं. रु. 20/- • सोडत दिनांक 11/06/2026

| | | |
|---|---|---|
| पहिले बक्षिस रु. 10,000/- | GL-02 : 9626 | महाराजा असोसिएट्स, इचलकरंजी |

सर्व मालिकांसाठी • FOLLOWING NO.'S ARE COMMON TO ALL SERIES

| | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| दुसरे बक्षिस रु. 5000/- | 0811 | 0923 | 1242 | 1940 | 2306 | 2716 | 4883 | 7520 | 7695 | 8454 |
| तिसरे बक्षिस रु. 1000/- | 0679 | 0688 | 2037 | 2720 | 3167 | 4402 | 4913 | 6056 | 8640 | 8648 |
| चौथे बक्षिस रु. 500/- | 1302 | 1429 | 2289 | 4555 | 5093 | 7014 | 8782 | 9122 | 9220 | 9611 |
| पाचवे बक्षिस रु. 200/- | 0265 | 1615 | 2035 | 2204 | 4117 | 4437 | 5000 | 5405 | 7016 | 9568 |

सहावे बक्षीस रु. 100/- (सर्व मालिकांसाठी)

| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| सहावे बक्षिस रु. 100/- | | 1610 | 2621 | 3583 | 4428 | 5270 | 6364 | 7127 | 7780 | 8670 | 9512 |
| | | 1613 | 2825 | 3679 | 4434 | 5297 | 6438 | 7137 | 7799 | 8689 | 9522 |
| 0016 | 0909 | 1631 | 2926 | 3692 | 4452 | 5391 | 6473 | 7177 | 7838 | 8771 | 9569 |
| 0034 | 0954 | 1729 | 2928 | 3704 | 4470 | 5397 | 6485 | 7240 | 7990 | 8842 | 9585 |
| 0041 | 1012 | 1927 | 2977 | 3737 | 4484 | 5459 | 6546 | 7374 | 8004 | 8884 | 9612 |
| 0080 | 1026 | 1977 | 3037 | 3773 | 4533 | 5544 | 6559 | 7380 | 8024 | 8993 | 9619 |
| 0087 | 1108 | 2028 | 3070 | 3783 | 4596 | 5546 | 6576 | 7437 | 8031 | 8994 | 9629 |
| 0095 | 1110 | 2113 | 3153 | 3787 | 4600 | 5547 | 6579 | 7454 | 8089 | 9009 | 9727 |
| 0234 | 1125 | 2119 | 3183 | 3842 | 4705 | 5565 | 6676 | 7459 | 8203 | 9032 | 9761 |
| 0270 | 1137 | 2183 | 3200 | 3880 | 4767 | 5583 | 6686 | 7487 | 8260 | 9059 | 9787 |
| 0280 | 1157 | 2200 | 3203 | 3987 | 4784 | 5750 | 6716 | 7521 | 8275 | 9063 | 9826 |
| 0351 | 1177 | 2204 | 3232 | 4004 | 4803 | 5827 | 6798 | 7668 | 8288 | 9093 | 9833 |
| 0370 | 1192 | 2225 | 3261 | 4067 | 4824 | 5839 | 6828 | 7671 | 8346 | 9187 | 9857 |
| 0486 | 1213 | 2268 | 3303 | 4083 | 4924 | 5880 | 6830 | 7679 | 8381 | 9199 | 9873 |
| 0529 | 1219 | 2302 | 3304 | 4106 | 5057 | 5926 | 6836 | 7684 | 8397 | 9290 | 9884 |
| 0648 | 1455 | 2304 | 3331 | 4134 | 5065 | 5954 | 6846 | 7688 | 8422 | 9297 | 9890 |
| 0661 | 1496 | 2315 | 3338 | 4167 | 5138 | 6010 | 6929 | 7711 | 8453 | 9319 | 9909 |
| 0680 | 1505 | 2320 | 3399 | 4227 | 5156 | 6036 | 6956 | 7720 | 8525 | 9368 | 9936 |
| 0708 | 1518 | 2323 | 3402 | 4341 | 5187 | 6118 | 6964 | 7734 | 8539 | 9387 | 9961 |
| 0779 | 1539 | 2420 | 3477 | 4343 | 5222 | 6216 | 7007 | 7748 | 8592 | 9435 | 9966 |
| 0805 | 1584 | 2495 | 3503 | 4421 | 5247 | 6224 | 7071 | 7760 | 8626 | 9443 | 9991 |
| 0874 | 1608 | 2602 | 3537 | 4422 | 5259 | 6340 | 7083 | 7778 | 8669 | 9459 | 9992 |

छपाईतील कोणत्याही चुकीबद्दल आम्ही जबाबदार नाही. अचुक निकालासाठी अधिकृत गॅझेट पहावे. प्रस्तुतकर्ताः महाराष्ट्र राज्य लॉटरी

## शुभ राशी ता. १२/६/२०२६

| | | |
|---|---|---|
| ८ | २ | ७ |
| ८१ | २३ | ७३ |
| ८६ | २८ | ७८ |
| १८९ | १२९ | ५६९ |
| २५० | ६७९ | ३६८ |

# केरळमध्ये निपाह विषाणूचा पहिला रुग्ण व्हेंटिलेटरवर



तिरुवनंतपूरम

**केरळमध्ये** यावर्षी निपाह विषाणूचा पहिला रुग्ण आढळला आहे. हा रुग्ण ४३ वर्षांचा असून, तो कोझिकोडचा रहिवासी आहे. अहवाल पॉझिटिव्ह आल्यानंतर राज्य सरकारने संपूर्ण राज्यात हाय अलर्ट जारी केला आहे. रुग्णाला हलका ताप आल्याने खासगी रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. नंतर त्याला कोझिकोड मेडिकल कॉलेजमध्ये पाठवण्यात आले. त्याची प्रकृती गंभीर असून तो व्हेंटिलेटरवर आहे.

आरोग्यमंत्री के. मुरलीधरन म्हणाले की, रुग्ण अनेक लोकांच्या संपर्कात आला होता. रुग्णालयातील कर्मचारी आणि त्याच्या संपर्कात आलेल्या संभाव्य लोकांना विलगीकरणात राहण्यास सांगितले आहे. सध्या घाबरण्याची गरज नाही. २०१८ पासून केरळमध्ये सहाव्यांदा या विषाणूचा संसर्ग पसरला आहे.

शेवटचे दोन वर्षांपूर्वी २०२४ मध्ये दोन रुग्ण आढळले होते. त्यापैकी एकाचा मृत्यू झाला होता. अधिकाऱ्यांच्या मते, रुग्णाने नुकतेच एक गोदाम भाड्याने घेतले होते. त्याने स्वतः त्याची साफसफाई केली होती. याच दरम्यान त्याला संसर्ग झाला असावा अशी शक्यता आहे. निपाह व्हायरस मुख्यतः फ्रूट बॅट पासून पसरतो.जागतिक आरोग्य संघटनेनुसार १९९८ मध्ये मलेशियातील सुंगई निपाह गावात पहिल्यांदा या विषाणूचा शोध लागला होता. याच गावाच्या नावावरून त्याला निपाह असे नाव पडले. सामान्यतः हा विषाणू वटवाघूळ आणि डुकरांमुळे पसरतो. निपाह विषाणूची लक्षणे दोन ते तीन दिवसांत दिसू लागतात.

# जुहूच्या मनीषा इमारतीत आग! ४ जण जखमी

मुंबई

**मुंबईतील** जुहू परिसरातील जे.व्ही.पी.डी. रोडवरील १२ मजली मनीषा इमारतीच्या सहाव्या मजल्यावरील एका फ्लॅटमध्ये आज सकाळी ७:३० वाजताच्या सुमारास एसी युनिटमध्ये शॉर्टसर्किट होऊन आग लागली.

आगीमुळे काही वेळातच संपूर्ण मजल्यावर धूर पसरला. घटनेची माहिती मिळताच अग्निशमन दलाच्या चार गाड्या, स्थानिक जुहू पोलीस, मुंबई महानगरपालिका कर्मचारी तसेच अदानी इलेक्ट्रिसिटीचे पथक घटनास्थळी दाखल झाले. सुरक्षेच्या दृष्टीने काही काळ वीजपुरवठा खंडित करण्यात आला होता. अग्निशमन दलाने तत्काळ कारवाई करत आग आटोक्यात आणली. या घटनेत धुरामुळे चार जण जखमी झाले असून त्यांना जवळच्या रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले आहे.

# माजी न्यायमूर्ती गौतम पटेल यांना लंडनमध्ये पोलीस संरक्षण



लंडन

**मुंबई** उच्च न्यायालयाचे माजी न्यायमूर्ती गौतम पटेल आणि त्यांच्या लंडनमधील कुटुंबियांना यूके पोलिसांनी कडेकोट पोलीस संरक्षण प्रदान केले आहे. दाऊदी बोहरा समाजाच्या उत्तराधिकाराबाबत त्यांनी २०२४ मध्ये दिलेल्या एका निकालाचा सूड घेण्यासाठी त्यांच्या मुलीवर लंडनमध्ये झालेल्या प्राणघातक हल्ल्यानंतर आणि धमक्यांच्या सत्रानंतर हे पाऊल उचलण्यात आले आहे.

सध्या ब्रिटनच्या दौऱ्यावर असलेले भारताचे सरन्यायाधीश सूर्य कांत यांनी माजी न्यायमूर्ती पटेल यांना येत असलेल्या धमक्याबाबत भारतीय उच्चायुक्त पी. कुमारन यांच्याकडे हा मुद्दा उपस्थित केला होता. त्यानंतर पटेल आणि त्यांच्या कुटुंबियांना युके पोलिसांनी विशेष पोलीस संरक्षण सुविधा उपलब्ध करून दिली आहे. न्यायमूर्ती पटेल यांच्या मुलीच्या लंडनमधील निवासस्थानी जर्मनीचा टपाल शिक्का असलेले एक धमकीचे पत्र आले होते, ज्यामध्ये त्यांच्या कुटुंबाला जीवे मारण्याची सुपारी मिळाली असल्याची धमकी देण्यात आली होती. या पत्रासोबत एक डिजिटल स्टोरेज डिव्हाइसदेखील होते, ते आता लंडन पोलिसांच्या स्वाधीन करण्यात आले आहे. गेल्या १० महिन्यांत त्यांच्या कुटुंबाला अशी अनेक निनावी पत्रे आली आहेत. २०२४ मध्ये दाऊदी बोहरा समाजाच्या उत्तराधिकारीबाबत दिलेल्या निकालानंतर माजी न्यायमूर्ती पटेल यांच्या कुटुंबियांना या धमक्या येऊ लागल्या आहेत.

# कृष्णा कारखान्यात दुरंगी सामना ४४ उमेदवार उतरले रिंगणात

कराड

**तालुक्यातील** यशवंतराव मोहिते कृष्णा सहकारी साखर कारखाना निवडणुकीत आता दुरंगी सामना रंगणार आहे. या निवडणुकीत केवळ ४४ उमेदवार प्रत्यक्ष रिंगणात उभे ठाकले आहेत. काल बुधवारी या सर्व उमेदवारांना चिन्ह वाटप करण्यात आले. निवडणूक निर्णय अधिकारी अपर्णा यादव यांच्या मार्गदर्शनाखाली चिन्ह वाटपाची कार्यवाही पार पडली.

या चिन्ह वाटपात सत्ताधारी सहकार पॅनेलला कपबशी तर विरोधी संस्थापक पॅनेलला नारळ चिन्ह मिळाले आहे. दोन अपक्षांना प्रत्येकी टॅक्ट्रर व शिट्टी असे चिन्ह मिळाले आहे. या निवडणुकीत सहकार आणि संस्थापक पॅनेलमध्ये दुरंगी सामना पाहायला मिळणार आहे. मतदान २१ जून रोजी होणार असून, २३ जून रोजी मतमोजणी होणार आहे. कृष्णा सहकारी साखर कारखाना निवडणुकीत अर्ज भरण्याच्या अंतिम दिवशी १३९ उमेदवारी अर्ज होते. त्यापैकी छाननीनंतर १२२ अर्ज उरले होते. उमेदवारी अर्ज मागे घेण्याच्या मंगळवारी अंतिम दिवशी उरलेल्या ९६ पैकी ५३ उमेदवारांनी उमेदवारी अर्ज मागे घेतले होते. त्यामुळे निवडणूक रिंगणात ४४ उमेदवार राहिले आहेत.

# विरारच्या ग्लोबल सिटीचा वीजपुरवठा १६ तास खंडित

विरार

**वसईकर** उन्हाळ्यामुळे हैराण असताना दुसरीकडे महावितरणच्या ढिसाळ कारभाराचा फटका त्यांना सहन करावा लागत आहे. विरार पश्चिमेकडील ग्लोबल सिटी परिसरातील वीजपुरवठा काल तब्बल १६ तास खंडित झाला होता. विरार पश्चिमेकडे असलेल्या ग्लोबल सिटी परिसरातील नागरिकांना गेल्या काही दिवसांपासून वीजपुरवठा खंडित होण्याच्या समस्येचा सामना करावा लागत आहे. काल दुपारी ३ वाजता या परिसरातील वीज गायब झाली.

# वर्सोवा-दहिसर कोस्टल रोडच्या बाधित झाडांचे पुनर्रोपण करणार

१२.८१ कोटी खर्च करणार

मुंबई

**वर्सोवा-दहिसर** कोस्टल रोड प्रकल्पासाठी बाधित होणाऱ्या काही झाडांचे पवई येथील डॉ.बाबासाहेब आंबेडकर उद्यानात पुनर्रोपण करण्याचा निर्णय पालिकेच्या वृक्ष प्राधिकरणाने घेतला आहे. त्यासाठी पालिका १२ कोटी ८१ लाख ३३ हजार ६१५ रुपये खर्च करणार असून याबाबतचा प्रस्ताव उद्या शुक्रवारी होणाऱ्या स्थायी समिती बैठकीत सादर केला जाईल.

या प्रकल्पामध्ये बाधित झाडांपैकी विशेषतः मालाड, बांगूरनगर ते मायंडस्पेस पट्ट्यातील ८८२ झाडांचे पुनर्रोपण पवई येथील पासपोलीजवळ असलेल्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर उद्यानात केले जाणार आहे. त्यासाठी कंत्राटदाराला पुढील ७ वर्षे या झाडांची निगा राखणे बंधनकारक करण्यात आले आहे. या प्रकल्पासाठी एकूण जवळपास १,९९२ झाडे बाधित होत आहेत. त्यापैकी सुमारे १,२६६ हून अधिक झाडांचे पुनर्रोपण केले जाणार आहे आणि इतर झाडे तोडण्यात येतील. तोडल्या जाणाऱ्या झाडांच्या बदल्यात पनवेल आणि रायगड परिसरात मुंबई महापालिका प्राधिकरणाच्या नियमांनुसार तब्बल १९,५७३ नवीन झाडे लावून भरपाई केली जाणार आहे.

# राष्ट्रवादीच्या संगीता चेंदवणकरांची छेड! बदलापुरात तरुणाला चोप

बदलापूर

**बदलापूर** आणि परिसरात महिलांवर अत्याचार करणाऱ्या किंवा त्यांची छेड काढणाऱ्यांना धडा शिकवणाऱ्या राष्ट्रवादीच्या पदाधिकारी संगीता चेंदवणकर यांचीच छेड काढण्याचा प्रकार घडला. एका तरुणाने 'मी तुला सोडतो' असे म्हणत चेंदवणकर यांना रस्त्यात अडवण्याचा प्रयत्न केला. त्यानंतर संगीता चेंदवणकर आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी तत्काळ त्या तरुणाला पकडले. त्यानंतर त्याला चांगलाच चोप देत पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले. या घटनेमुळे परिसरात काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले होते. दरम्यान, या घटनेचा व्हिडिओ सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात व्हायरल होत आहे. २०२४ मध्ये बदलापूरमधील लैंगिक अत्याचार प्रकरणानंतर झालेल्या तीव्र जनआंदोलनात तेव्हा मनसेत असलेल्या संगीता चेंदवणकर यांनी आक्रमक भूमिका बजावली होती.

# नाशिकच्या गंगापूर धरणात चार जणांचा बुडून मृत्यू

नाशिक

**नाशिकमधील** गंगापूर धरणाच्या पाण्यात पोहण्यासाठी गेलेल्या ४ जणांचा बुडून मृत्यू झाल्याने एकच हळहळ व्यक्त होत आहे. मृतांमध्ये ३ मुले आणि एका विवाहित महिलेचा समावेश आहे.

निखिल मच्छिंद्र गोतरणे (१६), गणेश सुरेश गोतरणे (१६), साहिल मनोहर गोतरणे (१६) आणि मयुरी पवन जाधव (२१ ) अशी मृतांची नावे आहेत. हे सर्वजण गंगापूर धरणाच्या जलाशयात उतरले होते. मात्र पाण्याचा खोलीचा आणि वेगाचा अंदाज न आल्यामुळे चौघेही पाण्यात बुडाले. स्थानिक नागरिक आणि प्रशासनाच्या मदतीने त्यांचे मृतदेह बाहेर काढण्यात आले आहेत.

# मिरा-भाईंदरकरांची पाणी कपात रद्द करण्यास एमआयडीसीचा नकार

सूर्या प्रकल्पातील पाणी मिळालेले नाही

भाईंदर

**एमआयडीसीने** मिरा-भाईंदर शहरात लागू केलेली १० टक्के पाणी कपात रद्द करण्यास नकार दिला आहे. त्यामुळे पुढील काही दिवस शहरातील नागरिकांसाठी कसोटी ठरणार आहे.

मिरा-भाईंदर शहराला स्टेम प्राधिकरणाकडून ८६ दशलक्ष लीटर्स तर एमआयडीसीकडून १२५ दशलक्ष लीटर्स असा एकूण २११ दशलक्ष लीटर्स पाणीपुरवठा मंजूर आहे. सूर्या प्रकल्पातील अतिरिक्त पाणी अद्याप शहराला मिळालेले नाही. वाढत्या लोकसंख्येमुळे पाण्याची मागणीही वाढली आहे. सध्या केवळ ११५ दशलक्ष लीटर्स पाणीपुरवठा केला जात आहे. परिणामी नागरिकांना सुमारे ४० तासांच्या अंतराने पाणीपुरवठा मिळत आहे. त्यातच एमआयडीसीने १० टक्के पाणी कपात लागू केल्यामुळे नागरिकांना मोठ्या प्रमाणावर पाणीटंचाईचा सामना करावा आहे. पालिकेत भाजपाची सत्ता आहे. पाणीटंचाईच्या निमित्ताने भाजपावर हल्लाबोल करण्यासाठी मंगळवारी शिवसेना शिंदे गटाने पालिकेवर टमरेल मोर्चाही काढला होता.

या पार्श्वभूमीवर महापौर डिंपल मेहता यांच्या नेतृत्वाखालील शिष्टमंडळाने एमआयडीसीच्या अधिकाऱ्यांबरोबर बैठक आयोजित करून पाणी कपात रद्द करण्याची मागणी केली होती. परंतु त्याला एमआयडीसीने नकार दिला आहे. पावसाळा नियमितपणे सुरू झाल्यानंतर मिरा-भाईंदर शहरावरील पाणी कपात रद्द करण्याबाबत सकारात्मक निर्णय घेण्यात येईल.

# 'एफडीए'च्या धसक्याने राज्यात गूळ सौदे ठप्प

कोल्हापूर

**पश्चिम** महाराष्ट्रातील कोल्हापूर आणि सांगली कृषी उत्पन्न बाजार समितीमधील गूळ बाजाराला एफडीए अर्थात अन्न व औषध प्रशासनाच्या कडक कारवाईची व व्यापाऱ्यांच्या बहिष्काराची मोठी झळ बसली आहे. दोन्ही जिल्ह्यांतील मुख्य बाजारपेठांमधील गुळाची उलाढाल पूर्णपणे ठप्प झाली आहे. कोल्हापूर जिल्ह्यात तर शेतकऱ्यांनी गूळ उत्पादनच थांबवले आहे.

अन्न व औषध प्रशासन विभागाचे आयुक्त तुकाराम मुंढे यांनी सध्या राज्यात भेसळीच्या विरोधात अत्यंत आक्रमक मोहीम सुरू आहे. या मोहिमेमुळे सांगली बाजार समितीत होणारे गुळाचे सौदे सलग काही दिवसांपासून पूर्णपणे ठप्प आहेत. तसेच गुजरातसह मुंबई, पुणे, नाशिक आणि इतर मोठ्या शहरांमधील प्रमुख खरेदीदारांनी कोल्हापूर व सांगलीच्या गुळाची मागणी पूर्णपणे थांबवली आहे. कर्नाटकातूनही या दोन्ही बाजारपेठांत गूळ यायचा बंद झाला आहे.

कोल्हापुरात एक दिवसाआड तीन ते चार हजार गूळ रव्यांची आवक होत होती,पण कारवाईचा बडगा उगारण्यात आल्याने ही आवक थांबली आहे.

# मृणालताई गोरे उड्डाणपूल कामावर २७ लाखांचा दंड

**मुंबई-** गोरेगावमधील मृणालताई गोरे उड्डाणपुलाच्या कामावरून पुन्हा एकदा गंभीर प्रश्न निर्माण झाले आहेत. प्रकल्पात झालेला विलंब, वाढलेला खर्च आणि कामातील त्रुटी यामुळे मुंबई महापालिकेने संबंधित कंत्राटदारावर आतापर्यंत एकूण २७ लाख रुपयांचा दंड ठोठावला आहे.

२०१८ मध्ये सुरू झालेल्या या उड्डाणपुलाची सुरुवातीची अंदाजित किंमत सुमारे १७० कोटी रुपये होती. मात्र, कामातील विलंब आणि विविध तांत्रिक कारणांमुळे प्रकल्पाचा खर्च वाढत जाऊन तो आता जवळपास २४८ कोटी रुपयांवर पोहोचला आहे. म्हणजेच या प्रकल्पाच्या खर्चात तब्बल ४५ टक्क्यांची वाढ झाली आहे. दरम्यान, एवढी मोठी खर्चवाढ होऊनही कामाच्या गुणवत्तेबाबत प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. स्थानिक नागरिकांकडूनही कामाच्या दर्जाबाबत नाराजी व्यक्त केली जात आहे.

# ऑरेंज गेट ते मरीन ड्राईव्ह दुहेरी बोगदा प्रकल्पाला गती

मुंबई

**मुंबईतील** पूर्व आणि दक्षिण भागाला थेट जोडणाऱ्या ऑरेंज गेट ते मरीन ड्राईव्ह दुहेरी भूमिगत बोगदा प्रकल्पाच्या कामाला मोठा वेग आला आहे. या महत्त्वाकांक्षी प्रकल्पांतर्गत आतापर्यंत २५० मीटरहून अधिक बोगद्याचे खोदकाम पूर्ण झाले असून गिरगाव चौपाटीजवळ तांत्रिक इमारत उभारण्याच्या जागेची पाहणी करण्यासाठी उच्चाधिकार समितीने नुकतीच स्वराज्य भूमीला भेट दिली.

यावेळी पालिकेच्या अतिरिक्त आयुक्त डॉ. अश्विनी जोशी यांनी मफतलाल जलतरण तलाव येथील बास्केटबॉल मैदानाच्या ठिकाणी सदर इमारत बांधण्याबाबत एमएमआरडीएने पडताळणी करून त्याबाबतचा प्रस्ताव



पालिकेला सादर करावा, असे निर्देश दिले.या पाहणी दौऱ्यात अतिरिक्त आयुक्त अश्विनी जोशी यांच्या सह जिल्हाधिकारी आंचल गोयल तसेच म्हाडा अधिकारी आणि अन्य अधिक उपस्थित होते.

या प्रकल्पाअंतर्गत दोन स्वतंत्र बोगदे उभारले जात आहेत. बोगदा वाहतुकीसाठी कार्यरत झाल्यानंतर ऑरेंज

**तांत्रिक इमारतीसाठी प्रस्ताव देण्याचे निर्देश**

गेट ते मरीन ड्राईव्ह प्रवासाचा कालावधी सध्याच्या २२ ते ४० मिनिटांवरून सुमारे ५ मिनिटांपर्यंत कमी होण्याची अपेक्षा आहे. प्रकल्प पूर्ण झाल्यानंतर दक्षिण मुंबईतील वाहतूक कोंडी कमी होण्यास, पूर्व-पश्चिम दळणवळण सुधारण्यास मदत होणार आहे.

# 'कॉकरोच'च्या इन्स्टा अकाउंटची सायबर चौकशी करण्याची मागणी

मुंबई

**सध्या** राजकीय वर्तुळात प्रचंड चर्चेत असलेल्या कॉकरोच जनता पार्टीच्या (सीजेपी) इन्स्टाग्राम अकाउंटवरील फोलोअर्स संख्या प्रचंड वाढल्याबद्दल संशय घेत एका वकिलाने याची सायबर पोलिसांकडून चौकशी केली जावी, अशी मागणी मुंबई पोलीस आयुक्तांकडे केली आहे.

ॲड. अरविंद सिंह असे या वकिलाचे नाव आहे. त्यांनी लेखी पत्राद्वारे पोलिसांकडे ही मागणी केली आहे. इंटरनेट आणि सोशल मीडियाविषयी संशोधन करणाऱ्या एका संशोधकाने सीजेपीच्या इन्स्टाग्राम अकाउंटचे स्वतंत्रपणे विश्लेषण केले असता त्यामध्ये फोलोअर्सची संख्या अचानक वाढणे आणि काही दिवस सलग मोठ्या संख्येने कमी होणे यामध्ये गैरप्रकार करण्यात आल्याचे आढळून आले आहे, असे ॲड. अरविंद सिंह यांनी तक्रारीत म्हटले आहे. एका व्यक्तीने केलेल्या संशोधनाला मर्यादा असू शकतात त्यामुळे मुंबई पोलिसांच्या सायबर शाखेने या प्रकरणी निःपक्षपातीपणे चौकशी करावी.

# ५ वर्षांनी म्हाडाचे घर विकत घेणाऱ्यांना दिलासा मिळणार



मुंबई

**म्हाडाच्या** सोडतीतील लाभार्थ्यांकडून पाच वर्षांनी घर विकत घेणाऱ्या खरेदीदाराला घर नावावर करण्यासाठी म्हाडाच्या परवानगीची गरज भासणार नाही, असा दिलासादायक निर्णय राज्य शासन घेण्याच्या तयारीत असल्याची माहिती समोर आली आहे.

म्हाडाच्या लॉटरीत मिळालेले घर मालकाने पाच वर्षे पूर्ण होईपर्यंत इतर व्यक्तिला विकू नये, अशी म्हाडाची अट पूर्वीपासून आहे. पाच वर्षांनंतर घर खरेदी विक्रीचा व्यवहार झाल्यावर घर विकत घेणाऱ्या व्यक्तिला विकत असलेले घर स्वतःच्या नावावर करण्यासाठी म्हाडाच्या परवानगीची गरज लागते. परवानगी मिळविता मिळविता अर्जदार अक्षरशः मेटाकुटीस येतो, असे सांगून गृहनिर्माण विभागातील एक अधिकारी पुढे म्हणाला, म्हाडाच्या लॉटरीतील घर लाभार्थ्याने पूर्ण रक्कम अदा करून घर विकत घेतले आहे. त्यामुळे लाभार्थी एकप्रकारे घराचा मालक होतो. मग घराच्या विक्रीनंतर दुसऱ्याला आपले नावे घर करण्यासाठी म्हाडाच्या नाहरकत प्रमाणपत्र व इतर मंजुरीच्या कागदपत्रांची गरज का? असा सवाल करून हा अधिकारी पुढे म्हणाला, म्हाडाच्या घरांची खरेदी-विक्रीची वरील अट रद्द करून घर खरेदी करणाऱ्यांना दिलासा देण्याचा निर्णय शासन घेणार असल्याचे सांगण्यात येते. यामुळे म्हाडाचे घर खरेदीदारांना दिलासा मिळण्याची शक्यता वर्तवली जाते.

# शिंदेंचे नगरसेवक मजीद शेख यांचे जात प्रमाणपत्र रद्द! पद धोक्यात

नाशिक

**नाशिक** जिल्ह्यातील मनमाड नगरपालिकेचे शिंदे गटाचे नगरसेवक मजीद शेख यांचे जात प्रमाणपत्र नाशिक विभागीय जात प्रमाणपत्र पडताळणी समितीने अवैध ठरवले, रद्द केले आहे. त्यामुळे त्यांचे नगरसेवकपद धोक्यात आले आहे.

मजीद शेख यांनी मनमाड नगरपालिकेच्या निवडणुकीत 'मोमीन' या जात प्रमाणपत्राच्या आधारे उमेदवारी दाखल केली होती. या निवडणुकीत त्यांनी विजय मिळवला होता. मात्र, निवडणुकीनंतर त्यांच्या जात प्रमाणपत्राच्या वैधतेवर आक्षेप घेण्यात आला. त्यांचे प्रतिस्पर्धी विजय मिश्रा आणि रिजवाना शेख यांनी याबाबत अपील दाखल करत पडताळणीची मागणी केली होती. यानंतर हे प्रकरण नाशिक विभागीय जात प्रमाणपत्र पडताळणी समितीसमोर सुनावणीसाठी आले. समितीने सादर करण्यात आलेली कागदपत्रे, पुरावे आणि दोन्ही बाजूंचे युक्तिवाद तपासून सविस्तर सुनावणी केली.

# केरळमधील महिलांसाठी आता मोफत बस प्रवास

तिरुवनंतपुरम

**केरळ** सरकारने महिला सक्षमीकरणासाठी 'प्रियदर्शिनी' मोफत बस योजना आणली आहे. या योजनेमुळे राज्यातील लाखो महिलांना केएसआरटीसीच्या लोकल बसमधून मोफत प्रवास करता येणार आहे. शासकीय तिजोरीवर ८०० कोटींचा भार टाकणाऱ्या या लोककल्याणकारी निर्णयाला केरळ मंत्रिमंडळाने अधिकृत मंजुरी दिली आहे. येत्या १५ जूनपासून राज्यातील सरकारी बसमध्ये महिलांना हा मोफत प्रवास मिळणार आहे.

# बदलापुरात दुहेरी हत्याकांड कारमध्ये मृतदेह आढळले

बदलापूर

**बदलापूरच्या** जुवेली गावाजवळ बंद कारमध्ये एक महिला आणि ओला चालकाची धारदार शस्त्राने वार करून हत्या केली. मनिषा भोसले आणि ज्योतिबा शिंदे (चालक) अशी मृतांची नावे आहे. या घटनेच्या वेळी उपस्थित असलेल्या महिलेच्या ३ वर्षांच्या मुलाच्या जबाबावरून पोलीस कसून तपास करत आहेत.

मुलाने पोलिसांना दिलेल्या माहितीनुसार ओला चालकानेच त्याच्या आईवर चाकूने वार करून हत्या केली. चालकाची हत्या कुणी केली आणि या हत्येमागील मूळ कारण कोणते आहे, याचा शोध बदलापूर पोलीस आणि फॉरेन्सिक पथक घेत आहे. मनीषा या जुवेली गावात राहत होत्या. तर ज्योतिबा हे घाटकोपर येथील रहिवासी होते. मनीषाच्या पतीचा घाटकोपर येथे चहाचा व्यवसाय आहे.

# शिवाजीनगर-हिंजवडी मेट्रोचा पहिला टप्पा १५ जुलैपासून सुरू

पुणे

**पुणेकरांसाठी** दिलासादायक बातमी म्हणजे शिवाजीनगर ते हिंजवडी मेट्रो मार्गाचा पहिला टप्पा १५ जुलैपासून प्रवाशांसाठी खुला होणार आहे. या टप्प्यात बाणेरपर्यंत मेट्रो सेवा सुरू करण्यात येणार असून, यासाठीची कामे तातडीने पूर्ण करण्याचे आदेश मुख्यमंत्र्यांनी दिले आहेत.

महानगर आयुक्त डॉ. अभिजित चौधरी यांनी दिलेल्या माहितीनुसार, पहिल्या टप्प्यात एकूण १२ स्थानकांची कामे पूर्ण करून १५ जुलैपर्यंत प्रवासी वाहतूक सुरू करण्याचे नियोजन आहे. त्यामुळे शिवाजीनगर ते बाणेर असा प्रवास मेट्रोने करता येणार आहे. उर्वरित स्थानकांपैकी शिवाजीनगरसह पाच स्थानकांची कामे ऑगस्टपर्यंत पूर्ण होतील, तर उरलेल्या सहा स्थानकांची कामे डिसेंबरपर्यंत पूर्ण करण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. संपूर्ण मार्ग डिसेंबर २०२६ पर्यंत पूर्ण क्षमतेने सुरू करण्याचे लक्ष्य पीएमआरडीएने निश्चित केले आहे. दरम्यान, प्रकल्पाच्या पूर्ण कामासाठी जुलै २०२७ पर्यंत मुदतवाढ मागण्यात आली आहे.

# अखिलेश यादव यांच्या कन्येची आक्षेपार्ह बनावट पोस्ट व्हायरल



लखनौ

**समाजवादी** पार्टीचे अध्यक्ष अखिलेश यादव यांची मुलगी अदिती यादव हिच्या संदर्भात सोशल मीडियावर बनावट आणि आक्षेपार्ह पोस्ट व्हायरल झाल्यामुळे सध्या मोठा वाद निर्माण झाला आहे. सोशल मीडियावर काही समाजकंटकांनी अदिती यादवचे फोटो एडिट करून अत्यंत आक्षेपार्ह आणि दिशाभूल करणाऱ्या पोस्ट शेअर केल्या आहेत. यामध्ये तिच्या वैयक्तिक आयुष्याबद्दल आणि लंडन येथील शिक्षणादरम्यानच्या कथित बाबींवरून अत्यंत खालच्या पातळीवर जाऊन अफवा पसरवल्या जात आहेत.

या पोस्टसोबत कृत्रिम बुद्धिमत्तेने बदल केलेले बनावट फोटो वापरून अपप्रचार केला जात असल्याचा आरोप आहे. या प्रकरणाची गंभीर दखल घेत समाजवादी पक्षाच्या कार्यकर्त्यांनी आणि पदाधिकाऱ्यांनी लखनौ येथील हजरतगंज पोलीस ठाण्यात लेखी तक्रार दाखल केली आहे. दोषींवर २४ तासांच्या आत गुन्हा दाखल करून कडक कारवाई करण्याची मागणी सपा नेत्यांनी केली आहे. कारवाई न झाल्यास राज्यभर तीव्र आंदोलन करण्याचा इशाराही कार्यकर्त्यांनी दिला आहे. समाजवादी पक्षाच्या प्रवक्त्यांनी या संपूर्ण प्रकारामागे विरोधी पक्षाच्या आयटी सेलचा हात असल्याचा थेट संशय व्यक्त केला आहे.

# मणेराजुरीतील तलावात बुडून माय-लेकीचा मृत्यू

तासगाव

**तालुक्यातील** मणेराजुरी येथे तलावात पाय घसरून पडून माय-लेकीचा मृत्यू झाल्याची घटना काल दुपारी घडली. सत्वाला संतोष जाधव (२८) व मंजू संतोष जाधव (१०) अशी या मृत माय-लेकीची नावे आहेत. सत्वाला या पती संतोष यांच्यासह मंजू व अंजू, अविनाश,रोहित या चार मुलांसह मोलमजुरी करण्यासाठी एक महिन्यापूर्वी पुसेसावळी येथून मणेराजुरी येथे आल्या होत्या.

काल दुपारी सत्वाला या आपल्या चार मुलांना घेऊन चिमणखोरा पाझर तलावावर कपडे धुण्यासाठी गेल्या होत्या. सत्वाला या कपडे धूत असताना मंजू ही अंघोळ करण्यासाठी पाण्यात उतरली. तिचा पाय घसरून ती खोल पाण्यात बुडू लागली. मंजूला वाचविण्यासाठी सत्वाला यादेखील पाण्यात उतरल्या. परंतु दोघीही पाण्यात बुडू लागल्या. हे काठावर असणाऱ्या अंजूने पाहताच तिने आरडाओरड केला.

पश्चिम रेल्वे
प्लॅटफॉर्म विस्तार आणि पिट लाईन कामे
वरि. विअभि (दक्षिण) मुंबई सेंट्रल आमंत्रित करीत आहेत ई-निविदा सूचना क्र.: बीसीटी/२६-२७/६५, दि. ०८.०६.२०२६. काम आणि ठिकाण: चर्चगेट-विरार अनुभाग: १. दादर - १५ कार ईएमयू सामावून घेण्याकरिता प्लॅटफॉर्म क्र. ४चा विस्तार. २. मुंबई सेंट्रल (सीएफओ यार्ड): स्टेबलिंग लाईन क्र. २, ३ आणि ४ नष्ट करून २ नवीन बरौनी पिट लाईन्सची तरतूद. कामाचे अंदाजित मूल्य: ₹ २,२६,८२,९११.६२. ईएमडी: ₹ ४,५३,७००/-. सादरीकरणाचा दिनांक आणि वेळ: दि. ०३.०७.२०२६, १५.०० वा. पर्यंत. उघडण्याचा दिनांक आणि वेळ: दि. ०३.०७.२०२६, १५.३० वा. अधिक तपशिलाकरिता कृपया आमची वेबसाईट www.ireps.gov.in येथे भेट द्यावी. 0228
आम्हाला लाईक करा: facebook.com/WesternRly

संस्थापक-नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

संपादकीय

नवाकाळ

।। न मे भक्त प्रणश्यति ।।

# कौतुक सोहळा आणि युद्धस्थितीच्या झळा

एकीकडे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी निर्वाचित पंतप्रधान म्हणून सर्वाधिक काळ पूर्ण करण्याचा कौतुक सोहळा होत असताना आणि देशाच्या विकासाची ग्वाही दिली जात असताना दुसरीकडे घडलेल्या काही घटना या निश्चितच विचार करायला लावणाऱ्या आहेत. पहिली गोष्ट म्हणजे या कौतुक सोहळ्यामध्ये अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प हेही सहभागी झाले. त्यांनी मोदींना एक मोठी कारकीर्द पार पाडल्याबद्दल शुभेच्छा दिल्या. मात्र त्याच दिवशी रात्री अमेरिका, इराणच्या या स्वार्थी संघर्षाच्या हल्ल्याने पुन्हा विचित्र वळण घेतले. होर्मुज बंदरातल्या भारतीय जहाजांवरही हल्ला झाला आणि त्यात जहाजावरचे भारतीय कर्मचारी मृत्यूमुखी पडले आणि पस्तीस जणांची सुटका करण्यात आली. याच पद्धतीने आणखी एक भारतीय जहाज हल्ल्याच्या भक्ष्यस्थानी पडले. दुसरीकडे भारताच्या सुरक्षिततेचे आश्वासन दिले जात असताना जम्मू-काश्मीरमध्ये लष्कराच्याच एका अचानक झालेल्या स्फोटात महाराष्ट्रातले दोन वीर जवान हुतात्मा झाले. आणि तिसरी गोष्ट म्हणजे या कौतुक सोहळ्याच्यानिमित्ताने देशाच्या डिजिटल इंडियाची भरारी सांगितली जात असताना गुगल कंपनीच्या एका डेटा सेंटरमध्ये आग लागल्याचा प्रकार घडला. आणि भारतातल्या सगळ्या प्रमुख शहरांमधली गुगल सेवाही विस्कळीत झाली. मोदींच्या बारा वर्षांच्या कालावधीचा दिवस आणि या घडून आलेल्या घटना यांचा परस्परांशी थेट संबंध जरी नसला तरी एकूणच देशाच्या विकासाची मांडणी करीत असताना अजूनही खूप मोठा टप्पा गाठायचा बाकी आहे. आणि त्याचबरोबर अत्यंत महत्त्वाच्या त्रुटी किंवा उणीवा अनेक व्यवस्थांमध्ये तितक्याच प्रभावीपणे असल्याचे सिद्ध होते. भारत हा जगातल्या अन्य देशांपेक्षा खूप वेगळा देश ठरतो. सर्वाधिक लोकसंख्या, सर्वाधिक विविधता, अशा महत्त्वाच्या कारणांमुळे देशाच्या विकासामध्ये सातत्याने अडथळे निर्माण होत असतात. म्हणूनच विकासाचे कौतुक करत असताना या सगळ्या प्रयत्नांमधल्या उणीवा किंवा त्रुटी तितक्याच गांभीर्याने लक्षात घेण्याची आवश्यकता आहे.

**इराणबरोबरचा वाढता संघर्ष**

अमेरिकेचे अध्यक्ष ट्रम्प शुभेच्छा देत आहेत. परंतु इराणबरोबरच्या संघर्षात भारताला सावध राहण्याची सूचना ते करू शकलेले नाहीत. अन्यथा अमेरिका भारत मैत्रीचा एक स्वाभाविक परिणाम म्हणून होर्मूज बंदरातून कोणत्याही भारतीय जहाजांना धोका उत्पन्न होता कामा नये. आंतरराष्ट्रीय पातळीवरचे संबंध जरी भारताने सुधारले असले तरी अशा या युद्धाच्या प्रसंगात भारतीय जहाजं असतील किंवा युद्धग्रस्त भूमी असलेल्या भारतीयांचं संरक्षण असेल. या सर्वांबाबत काळजी घेण्याची आवश्यकता आहे. अगदी भारतातसुद्धा जम्मू- काश्मीरमध्ये सातत्याने दहशतवादाविरुद्ध संघर्ष सुरू आहे. आता ऊरी येथे ॲक्सिडेंटल ब्लास्ट घडून आला. आणि त्यात महाराष्ट्राच्या दोन सुपुत्रांना वीरमरण आले. जम्मू-काश्मीर परिसरामध्ये एरवीसुद्धा कोणत्याही प्रकारचे स्फोट आणि घातपात, दहशतवादी हल्ले घडून येण्याची शक्यता असते. यासाठी अत्यंत सावध राहण्याची आवश्यकता असते. तशी सावधानता बाळगूनही जर असा ॲक्सिडेंटल स्फोट घडत असेल आणि त्यात दोन वीर जवान गमावण्याची वेळ येत असेल तर ही बाबसुद्धा सावधगिरीच्या उपाययोजनांमध्ये उणीवा असल्याचेच सिद्ध करणारे ठरते. शत्रूच्या हल्ल्यामध्ये किंवा शत्रूशी संघर्ष करताना येणारे वीरमरण, ही जवानांनी स्वीकारलेली सर्वात मोठी जोखीम असते. परंतु लष्कराच्याच व्यवस्थापनामध्ये काहीतरी गडबड गोंधळ होणे आणि अशा त्रुटींमुळे जवानांचे प्राण जाणे हे अत्यंत धक्कादायक ठरते. एकेक जवान तयार करण्यासाठी प्रचंड परिश्रम करावे लागत असतात. प्रचंड मेहनतीने आणि तितक्याच जिद्दीने, निष्ठेने तयार होणाऱ्या जवानांचे संरक्षणसुद्धा महत्त्वपूर्ण मानले पाहिजे. जवान किंवा लष्करातली नोकरी म्हणजे जीव गमावण्याची निश्चिती असे समीकरण करून चालणार नाही. अधिकाधिक जवानांचे जीव वाचवून केला जाणारा संघर्ष हा अधिक विजयी स्वरूपाचा ठरतो. अर्जुन राजेंद्र जाधव हे सातारा जिल्ह्यातल्या शहापूरचे रहिवासी आहेत. तर विक्रम चव्हाण हे नवी मुंबई ऐरोलीचे आहेत. जाधव यांच्या अकरा महिन्यांच्या मुलाच्या पहिल्याच वाढदिवसाच्या एक दिवस आधीच त्यांना वीरमरण यावे. यातून त्या कुटुंबावर कोसळलेला आघात लक्षात घेता येतो.

**परस्परविरोधी परिस्थिती**

महाराष्ट्र सरकारने केवळ शोकसंवेदना व्यक्त करून थांबू नये. तर महाराष्ट्रातल्या वीरगती प्राप्त सुपुत्रांची काळजी घेण्याचा विशेष प्रयत्न केला पाहिजे. लष्कराच्या व्यवस्थांमधल्या या उणिवांमधूनच हा अपघात घडलेला आहे. अशा पद्धतीने आपल्याच जवानांचे आपल्याच गैरव्यवस्थापनातून बळी जाणे अत्यंत दुर्दैवी ठरते. म्हणूनच देशाच्या विकासाचे गोडवे गात असताना अजूनही बऱ्याच गोष्टी दुरूस्त करणे बाकी आहे. आज आपण डिजिटल इंडियाचीदेखील दवंडी पिटत असतो. गेल्या पाच वर्षांत भारताने निश्चितच डिजिटल व्यवहारांमध्ये खूप प्रगती केलेली आहे. परंतु डेटा सेंटरमध्ये आगीसारखी घटना घडते आणि गुगलसेवा विस्कळीत होणे याचा अर्थ अशा दुर्घटनांची संभाव्यता लक्षात घेऊन पर्यायी व्यवस्था तयार करणे तितकेच गरजेचे ठरते. आणि तशी पर्यायी व्यवस्था आजच्या या डिजिटल इंडियामध्ये नाही किंवा त्याचा भारताला अशा पद्धतीने फटका बसू शकतो, हे या ताज्या घटनेतून स्पष्ट होते. आज तर युद्ध अमेरिका, इराणमध्ये सुरू आहे, पण भारतात या युद्धजन्य परिस्थितीच्या झळा आणि अवकळा दिवसेंदिवस तीव्र होत आहेत. पुन्हा नव्याने सुरू झालेला हा संघर्ष भारताची आणखीनच कसोटी पाहणारा ठरू शकतो. खरे तर भारताचा जो काही विकास होतो आहे, तोही एक संघर्षच म्हणावा लागेल. म्हणूनच कौतुक सोहळा साजरा करत असताना सर्वच युद्धस्थितीच्या झळा लक्षात घेणे क्रमप्राप्त ठरते. राजकीय अर्थाने हे कौतुक जरी योग्य असले तरी सामाजिक दृष्टीने त्याचे परिणाम लक्षात घ्यावेच लागतील.

## सुविचार


विलास कोळेकर
मालेवाडी, जि. सांगली. मोबा.९४२२४२०६११

खरे बोलणे हे एक ऑपरेशन आहे. वेदना होतात, पण आराम मिळतो. खोटे बोलणे हे एक पेनकिलर आहे, पटकन आराम मिळतो, पण त्याचे साईड इफेक्ट कायमचे असतात.

## पंचांग

शुक्रवार, १२ जून २०२६
शक १९४८ पराभवनामसंवत्सर

* अधिक ज्येष्ठ कृष्ण द्वादशी
नक्षत्र : अश्विनी / भरणी



रवी उदय- ०६-०२
रवी अस्त- १९-१५

-: जन्मराशी :-
००-०१ ते २४-०० मेष

प्रदोष

मुद्रक, प्रकाशक **सौ. जयश्री रमाकांत खाडिलकर-पांडे** यांनी हे दैनिक नवाकाळ ऑफिस आणि नवाकाळ प्रेस करिता दांगट मीडिया प्रा.लि., पत्ताः प्लॉट नं. २२, दिघा एमआयडीसी, टीटीसी इंडस्ट्रीयल एरीया, विष्णू नगर, दिघा, नवी मुंबई -४००७०८ येथे छापून घेतले व नवाकाळ बिल्डिंग, १३ नवाकाळ पथ, खाडीलकर रोड, गिरगांव, मुंबई -४००००४ येथे प्रसिद्ध केले.
संपादक : **रोहित रमाकांत पांडे** • कार्यकारी संपादकः **समीर करंबे** (*पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी कार्यकारी संपादक यांच्यावर आहे.)

संपर्क : संपादक विभागः ८६५२२०१४४०,
जाहिरात विभाग : ८१०८११६४२३, ८१०८११६४२९,
छोट्या जाहिराती: ८४२२८१७४४५. वितरण विभाग : ९५९४९३६४४१
ई-मेलः contact@navakal.in
'नवाकाळ ऑफिस व नवाकाळ प्रेस'चे प्रकाशन दैनिक 'नवाकाळ' आर.एन.आय.क्र.१८१४/५७
स्थापना ७ मार्च १९२३/ फाल्गुन वद्य ५ शके १८४४

Printed and Published by **Jayshree Ramakant Khadilkar-Pande** On behalf of Navakal Office And Navakal Press. Printed at Dangat Media Pvt. Ltd., Address : Plot No.22, Digha M.I.D.C., TTC Industrial Area, Vishnu Nagar, Digha, Navi Mumbai - 400 708. Published at Navakal Building, 13 Navakal Path, Khadilkar Road, Girgaum, Mumbai - 400 004.
Editor - **Rohit Ramakant Pande** • Executive Editor - **Sameer Karambe** (*As per P.R.B. law Executive Editor will be responsible for all the content in Daily Navakal)

## पाककृती



### कुरकुरीत कोळंबी फ्राय

★ **साहित्य :-** २५० ग्रॅम (स्वच्छ धुतलेली आणि सोललेली), लिंबाचा रस-१ चमचा, मीठ चवीनुसार आणि आले-लसूण पेस्ट-१ चमचा, मैदा, मीठ, काळ्या मिरीची पूड, लाल तिखट- १ ते २ चमचे (आवडीनुसार), गरम मसाला-१ चमचा, हळद-१/२ चमचा, ओरेगॅनो-१ चमचा, २ अंडी, ब्रेड क्रम्स - २ चमचा आणि तेल.



★ **कृती :-** **मॅरिनेशनसाठी-** स्वच्छ धुतलेल्या कोळंबीमध्ये आले- लसूण पेस्ट, लिंबाचा रस व्यवस्थित मिक्स करून घ्या आणि मीठ घालून १० मिनिटे बाजूला ठेवा.

**कोळंबीच्या बाहेरील आवरणासाठी-** एका ताटात मैदा, मीठ, काळ्या मिरीची पूड, लाल तिखट, गरम मसाला, हळद, ओरेगॅनो घ्या. तर दुसऱ्या वाटीत २ अंडी फेटून घ्या. आणखी एक ताट घेऊन त्यात ब्रेड क्रम्स घ्या. अशा प्रकारे तीन मिश्रणे बनवून घ्या. आता कोळंबी मसाला केलेल्या मिश्रणात घोळवून घ्या. त्यानंतर अंड्याच्या मिश्रणात आणि शेवटी ब्रेड क्रम्समध्ये घोळवून घ्या. गॅस लावून त्यावर एक पॅन ठेवा. पॅनमध्ये तेल टाका. आता गरम तेलात कोळंबी मध्यम आचेवर दोन्ही बाजूंनी सोनेरी आणि कुरकुरीत होईपर्यंत तळून घ्या. खाताना लिंबू, कांद्याच्या फोडीसोबत द्या.



## क्रीडा

# आजपासून महिला टी-२० विश्वचषकाला सुरुवात

## उद्घाटनाचा सामना इंग्लंड आणि श्रीलंकेत होणार



**इंग्लंडमध्ये आजपासून आयसीसी महिला टी-२० विश्वचषक स्पर्धा सुरू होणार आहे. बर्मिंगहॅमच्या एजबॅस्टन मैदानावर होणाऱ्या या स्पर्धेच्या अ गटातील पहिला सामना इंग्लंड आणि श्रीलंकेमध्ये होणार आहे. यजमान संघ इंग्लंड जोरदार सुरुवात करेल, अशी अपेक्षा आहे, परंतु श्रीलंकेची कर्णधार चमारी अटापट्टू या सामन्यात अनपेक्षित निकाल लावण्याच्या प्रयत्नात असेल. तर १४ जून रोजी भारतीय महिला संघ आपल्या पहिल्या सामन्यात पाकिस्तानशी भिडणार आहे. या सामन्यासाठी भारतीय महिला खेळाडूंनी मैदानावर जोरदार सराव केला.**

■ लंडन

**इंग्लंड** महिला संघ हा जागतिक क्रिकेटमध्ये श्रीलंका संघापेक्षा अधिक मजबूत, अनुभवी आणि संतुलित मानला जातो. आक्रमक फलंदाजी आणि दर्जेदार फिरकी गोलंदाजी हे इंग्लंडचे मुख्य बलस्थान आहे, तर श्रीलंका संघ प्रामुख्याने कर्णधार चमारी अटापट्टू यांच्यावर जास्त अवलंबून असतो. नॅट सायव्हर-ब्रंटच्या कर्णधारपदाखाली इंग्लंडचा संघ विश्वचषक प्रवासाची ही सुरुवात आहे आणि हा संघ स्पर्धेत प्रमुख दावेदारांपैकी एक म्हणून उतरणार आहे. सलामीवीर डॅनी वायट-हॉज आणि सोफिया डंकले यांच्याकडून इंग्लंड संघाला चांगल्या खेळीची अपेक्षा आहे. तर ॲलिस कॅप्सी, हेदर नाईट आणि यष्टीरक्षक-फलंदाज एमी जोन्स या चांगल्या फार्मात आहेत.

भारतीय सलामीवीर शेफाली वर्मा आणि स्मृती मंधाना चांगल्या फॉर्ममध्ये असून आता या जोडीवर आपल्या संघाला चांगली सुरुवात करून देण्याची जबाबदारी असणार आहे. जेमिमा रोड्रिग्स, रिचा घोष आणि कर्णधार हरमनप्रीत कौर चांगल्या फॉर्ममध्ये खेळत आहेत. इंग्लंडच्या खेळपट्टीवर वेगवान गोलंदाजांना चांगली मदत मिळते. रेणुका सिंह, क्रांति गौड, नंदिनी शर्मा यांनी आपल्या गोलंदाजीने सर्वांना प्रभावित केले आहे. नंदिनी शर्माने आपल्या डेब्यू मॅचमध्ये शानदार कामगिरी केली होती. भारतीय संघातील स्पिनर्स गोलंदाजीदेखील अत्यंत प्रभावी अशी ठरली आहे. श्री चरणी आणि राधा यादव यांनी आपल्या फिरकीने फलंदाजांना अनेकदा अडचणीत आणले आहे. तसेच श्रेयांका पाटील देखील चांगल्या फॉर्ममध्ये खेळत आहे. त्यामुळे आता सर्व बाजूने भारतीय संघ मजबूत स्थितीत दिसून येत आहे. या कारणांमुळे भारतीय संघ यंदाचा वर्ल्ड कप जिंकण्यासाठी प्रबळ दावेदार समजला जात आहे.

## महापौर ॲक्रोबॅटिक्स जिम्नॅस्टिक्स स्पर्धा
## नारायणराव आचार्य विद्यानिकेतन अजिंक्य

■ मुंबई

**यजमान** श्री नारायणराव आचार्य विद्यानिकेतन संघाने मुंबई महापौर चषक निमंत्रित ॲक्रोबॅटिक्स जिम्नॅस्टिक्स स्पर्धेत आपली विजयी परंपरा कायम राखताना विजेतेपदाचा मान पटकावला. चेंबूर येथील विद्यानिकेतनच्या मैदानावर झालेल्या या स्पर्धेत १५ संघांतील २५० पेक्षा जास्त खेळाडूंचा सहभाग होता. २००२ ते २०२६ दरम्यान झालेल्या या स्पर्धेत विजेते पदाचा मान श्री नारायणराव आचार्य विद्यानिकेतन संघाने अबाधित ठेवला.

लोकमान्य शिक्षण संस्थेचे सचिव माणिक पाटील यांच्या हस्ते स्पर्धेचे उद्घाटन करण्यात आले. या स्पर्धेसाठी स्थानिक आमदार सना मलिक, वरिष्ठ पोलीस निरीक्षक रवींद्र मोहिते, जयप्रकाश अग्रवाल, लोकमान्य शिक्षण संस्थेचे विश्वस्त सुबोध आचार्य, हरिश्चंद्र गवस, हिरा मोराळे, डॉ. महेंद्र चेंबूरकर, सचिव मोहन बामणे, आंतरराष्ट्रीय पंच मंदार म्हात्रे यांनी स्पर्धेला उपस्थिती लावून खेळाडूंना प्रोत्साहन दिले. देव स्पोर्ट्स ॲकॅडमीला उपविजेतेपद मिळाले. स्पर्धा यशस्वी करण्यासाठी राहुल ससाणे, सुनील रणपिसे, योगेश पवार, रमेश सकट, सुहास यादव आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी अथक मेहनत घेतली.

## दिल्लीत जन्मलेल्या निखिल चौधरीचा ऑस्ट्रेलियाच्या टी-२० संघात समावेश

■ सिडनी

**सध्या** बांगलादेश दौऱ्यावर असलेल्या ऑस्ट्रेलियन संघाने आपल्या टी-२० संघात एक मोठा बदल केला. त्यांनी ट्रॅव्हिस हेडच्या जागी दिल्लीत जन्मलेल्या निखिल चौधरीचा समावेश केला. जर निखिल चौधरीला बांगलादेशविरुद्ध पदार्पण करण्याची संधी मिळाली, तर तो ६० वर्षांहून अधिक काळात ऑस्ट्रेलियासाठी खेळणारा भारतीय वंशाचा पहिला खेळाडू ठरू शकतो. ऑस्ट्रेलिया व बांगलादेश यांच्यात सध्या ३ एकदिवसीय सामन्यांची मालिका सुरू आहे. त्यानंतर १७ जूनपासून ३ सामन्यांची टी-२० मालिका होईल. ट्रॅव्हिस हेड वैयक्तिक कारणांमुळे रजेवर आहेत. गुरिंदर संधू व तनवीर संघा यांच्यासह भारतीय वंशाचे अनेक खेळाडू ऑस्ट्रेलियाच्या आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये खेळले आहेत. परंतु १९६० च्या दशकापासून कोणताही भारतीय वंशाचा खेळाडू ऑस्ट्रेलियन संघाकडून खेळलेला नाही. त्यावर्षी गुजरातमध्ये जन्मलेले लेग-स्पिनर रेक्स सेलर्स १९६४ च्या कोलकाता कसोटीत खेळले होते. जेव्हा कोरोनामुळे आंतरराष्ट्रीय सीमा बंद झाल्या, तेव्हा तो क्वीन्सलँडमध्ये आपल्या काकांना भेटायला गेला होता, ज्यामुळे त्याला ऑस्ट्रेलियामध्ये आपले क्रिकेटचे स्वप्न पूर्ण करण्याची संधी मिळाली.

## द्रविडचा मुलगा अन्वय भारतीय अंडर-१९ संघात

**मुंबई - भारतीय** अंडर-१९ संघ ४ जुलैपासून सुरू होणाऱ्या श्रीलंका दौऱ्यात ३ एकदिवसीय आणि २ बहुदिवसीय सामने खेळवले जाणार आहेत. बीसीसीआयच्या कनिष्ठ निवड समितीचे अध्यक्ष एस. शरथ यांनी या संघाची घोषणा केली. या संघात माजी कर्णधार राहुल द्रविडचा मुलगा अन्वय द्रविड याची निवड केली. यशवर्धन सिंह चौहान याच्याकडे दोन्ही संघांचे कर्णधारपद सोपवण्यात आले असून, १७ वर्षे आणि ४५ दिवसांचा असताना अन्वय यापूर्वीही भारताच्या १९ वर्षांखालील ब संघाचा भाग राहिला होता.

**जाहीर सूचना**

तमाम जनतेस याद्वारे सूचना देण्यात येते की, आमचे अशील, नानिक गोबिंदराम हेमरजनी यांच्यासह त्यांच्या भूखंड क्र. २९ए, सीटीएस. क्र. सी-३३२ए, पेरी रोड आणि पेरी क्रॉस रोडचे जंक्शन, वांद्रे (पश्चिम), मुंबई - ४०००५० येथे स्थित बांद्रा सी व्ह्यू रेसिडेन्ट्स असोसिएशन (पूर्वीची कल्पक हाईट्स रेसिडेन्ट्स असोसिएशन)च्या कल्पक हाईट्स या इमारतीमधील ११ व्या मजल्यावरील सदनिका क्र. १, मोजमाप ६३५ चौ.फू. बिल्ट-अप क्षेत्रफळ आणि सदनिका क्र. २ मोजमाप ४९५ चौ.फू. बिल्ट-अप क्षेत्रफळ व त्यासह संलग्न गच्ची मोजमाप ६८१ चौ.फू.च्या मालकीहक्क आणि अधिकारांच्या विक्री आणि हस्तांतरणाकरिता बोलणी करीत आहेत.
उपरोल्लेखित सदनिकांच्या संदर्भात विक्री, हस्तांतरण, कंत्राट/करारपत्र, गहाणवट, प्रभार, धारणाधिकार, वडिलोपार्जित मिळकत, परवाना, भाडेपट्टी, उप-भाडेपट्टी, अभिहस्तांकन, न्यास, वहिवाट, देवाणघेवाण, वारसाहक्क, भेट, वारसा, उत्तराधिकार, देखभाल, भोगवटा, ताबा, या मार्गे किंवा अन्यथा कशाही प्रकारे कोणत्याही स्वरुपाचा कोणताही हक्क, लाभ, हितसंबंध, आक्षेप, दावा किंवा मागणी असणाऱ्या कोणत्याही व्यक्तींनी सदर प्रसिद्धीच्या १४ दिवसांमध्ये निम्नस्वाक्षरीकारांना सहाय्यक कागदोपत्री पुराव्यांसह लेखी स्वरुपात निम्नस्वाक्षरीकार यांना ब्लॉक क्र. २०, ५वा मजला, "राज महल", ८४, वीर नरिमन रोड, चर्चगेट, मुंबई - ४०००२० येथे किंवा aurup@jnalw.in येथे ईमेल करून सूचित करावे असे न केल्यास दावे, जर असल्यास, विचारात घेण्यात येणार नाही आणि सोडून दिले किंवा त्याग केले असे समजण्यात येईल आणि आमचे अशील व्यवहार पूर्ण करतील.
दिनांक १२ जून, २०२६
मे. झांगियानी नरुला ॲण्ड असोसिएट्स,
ॲडव्होकेट्स

**जाहीर सूचना**

याद्वारे सूचना देण्यात येते की, सौ. अर्चना अजय रावराणे या नाहूर, कुर्ला, मुंबई उपनगर येथील सीटीएस क्र. ८३४(अ), ८३५, ८३६ आणि ८३६ (भाग) धारण केलेल्या जमिनीवर बांधलेल्या "जय भवानी (नाहूर) एस.आर.ए. सीएचएस लि."च्या १ल्या मजल्यावरील सदनिका क्र. १०६, मोजमाप २६९ चौ.फू. कार्पेट क्षेत्रफळचे मालक आहेत. मूळ श्री. पांडुरंग झुंगाजी बेंडारी यांचे दि. ०३.०५.२०२१ रोजी निधन झाले आणि श्रीमती इंदुबाई पांडुरंग बेंडारी यांचे दि.१९.०६.२०२१ रोजी निधन झाले, त्यांच्या पश्चात त्यांचे केवळ कायदेशीर वारस १) श्री. राजेंद्र पांडुरंग बेंडारी, २) सौ. सुरेखा कांतिलाल भारमल, ३) सौ. विनया विनायक शिंदे आणि ४) सौ. मिरा यादव मेमाणे हे आहेत. त्यानंतर श्री. राजेंद्र पांडुरंग बेंडारी, सौ. सुरेखा कांतिलाल भारमल आणि सौ. विनया विनायक शिंदे यांनी सदर सदनिकेच्या संदर्भातील त्यांचे समभाग नोंदणी क्र. मुंबई-२८-८३४२/२०२६ असलेल्या हक्कसोड करारनामा दिनांक १३.०४.२०२६ नुसार सौ. मिरा यादव मेमाणे यांच्या नावे सोडले, सदर सौ. मिरा यादव मेमाणे यांनी सदर मालमत्ता सौ. अर्चना अजय रावराणे यांना विकली.
कोणा व्यक्ती/क्तींचा सदर सदनिका किंवा तिच्या कोणत्याही भागामध्ये, करिता किंवा त्यावर विक्री, देवाणघेवाण, गहाणवट, प्रभार, भेट, न्यास, वारसा, ताबा, भाडेपट्टी, उप-भाडेपट्टी, अभिहस्तांकन, हस्तांतरण, भाडेकरू, पोट-भाडेकरू, मृत्युपत्र, उत्तराधिकार, परवाना, देखभाल, प्रलंबित कायदेशीर कारवाई, कर्ज, अग्रीम, धारणाधिकार, तारण, कोणत्याही न्यायालय, कर किंवा महसूल किंवा वैधानिक प्राधिकारी यांच्याद्वारे मंजूर किंवा पारित आदेश, निवाडा किंवा हुकूम, जप्ती, तडजोड या मार्गे किंवा अन्यथा इतर कोणत्याही प्रकारे कोणताही दावा असल्यास त्यांनी वैध कागदोपत्री पुराव्यासह लेखी स्वरुपात निम्नस्वाक्षरीकारांना बी/१०६, १ ला मजला, सयीद मंझिल सीएचएस लि., पंडित दीनदयाल नगर, बसिन कॅथोलिक बँक लि. माणिकपूर समोर, वसई (प), जि. पालघर - ४०१२०२ येथे सदर सूचना प्रसिद्धी दिनांकापासून १४ दिवसांच्या आत कळवावे, असे न केल्यास, कोणतेही दावे अस्तित्वात नाही आणि जर असल्यास, ते सोडून दिले किंवा त्याग केले असे समजण्यात येईल.
वसई, दिनांक १२ जून, २०२६.
सही/-
डेव्हीड एस. डाबरे
वकील उच्च न्यायालय, मुंबई

**बृहन्मुंबई महानगरपालिका**

घन कचरा व्यवस्थापन

निविदेकरिता सूचना

**विषयः पावसाळ्याच्या कालावधीत भूस्खलनाच्या आपत्तीचा सामना करण्यासाठी बृहन्मुंबईच्या पूर्व उपनगरांमध्ये तैनात असलेल्या एन.डी.आर.एफ. पथकाच्या वापराकरिता, भाडेतत्त्वावर एका बसची (३५ आसनक्षमता) नियुक्ती - गट अ ते गट ब**

घन कचरा व्यवस्थापन, बृहन्मुंबई महानगरपालिका (बीएमसी)चा परिवहन विभाग "पावसाळ्याच्या कालावधीमध्ये भूस्खलनाच्या आपत्तीचा सामना करण्यासाठी बृहन्मुंबईच्या पूर्व उपनगरांमध्ये तैनात असलेल्या एन.डी.आर.एफ. पथकाच्या वापराकरिता भाडेतत्त्वावर एका बसची (३५ आसनक्षमता) नियुक्ती - गट अ ते गट ब" या कामाकरिता निविदा दस्तऐवजामध्ये उल्लेखित अनिवार्य पूर्व-पात्रता निकषानुसार पात्र निविदाकारांकडून ऑनलाईन बोली आमंत्रित करीत आहेत.

**महाटेंडर बोली क्र.** : २०२६_बृमुंमपा_१३०७५६४_१ (गट अ)
: २०२६_बृमुंमपा_१३०७५६६_१ (गट ब)
**बोली सुरुवात दिनांक आणि वेळ** : दि. १२.०६.२०२६ रोजी स. ११.०० नंतर
**बोली समाप्ती दिनांक आणि वेळ** : दि. १८.०६.२०२६ रोजी सायं. १६.०० नंतर

बोली महाराष्ट्र शासनाच्या ई-प्रापण प्रणाली पोर्टल (महाटेंडर्स) (http://mahatenders.gov.in) येथून डाऊनलोड करता येतील. तसेच निविदा प्रती बीएमसी पोर्टल येथून "ई-प्रोक्युअरमेन्ट" अनुभागाअंतर्गत डाऊनलोड करता येतील.

कृपया नोंद घ्यावी की, बोली दस्तऐवज टपालाने पारित करण्यात अथवा स्वीकारण्यात येणार नाही. यापुढे सदर निविदेबाबत सर्व बदल, सूचना, अद्यतने, सुधारणा, शुद्धीपत्रके, पुढील तपशील, इ. फक्त महाटेंडर पोर्टलवर प्रसिद्ध करण्यात येतील.

सही/-
कार्यकारी अभियंता
परिवहन (शहर)
पीआरओ/५५१/जाही./२०२६-२७

थोडासाही ताप येता, डॉक्टरांना जाऊन भेटा

MAHATRANSCO
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

**NOTICE INVITING TENDER CPD/22 - 2026 - 27**

Tenders are invited through e-Tendering in SRM Two Bid system from the registered vendors for Supply of following:

| Tender No. & Description of Material | Estimated Amount (in Rs. Lakhs) (Inclusive of all Taxes) / Tender Fee (in Rs.) (Non-refundable) (to be paid online) | Due Date & Time (Hrs.) for Submission & Opening of Tender |
|---|---|---|
| **SP/T-0703/0626 RFx 7000040251 (4th Call)** for Hiring of Consultant for support of ISO 27001:2022 certification and adoption of IT Cyber Security Policies and Procedures. | Rs.118.00/- Lakhs | 19.06.2026 17:00 Hrs |
| | 5,000.00+GST | 19.06.2026 17.30 Hrs |

**Contact Person:** Office of the Executive Engineer (VII)
CPA, C.O. MSETCL, 1st Floor, Prakashgad Building, Bandra (E), Mumbai. Tel. No.: 022-69852717
**Email id: cecpa@mahatransco.in, secpa@mahatransco.in, eegrp8@mahatransco.in, eepc@mahatransco.in**
For further details visit our website **https://srmetender.mahatransco.in/**
Any further amendments/clarifications will be published on the MSETCL website **www.mahatransco.in. & https://srmetender.mahatransco.in/** . Bidders are therefore requested to check these websites for further updates.

Sd/-
Executive Engineer (P&C)

देश विदेश

# वंदे भारत एक्स्प्रेस अनंतनागलाही थांबणार



■ श्रीनगर

**जम्मू-काश्मीर** राज्यातील प्रस्तावित रेल्वे प्रकल्पांवर चर्चा करण्यासाठी रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांनी जम्मू आणि काश्मीरचे मुख्यमंत्री ओमर अब्दुल्ला यांची भेट घेतली. वंदे भारत एक्स्प्रेसचा अनंतनागमध्ये एक नवीन थांबा देण्याचा निर्णय घेण्यात आला. राज्याचे मुख्यमंत्री ओमर अब्दुल्ला यांनी या निर्णयाचे स्वागत करत म्हटले की, वंदे भारत सेवेमुळे जम्मू आणि श्रीनगर दरम्यानचा प्रवास अधिक जलद, सोयीस्कर आणि आरामदायी झाला आहे. सुधारित रेल्वे सेवांचा फायदा स्थानिक आणि पर्यटकांना होत आहे. रेल्वे जाळ्याच्या विस्तारामुळे जम्मू आणि काश्मीरची अर्थव्यवस्थाही मजबूत झाली आहे. सफरचंद, चेरी आणि सिमेंट यांसारख्या उत्पादनांच्या वाहतुकीतील सुलभतेमुळे शेतकऱ्यांना आणि व्यावसायिकांना नवीन बाजारपेठा मिळण्यास मदत होत आहे.

सविस्तर वाचण्यासाठी व शेअर करण्यासाठी हा क्युआर कोड स्कॅन करा

रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव म्हणाले की, केंद्र सरकार जम्मू आणि काश्मीरच्या विकासासाठी कटिबद्ध आहे. स्थानिक लोकांच्या गरजा लक्षात घेऊन अनंतनागमध्ये नवीन वंदे भारत थांबा सुरू केला जात आहे, ज्यामुळे या भागाच्या विकासाला आणि कनेक्टिव्हिटीला नवी चालना मिळेल.

# सहारनपुरात उंच पाण्याच्या टाकीवरून पडून तरुणाचा मृत्यू

■ सहारनपूर

**उत्तर** प्रदेशच्या सहारनपूर येथील कुतुबशेरमध्ये उंच पाण्याच्या टाकीवरून कोसळून तरुणाचा मृत्यू झाला. याप्रकरणी पोलिसांनी पंचनामा करून तो शवविच्छेदनासाठी पाठवला असून, या प्रकरणाचा सविस्तर तपास सुरू केला आहे.

उष्णतेपासून सुटका मिळवण्यासाठी हा तरुण रात्रीच्या वेळी रेल्वे क्वार्टरजवळ असलेल्या उंच पाण्याच्या टाकीवर जाऊन झोपला होता. मात्र झोपेत असताना अचानक कुस बदलताना त्याचा समतोल पूर्णपणे बिघडला आणि तो इतक्या उंचावरून थेट खाली जमिनीवर कोसळला. डोक्याला आणि शरीराला गंभीर दुखापत झाल्यामुळे त्याचा जागीच मृत्यू झाला. सकाळी जेव्हा स्थानिक लोकांनी पाण्याच्या टाकीजवळ या तरुणाचा रक्ताळलेला मृतदेह पाहिला, तेव्हा तिथे एकच गोंधळ उडाला.

# स्वीडनमधील शाळांमध्ये मोबाईल बंदी! पुस्तकांवर भर

■ स्टॉकहोम



स्वीडनमध्ये आगामी शैक्षणिक वर्षापासून शाळांमध्ये विद्यार्थ्यांच्या मोबाईल वापरावर बंदी घालण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. विद्यार्थ्यांचा स्क्रीन टाईम कमी करून पुस्तकाधारित शिक्षणाला प्राधान्य देण्यावर सरकारचा भर आहे.

स्वीडनमधील विद्यार्थ्यांच्या वाचन-लेखन क्षमतेत घट झाल्याचे दिसून आले आहे. नववीतील सुमारे २४.३ टक्के विद्यार्थ्यांना मूलभूत वाचन कौशल्यही गाठता आलेले नाही. त्यामुळे पारंपरिक शिक्षणपद्धती अधिक प्रभावी ठरते, असा निष्कर्ष काढण्यात आला आहे. त्यामुळेच आता मोबाईल वापरावर बंदी घालण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. या निर्णयानुसार, वर्गात मोबाईल आणल्यास ते आधी जमा करावे लागतील आणि तास संपल्यानंतर परत दिले जातील. तसेच नवीन पाठ्यपुस्तके आणि शिक्षकांसाठी मार्गदर्शक साहित्य खरेदी करण्यासाठी सरकारने सुमारे ५९ दशलक्ष डॉलर्सचा निधी मंजूर केला आहे. दोन वर्षांखालील मुलांसाठी डिजिटल साधनांवर पूर्ण बंदी घालण्यात आली असून, २०२८ पर्यंत पूर्णपणे पुस्तकाधारित अभ्यासक्रम लागू करण्याचे उद्दिष्ट आहे. पालकांनीही घरात 'स्क्रीन-फ्री' वातावरण तयार करावे, असा सल्ला देण्यात आला आहे. स्वीडनसह डेन्मार्क, फिनलँड यांसारख्या देशांनीही अशाच प्रकारचे निर्बंध लागू केले आहेत. स्पेन, दक्षिण कोरिया आणि अमेरिका या देशांतील काही शाळांतही स्क्रीन टाईमवर मर्यादा आणण्यात आल्या आहेत.

# लंडनमध्ये मराठी दाम्पत्यासह मुलाचा गूढ मृत्यू! आत्महत्या की अपघात?

■ लंडन

**लंडनमध्ये** राहाणाऱ्या मराठी दाम्पत्याचा गूढ परिस्थितीत मृत्यू झाल्याची धक्कादायक घटना घडली आहे. बांधकाम क्षेत्रातील वरिष्ठ सल्लागार अदिती परळकर, त्यांचे पती राकेश पै आणि त्यांचा नऊ वर्षीय मुलगा सिड हे त्यांच्या इमारतीच्या आवारात मृतावस्थेत आढळले. इमारतीतील ३६ व्या मजल्यावरील त्यांच्या अपार्टमेंटमधून जवळपास ४०० फूट खाली पडल्यामुळे तिघांचा मृत्यू झाला. हा अपघात होता की आत्महत्या, याचा तपास सुरू आहे.

राकेश पै आणि अदिती पराळकर २००० साली मुंबईहून लंडनला स्थलांतरित झाले होते. तिथे दोघांचीही कारकीर्द यशस्वी होती. राकेश पै आर्थिक सल्लागार म्हणून काम करत होते, तर अदिती पराळकर बांधकाम क्षेत्रात वरिष्ठ पदांवर होत्या. कुटुंबाचे आयुष्य सामान्यपणे चालले होते. परंतु त्यांचा मुलगा सिडच्या गंभीर आरोग्य समस्यांमुळे परिस्थिती हळूहळू गुंतागुंतीची झाली. सिडला लहानपणापासूनच लर्निंग डिसॲबिलिटी, अंशतः शारीरिक व्यंग आणि मूत्रपिंडाचा आजार होता. त्याच्या या स्थितीमुळे त्याला विशेष देखभालीची गरज होती. त्यामुळेच त्याच्या बालपणातील बराचसा काळ त्याचे शिक्षण घरीच झाले होते.

# सौदीकडून 'रियाध एअर' नवी विमान कंपनी सुरू

■ रियाध

**मध्य पूर्वेतील** युद्धामुळे निर्माण झालेली आर्थिक अस्थिरता असताना सौदी अरेबियाने एका वर्षापेक्षा जास्त काळाच्या विलंबानंतर आज आपली दुसरी राष्ट्रीय विमान कंपनी 'रियाध एअर' सुरू केली. रियाध एअरच्या पांढऱ्या आणि लॅव्हेंडर रंगाचे बोईंग ७८७ ड्रीमलायनर विमानाने लंडनला पहाटे २.३० वाजता उड्डाण केले. या कंपनीद्वारे सौदी अरेबियाच्या तेलावरील आर्थिक अवलंबित्व कमी करण्याचा प्रयत्न सुरू आहे.

या विमान कंपनीने बोईंग आणि एअरबस या कंपन्यांकडून मोठ्या प्रमाणावर विमानांची खरेदी केली. यामध्ये प्रामुख्याने बोईंग ७८७-९ ड्रीमलायनर विमानांचा समावेश आहे. भारतीय प्रवाशांच्या सोयीसाठी रियाध एअरने भारताच्या एअर इंडियासोबत महत्त्वपूर्ण सामंजस्य करार केला आहे. सौदीच्या 'व्हिजन २०३०'अंतर्गत पर्यटनाला चालना देणे आणि रियाधला जागतिक विमान वाहतूक केंद्र बनवणे हे या कंपनीचे मुख्य उद्दिष्ट आहे.

# हिमाचलमधील २० शाळा बंद! ७३ शाळांचे विलीनीकरण होणार

■ सिमला

**हिमाचल** प्रदेश सरकारने शून्य विद्यार्थी संख्या असलेल्या २० सरकारी प्राथमिक आणि माध्यमिक शाळा तत्काळ प्रभावाने बंद करण्याचा निर्णय घेतला, तर ७३ सरकारी प्राथमिक आणि माध्यमिक शाळांचे विलीनीकरण करण्यात आले. या संदर्भात शिक्षण सचिव राकेश कंवर यांनी एक अधिसूचना जारी केली.

अधिसूचनेनुसार, एकूण १८ प्राथमिक आणि दोन माध्यमिक शाळा अधिसूचित क्षेत्राबाहेर काढण्यात आल्या आहेत. यामध्ये बिलासपूर, चंबा, कुल्लू, मंडी आणि सिमला जिल्ह्यांमधील शाळांचा समावेश आहे. सिमला जिल्ह्यात



सर्वाधिक १० शाळा बंद झाल्या आहेत. मंडी जिल्ह्यात पाच, चंबा जिल्ह्यात दोन, तर बिलासपूर आणि कुल्लूमध्ये प्रत्येकी एक शाळा बंद करण्यात आली आहे. राज्यातील शिक्षण व्यवस्था सुव्यवस्थित करण्याच्या उद्देशाने हा निर्णय घेण्यात आला आहे. राज्यातील ७३ शासकीय प्राथमिक आणि माध्यमिक शाळांचे तत्काळ प्रभावाने विलीनीकरण केले आहे. ज्या शाळांमध्ये विद्यार्थ्यांची संख्या पाच किंवा त्यापेक्षा कमी होती, त्यांच्यासाठी हा निर्णय घेण्यात आला. विलीन झालेल्या शाळांमध्ये ६५ शासकीय प्राथमिक शाळा (जीपीएस) आणि आठ शासकीय माध्यमिक शाळा (जीएमएस) यांचा समावेश आहे.

# बुलेट ट्रेनसाठीचा सिमेंट प्रकल्प सील प्रदूषण नियमांचे उल्लंघनाचा ठपका

■ पालघर

**मुंबई** अहमदाबाद हायस्पीड रेल्वे (बुलेट ट्रेन) च्या कामासाठी एल अँण्ड टी कंपनीने उभारलेला सिमेंट काँक्रीट प्रकल्प (आरएमसी प्लँट) जलसार ग्रामपंचायतीने सील केला आहे. या प्रकल्पातून प्रदूषण होत असल्याच्या तक्रारी स्थानिकांनी केल्यानंतर ग्रामपंचायचीने ना हरकत दाखला रद्द करून तहसीलदारांनी प्रकल्प सील केला आहे.

मुंबई अहमदाबाद हायस्पीड रेल्वे (बुलेट ट्रेन) चे काम प्रगतीपथावर आहे. या ट्रेनचा मार्ग पालघर जिल्ह्यातील ७३ तर वसई-विरारमधील २१ गावांतून जाणार आहे. या प्रकल्पाचे काम लार्सन अँड टुब्रो कंपनीकडे देण्यात आले आहे. कंपनीने दोन वर्षांपूर्वी पालघर जिल्ह्यातील सफाळे येथील जलसार गावात सिमेंट काँक्रीटचा (आरएमसी) प्रकल्प उभारला होता. मात्र या प्रकल्पातून धूळीचे वायू प्रदूषण होत असल्याच्या तक्रारी ग्रामस्थांनी केल्या होत्या. आगरी सेनेने याबाबत माहिती अधिकाराअंतर्गत माहिती मागवली असता महाराष्ट्र प्रदूषण मंडळाची कुठलीच परवानगी नसल्याचे स्पष्ट झाले होते. याबाबत आगरी सेनेने महसूल विभागाकडे तक्रारी केल्या होत्या. जलसार ग्रामपंचायचीने या प्रकल्पाला ना हरकत दाखला दिला होता. ग्रामपंचायतीने हा ना हरकत दाखला रद्द केला असून, तहसीलदारांनी प्रकल्प सील केला आहे. कंपनीने प्रदूषण मंडळाच्या परवानग्या घेतल्या नव्हत्या. त्यामुळे आम्ही प्रकल्प सील केला आहे, अशी माहिती पालघरचे तहसीलदार रमेश शेंडगे यांनी दिली.


## ठाणे महानगरपालिका, ठाणे

भांडारगृह विभाग
निविदा सुचना

भांडारगृह विभागाकडुन लेखापरिक्षण विभागाकडील सन २०२४-२०२५ व सन २०२५-२०२६ या आर्थिक वर्षातील लेखापरिक्षण अहवाल छपाई करणेकरीता निविदा मागविण्यात येत आहे निविदा सुचना व निविदा प्रपत्र https://mahatenders.gov.in वर दि.१२/०६/२०२६ पासुन दि.१८/०६/२०२६ पर्यंत उपलब्ध आहे. शासन मान्य अंगिकृत संस्था तसेच उपक्रम यांनी सुध्दा मनपाच्या अटी-शर्तीस अधिन राहून निविदा भरण्यास हरकत नाही. ऑनलाईन निविदा ठाणे महानगरपालिकेच्या संकेतस्थळांवर दि.१८/०६/२०२६ रोजी सायंकाळी ४.०० वाजेपर्यंत स्विकारण्यात येतील. तसेच सदरच्या निविदा दि.२२/०६/२०२६ रोजी दुपारी ४.३० वाजता उघडण्यात येतील.

ठामपा/पिआरओ/ भां.वि/१९०/२०२६-२७ सही/-
दि:११.०६.२०२६ उपआयुक्त
plsvisitourofficialweb-site भांडारगृह विभाग
www.thanecity.gov.in ठाणे महानगरपालिका,ठाणे

**अनधिकृत बांधकामाला आळा घाला..**
**अनधिकृत बांधकाम दिसल्यास प्रभाग समितीत तक्रार करा !**

## ठाणे महानगरपालिका, ठाणे

सा.बां.विभाग
निविदा सुचना

ठाणे महानगरपालिका क्षेत्रातील "रस्ते दुरुस्ती (मुख्यालय)" या लेखाशिर्षकाअंतर्गत १) मुंब्रा प्रभाग समिती अंतर्गत प्र.क्र. ३२ मधील कौसा येथे सुलताना अपार्टमेंट, खडी मशीन रोड येथे रस्ता दुरुस्ती करणे. २) मुंब्रा प्रभाग समिती अंतर्गत प्र.क्र. ३२ मधील दर्गा रोड, मस्जिद लगत येथे रस्ता दुरुस्ती करणे. या दोन कामाकरिता ऑनलाईन निविदा मागविण्यात येत आहेत. ज्या कंत्राटदारांविरुध्द शासकीय/ निमशासकीय/ सार्वजनिक क्षेत्रातील संस्था व उपक्रम / स्थानिक स्वराज्य संस्था इ. यांनी शिस्तभंगाचे कार्यवाहिच्या अनुषंगाने नोंदणीपत्र रद्द करण्याची कार्यवाही केली / सुरु आहे, अशा कंत्राटदारांना निविदा प्रक्रियेत भाग घेता येणार नाही. निविदा सुचना ठाणे महानगरपालिकेचे संकेतस्थळ https:://mahatenders.gov.in वर दि.१२/०६/२०२६ ते दि.१९/०६/२०२६ पर्यंत उपलब्ध आहे. ऑनलाईन निविदा महापालिकेचे संकेतस्थळ येथे दि.१९/०६/२०२६ रोजी पर्यंत सायं. १६.०० वाजेपर्यंत स्विकारण्यात येतील. निविदा दि.२२/०६/२०२६ सायं. १६.०० वाजता निविदाकार अथवा त्यांचे प्रतिनिधी समक्ष उघडण्यात येतील.

ठामपा/पिआरओ/ सा.बा मुं. प्र.स/१९१/२०२६-२७ **सही/-**
दि.११.०६.२०२६ कार्यकारी अभियंता
**Pls visit our oficial web-site** ठाणे महानगरपालिका,ठाणे
**www.thanecity.gov.in**

**अनधिकृत बांधकामाला आळा घाला..**
**अनधिकृत बांधकाम दिसल्यास प्रभाग समितीत तक्रार करा !**

## TENDER NOTICE

MAHATRANSCO
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

MSETCL invites offers through SRM e-tendering from the eligible registered bidders for following work of.

| Sr. No. | Name of work | Tender amount | Tender No | Sale period | Submission Deadline |
|---|---|---|---|---|---|
| 1 | Construction of peripheral RCC compound wall at 220 kV Mahape substation | Rs. 1,63,15,707.31/- (Excluding GST) Rs. 1,92,52,534.62/- (Including GST) | T-03/26-27/ MSETCL/ CO/CIVIL/ RFx No. 7000040246 | 12/06/2026 to 26/06/2026 | 26/06/2026 up to 18:00 Hrs. |

Interested bidders may obtain further information available on MSETCL's SRM e-tendering website-**https://srmetender.mahatransco.in**
**Contact Person:-** Chief Engineer (Civil), 022-69595010/13, M.No.8411001600

**Sd/-**
**Chief Engineer (Civil),**
**C.O. MSETCL**

## कल्याण डोंबिवली महानगरपालिका, कल्याण

**निविदा सूचना क्र. २०/२०२६-२०२७**

आयुक्त, कल्याण डोंबिवली महानगरपालिका, हे CPWD or State PWD, CIDCO, MCGM, Railways, MJP etc यांचेकडे काम केलेल्या अनुभवी कंत्राटदारांकडून / कंपनीकडून खालील कामासाठी सी नमुन्यात सीलबंद निविदा ई-टेंडरींग कार्यप्रणालीद्वारे मागवित आहेत. या कामांची सविस्तर निविदा सूचना व कोरे निविदा फॉर्म **www.mahatenders.gov.in** या संकेतस्थळावर दि.१५/०६/२०२६ ते दि. १०/०७/२०२६ रोजी दुपारी ३.०० वाजेपर्यंत उपलब्ध आहेत. निविदा ई-टेंडरींग कार्यप्रणालीद्वारे दि. १०/०७/२०२६ रोजी दुपारी ३.०० वाजे पर्यंत भरता येतील.

शक्य झाल्यास निविदा दि. ११/०७/२०२६ रोजी दुपारी ४.०० वाजता निविदाकारांच्या समोर उघडण्यात येतील.

| अ. क्र. | कामाचे नांव | निविदा फॉर्म फी रक्कम रूपये | अनामत रक्कम रूपये | कामाची मुदत |
|---|---|---|---|---|
| १ | **डोंबिवली पश्चिम येथील रेतीबंदर रोडवरील मोठागाव ठाकुर्ली येथील दिवा वसई रेल्वे ट्रॅकवरील लेव्हल क्रॉसिंग क्र. ०१ (कि. मी. ५०/०९-१०) च्या जागी प्रस्तावित आरओबीच्या पोहोच मार्गांचे बांधकाम (कंत्राटदाराच्या स्वतःच्या डिझाईन आणि रेखाचित्रांसह)** | ३,०००/- अधिक GST = रु. ३५४०/- (रुपये तीन हजार पाचशे चाळीस मात्र) | ३५,४४,०००/- (रुपये पस्तीस लक्ष चव्वेचाळीस हजार मात्र) | २४ महिने |

निविदा पूर्व बैठक दि. २३/०६/२०२६ रोजी दुपारी ३.०० वाजता शहर अभियंता, कल्याण डोंबिवली महानगरपालिका यांचे दालनात होईल. निविदा पूर्व बैठकीसाठी पुरक माहिती उपलब्ध करणे करीता प्रश्नावली सादर करण्याचा अंतिम कालावधी दि. २३/०६/ २०२६ रोजी सकाळी ११.०० वाजेपर्यंत असेल.

कोणतेही कारण न देता एक अथवा सर्व निविदा नाकारण्याचा अधिकार आयुक्त, कल्याण डोंबिवली महानगरपालिका, कल्याण यांनी राखून ठेवला आहे व त्यांचा निर्णय कायदेशीररित्या सर्व निविदाकारांसाठी बंधनकारक राहील.

**सही/-**
**(अनिता परदेशी)**
शहर अभियंता,
कल्याण डोंबिवली महानगरपालिका,
कल्याण.

जा.क्र.कडोंमपा/जसंवि/मुका/१८८
दिनांक : ११/०६/२०२६

## मुंबई झोपडपट्टी सुधार मंडळ

**महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाचे घटक मंडळ**

म्हाडा MHADA

**ई-निविदा सुचना क्र. :- का. अ. (पूर्व) / मुं. झो.सु.मंडळ/ ई-निविदा/मससंम/०३/२०२६-२७**

कार्यकारी अभियंता (पूर्व) विभाग, मुंबई झोपडपट्टी सुधार मंडळ (महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाचा घटक) खोली क्र. ५३६, चौथा मजला, गृहनिर्माण भवन, वांद्रे (पूर्व), मुंबई - ४०० ०५१ (दुरध्वनी क्र. ०२२-६६४०५२५१) हे जिल्हा उप निबंधक/ पूर्व/मुंबई उपनगरे जिल्हा यांचेकडे नोंदणीकृत पात्र मजूर सहकारी संस्थाकडून एकुण **०३** कामाकरीता बी - १ (टक्केवारी) नमुन्यातील निविदा ई- निविदा प्रणालीद्वारे (ऑनलाईन) निविदा मागवित आहेत. विस्तृत ई- निविदा सुचना व निविदा कागदपत्रे शासनाच्या संकेत स्थळांवर **https://mahatenders.gov.in,** उपलब्ध असतील. निविदा विक्री दिनांक १२.०६.२०२६ दुपारी ०३.०५ पासून दिनांक १९.०६.२०२६ सायंकाळी ६.१५ पर्यंत राहील. निविदा सुचनेबाबत शुध्दिपत्रक/ बदल असल्यास **https://mahatenders.gov.in**, संकेतस्थळावर प्रकाशित केले जातील. निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता (पूर्व) मुं. झो. सु. मंडळ यांनी राखुन ठेवला आहे.

CPRO/A/449

**सही/-**
**कार्यकारी अभियंता (पूर्व),**
**मुं. झो. सु. मंडळ, मुंबई**

म्हाडा - गृहनिर्माण क्षेत्रातील देशातील अग्रगण्य संस्था
Follow us:@mhadaofficial

## कामगारांसाठी जाहीर सुचना/नोटीस

या जाहीरातीद्वारे कळविण्यात येते की, **श्री. प्रियल के. पटेल, संचालक, मे. राजेश हौसिंग प्रा. लि. सिटीएस नं. ६७/१९ (भाग), ६७/२० (भाग), ६७/२१ (भाग), ६७/४० (भाग), ६७/४२ (भाग) ६७/४३ (भाग), ६७/४४, ६७/४५ आणि ६७/४६ (भाग), एल. बी. एस. मार्ग, मौजे विक्रोळी (पश्चिम), मुंबई ४०० ०८३.** सदर जागेवर कोणतीही आस्थापना नसल्यामुळे सदर भुखंड मोकळा असल्याबाबत बृहन्मुंबई महानगरपालिका, एन प्रभाग यांनी कळविले आहे. या जागेचे क्षेत्रफळ **१७९८.८२ चौ. मी.** असून तत्सम कुर्ला, नगर भुमापन कार्यालयातील नोंदीनुसार मिळकतीचे मालक आहोत आणि तिचा विद्यमान वापर बदलुन सदर मिळकत विकसित व विक्री करण्याचे आम्ही प्रस्तावित करीत आहोत. तरी देखील **मे. राजेश हौसिंग प्रा. लि. सिटीएस नं. ६७/१९ (भाग), ६७/२० (भाग), ६७/२१ (भाग), ६७/४० (भाग), ६७/४२ (भाग) ६७/४३ (भाग), ६७/४४, ६७/४५ आणि ६७/४६ (भाग), एल. बी. एस. मार्ग, मौजे विक्रोळी (पश्चिम), मुंबई ४०० ०८३.** या आस्थापनेत पुर्वी काम केलेल्या सर्व कायम कामगार, कर्मचारी, तात्पुरते, कंत्राटी तसेच प्रशिक्षणार्थी कामगारांची व त्यांच्या संघटनेची कामगारांच्या कायदेशीर देण्याबाबत, विवादाबाबत दावे/तक्रारी जागेचे व्यवस्थापक व विकासकाच्या विरुद्ध असल्यास त्याबाबतची लेखी तक्रार कागदपत्राच्या पुराव्यासहित कामगार उप आयुक्त मुंबई उपनगर (पूर्व) यांचे कार्यालय, कामगार भवन, प्लॉट क्र. सी-२०, ब्लॉक-ई, बांद्रा कुर्ला संकुल, बांद्रा (पूर्व), मुंबई - ४०० ०५१ यांच्याकडे जाहिर नोटीस/सुचना प्रसिद्ध झाल्याच्या तारखेपासून १५ दिवसाच्या आत सादर करावी. या कालावधीनंतर दाखल केलेली तक्रार ग्राह्य धरली जाणार नाही, व त्यासंदर्भात आम्ही कायदेशीररित्या जबाबदार राहणार नाही.

**सही-**
**स्थळ-मुंबई** **मे. राजेश हौसिंग प्रा. लि.,**
**दिनांक-१२/०६/२०२६** **(संचालक)**

## e-TENDER NOTICE – 013 / 2026–27

MAHAGENCO
Maharashtra State Power Generation Co. Ltd.

Following e-Tender offers are invited online from registered contractors / companies etc. are available at our website https://eprocurement.mahagenco.in.

| e-Tender No. | RFX No. | Particulars of Work / Supply | Estt. Cost in Rs. | EMD in Rs. |
|---|---|---|---|---|
| TN0120 TM1 Refloated | 3000069343 | Work of In-situ repairs of high pressure critical 2500 class valves and HP bypass valves and HP/IP control valves of TG set during short shut down on as and when required. | 1008213.21 | 13582.13 |
| TN0128 EM1 Refloated | 3000069426 | Internal Inspection of HV/LV Winding connection & allied works of HT transformers during AOH of Unit #1 at 210 MW TPS Khaperkheda. | 1480005.92 | 18300.06 |
| TN0129 AHP1 | 3000069445 | Procurement of spares of Blowers for AHP-I. | 657976.00 | 10079.76 |
| TN0130 BM1 | 3000069447 | Fabrication, erection & commissioning of PA fan ducts in unit 4 COH. | 9888196.50 | 102381.97 |
| TN0131 CHP2 | 3000069435 | Work contract for Operation of Stacker/ Reclaimer M/C and Operation and maintenance of Short Conveyor at CHP- II, TPS, Khaperkheda. | 4822324.50 | 51723.25 |
| TN0132 EM2 | 3000069463 | Work of Complete refurbishment and restoration of 3 phase Exhaust fans installed at various locations of 500 MW TPS Khaperkheda. | 980000.00 | 13300.00 |
| TN0133 CHP1 | 3000069491 | Work of rubber lagging of conveyor pulley by cold vulcanizing process (on as & when required basis) in CHP-I (4 x 210 mw), TPS Khaperkheda. | 1030258.35 | 13802.58 |
| TN0134 EM1 | 3000069483 | Work of rewinding of 501 to 1000 KW HT motors on as and when required basis at 210MW TPS Khaperkheda. | 4478964.00 | 48289.64 |

Note » Tender cost is Rs. 1,000 /- + GST.

**Sd /-**
**Chief Engineer (O&M)**
MSPGCL, Thermal Power Station, Khaperkheda

## फॉर्म ए

**जाहीर घोषणा**

*(इन्सॉल्व्हन्सी अँण्ड बँकरप्टसी बोर्ड ऑफ इंडिया (ऐच्छिक परिसमापन प्रक्रिया) विनियम, २०१७ चे नियम १४ अन्वये)*

**डू-वेल ऑईल प्लान्ट्स प्रायव्हेट लिमिटेडच्या भागधारकांचे लक्ष वेधण्याकरिता**

| | | |
|---|---|---|
| १ | कॉर्पोरेट व्यक्तीचे नाव | **डू-वेल ऑईल प्लान्ट्स प्रायव्हेट लिमिटेड** |
| २ | कॉर्पोरेट व्यक्तीची स्थापना तारीख | ११.०७.१९७८ |
| ३ | ज्या प्राधिकरणाअंतर्गत कॉर्पोरेट व्यक्ती स्थापना/नोंदणीकरण झाले आहे | कंपनी निबंधक - मुंबई |
| ४ | कॉर्पोरेट व्यक्तीचे कॉर्पोरेट ओळख क्र. (सीआयएन)/मर्यादित दायित्व ओळख क्र. | U74210MH1978PTC020484 |
| ५ | कॉर्पोरेट व्यक्तीचे नोंदणीकृत कार्यालय व प्रधान कार्यालयाचा (काही असल्यास) पत्ता | ३०६ मनीष कमर्शियल सेंटर, डॉ. ए. बी. रोड, वरळी, मुंबई, महाराष्ट्र, भारत, ४०००२५ |
| ६. | कॉर्पोरेट व्यक्तीची परिसमापन सुरू होण्याची तारीख | ११.०६.२०२६ |
| ७. | परिसमापकाचे नाव, पत्ता, ईमेल पत्ता, दूरध्वनी क्रमांक, नोंदणी क्र. | अनिश गुप्ता दिवाळखोरी व्यावसायिक १०५ लोटस बिझनेस पार्क, राम बाग लेन, एस व्ही रोड जवळ, मालाड (पश्चिम), मुंबई – ४०००६४ दूर.: + ९१ ९८२१०९९७२० ईमेल: ipanishgupta@gmail.com नोंदणी क्रमांक: IBBI/IPA-002/IP-N00285/2017-18/10843 |
| ८. | दावा सादर करण्याची अंतिम तारीख | ११.०७.२०२६ |

याद्वारे सूचना देण्यात येत आहे की, **डू-वेल ऑईल प्लान्ट्स प्रायव्हेट लिमिटेड**ने दि.**११.०६.२०२६** रोजी ऐच्छिक दिवाळखोरी सुरू केली आहे.
**डू-वेल ऑईल प्लान्ट्स प्रायव्हेट लिमिटेड**च्या भागधारकांना याद्वारे आवाहन करण्यात येत आहे की त्यांनी त्यांच्या दाव्यांचा पुरावा, दिनांक **११.०७.२०२६** रोजी किंवा त्यापूर्वी, बाब ७ समोर नमूद केलेल्या पत्त्यावर परिसमापकाकडे सादर करावा.
वित्तीय धनकोंनी त्यांच्या दाव्यांचे पुरावे केवळ इलेक्ट्रॉनिक माध्यमांद्वारे सादर करावेत. इतर सर्व भागधारक दाव्यांचे पुरावे प्रत्यक्ष, टपालाद्वारे किंवा इलेक्ट्रॉनिक माध्यमांद्वारे सादर करू शकतात.
खोटे किंवा दिशाभूल करणारे दाव्यांचे पुरावे सादर केल्यास दंड आकारला जाईल.
ठिकाण: मुंबई **अनिश गुप्ता**
दिनांक: १२.०६.२०२६ **परिसमापक**

## महाराष्ट्र शासन
## कार्यकारी अभियंता
## सा.बां. विभाग, पालघर
## ई-निविदा सुचना क्रमांक - ०८ सन २०२६ - २०२७

कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय, सा.बां. विभाग, पालघर बांधकाम भवन इमारत, ढवळे रुग्णालया शेजारी, पालघर - बोईसर रोड, ता. जि. पालघर महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम खात्याकडील योग्य त्या वर्गातील नोंदणीकृत कंत्राटदार/ इतर पात्र व सक्षम यांच्याकडून खालील कामांकरीता **'ब-१'** नमुन्यातील निविदा ई-निविदा प्रणालीद्वारे (ऑनलाईन) मागवित आहेत. सदर निविदा सूचनेमध्ये **एकूण ०१ (एक) काम** समाविष्ट आहे.

**टिप** - या निविदेवरील संपूर्ण माहिती खालील संकेत स्थळावरुन उपलब्ध करुन देण्यांत आलेली आहे.

**1) https://pwd.maharashtra.gov.in/ 2) https://mahatenders.gov.in**

| अ. क्र. | कामाचे नांव | अंदाजित रक्कम रु. लक्ष (रुपये) (जी.एस.टी. वगळून) | अंदाजित रक्कम रु. लक्ष (अक्षरी) (जी.एस.टी. वगळून) | लेखाशिर्ष | ठेकेदाराचा वर्ग |
|---|---|---|---|---|---|
| १ | उमरोळी ता. जि. पालघर येथे उप प्रादेशिक परिवहन कार्यालय पालघर इमारतीचे बांधकाम करणे. ता. जि. पालघर | रु.१०५३४२१४९/- | अक्षरी रु. दहा कोटी त्रेपन्न लक्ष बेचाळीस हजार एकशे एकोणपन्नास मात्र | ४०५९ सार्वजनिक बांधकामावरील भांडवली खर्च ४०५९ ०८२३ | नोंदणीकृत कंत्राटदार/इतर पात्र व सक्षम |

निविदा स्वीकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता, सा.बां. विभाग पालघर यांनी राखून ठेवला आहे. अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही.

वरिल कामाची ई-निविदा उपलब्ध कालावधी - दि. १२/०६/२०२६ ते दि. १९/०६/२०२६ पर्यंत. निविदा पुर्व बैठक दि. १६/०६/२०२६ रोजी मा. मुख्य अभियंता प्रादेशिक विभाग कोकण, मुंबई येथे दुपारी १२.०० वाजता.

ई-निविदा उघडणे - दि. २२/०६/२०२६ शक्य झाल्यास सकाळी ११.०० नंतर.

जा.क्र. सा.बां.वि/पालघर/निविदा/४०८७
कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय,
सा.बां. विभाग, पालघर
बांधकाम भवन इमारत, ढवळे रुग्णालया शेजारी,
पालघर - बोईसर रोड, ता. जि. पालघर (पश्चिम)- ४०१ ४०४
दिनांक : ०८/०६/२०२६

**सही/-**
**(म.पां. किणी)**
**कार्यकारी अभियंता**
**सार्वजनिक बांधकाम विभाग, पालघर**

क्रमांक: आरओसी-२०२६-२७/क्र-५/सी १०८८

# सेन्सॉर बोर्ड उदार झाला...!

**गेल्या** दोन आठवड्यांच्या तीव्र टीकेनंतर केंद्रीय चित्रपट प्रमाणन मंडळाने या आठवड्यात एक मोठा आणि दिलासादायक निर्णय घेतला आहे. 'है जवानी तो इश्क होना है' आणि 'बंदर' या चित्रपटांवर चालवलेल्या कात्रीमुळे तसेच 'ऑब्सेशन' चित्रपटातील दोन महत्त्वाच्या दृश्यांवरून समाजमाध्यमांवर झालेल्या प्रचंड गदारोळानंतर, सेन्सॉर बोर्डाने या आठवड्यात तीन प्रमुख चित्रपटांना एकही कट न देता म्हणजेच झिरो कटसह मंजुरी दिली आहे.

या निर्णयाचा सर्वात पहिला आणि मोठा लाभ कंगना रणौतची मुख्य भूमिका असलेल्या 'भारत भाग्य विधाता' या चित्रपटाला मिळाला आहे. २६/११ च्या दहशतवादी हल्ल्यांवर आधारित असलेल्या या थ्रिलर चित्रपटाला सेन्सॉर बोर्डाच्या परीक्षण समितीने २९ मे रोजी यु/ए १६+ (U/अ १६+) प्रमाणपत्र दिले आहे. चित्रपटात अनेक हिंसक दृश्ये असूनही बोर्डाने यात कोणताही कट सुचवलेला नाही. विक्रम भट्ट दिग्दर्शित आणि मिमोह चक्रवर्ती अभिनीत 'हॉन्टेड - इकोज ऑफ द पास्ट' हा हॉरर चित्रपट ३डी रुपामध्ये प्रदर्शित होत आहे. अशा प्रकारच्या भयपटावर सहसा सेन्सॉरची कात्री चालते. मात्र सेन्सॉर बोर्डाने ए (अ) प्रमाणपत्र देताना कोणताही ऑडिओ किंवा व्हिडिओ कट दिलेला नाही.

याशिवाय हॉलिवूडचा सायन्स-फिक्शन सायकॉलॉजिकल हॉरर चित्रपट 'बॅकरुम्स' यालाही



८ जून रोजी ए (अ) प्रमाणपत्रासह कोणत्याही कटविना मंजूर करण्यात आले आहे. हा चित्रपट सेन्सॉर बोर्डाकडे पाठवण्यापूर्वीच संबंधित स्टुडिओने स्वतःहून काही अत्यंत भीतीदायक किंवा आक्षेपार्ह दृश्ये अस्पष्ट (ब्लर) केली असण्याची शक्यताही वर्तवली जात आहे.

# जान्हवीला ८ कोटी मानधन?

**बॉलीवूड** अभिनेत्री जान्हवी कपूर हिने दिग्दर्शक बुची बाबू यांच्या 'पेड्डी' या चित्रपटासाठी तिच्या कारकिर्दीतील आतापर्यंतचे सर्वात मोठे मानधन घेतले आहे. विश्वसनीय सूत्रांनुसार, या चित्रपटात दाक्षिणात्य सुपरस्टार राम चरण याच्यासोबत मुख्य अभिनेत्रीची भूमिका साकारण्यासाठी जान्हवीला तब्बल ८ कोटी रुपये देण्यात आले आहेत. हा आकडा तिच्या आधीच्या चित्रपटांच्या तुलनेत खूप मोठा मानला जात आहे. जान्हवीला तिच्या 'देवरा' या चित्रपटासाठी ५ कोटी रुपये मानधन मिळाले होते. त्या तुलनेत 'पेड्डी'साठीच्या मानधनात थेट ५० टक्क्यांची वाढ झाली आहे. देवरा आणि पेड्डी या दोन्ही चित्रपटांच्या पाठोपाठ मिळालेल्या यशामुळे दाक्षिणात्य चित्रपटसृष्टीत तिला अत्यंत भाग्यवान आणि यशस्वी अभिनेत्री मानले जात आहे.



या यशानंतर जान्हवी कपूरला तेलगू चित्रपटसृष्टीतून अनेक मोठ्या प्रकल्पांच्या ऑफर्स येत आहेत. आगामी काळात ती दिग्दर्शक ॲटली यांच्या 'राका' या चित्रपटात अल्लू अर्जुनसोबत दिसणार आहे. तसेच हिंदी चित्रपटसृष्टीत ती टायगर श्रॉफ आणि लक्ष्य यांच्यासोबत 'लग जा गले' या चित्रपटात मुख्य भूमिकेत झळकणार आहे.

# 'हीर सारा और पाँडिचेरी'चे नाव बदलले

**अभिनेत्री** पत्रलेखा आणि मानवी गागरू यांच्या मुख्य भूमिका असलेला चित्रपट 'हीर सारा और पाँडिचेरी' आता केवळ 'हीर सारा' या नावाने प्रदर्शित होणार आहे. केंद्रीय चित्रपट प्रमाणन मंडळाच्या (सीबीएफसी) आक्षेपानंतर हा बदल करण्यात आला असून, यामुळे चित्रपटाचे प्रदर्शनही दोन आठवड्यांनी पुढे ढकलण्यात आले आहे. हा चित्रपट आधी २९ मे रोजी प्रदर्शित होणार होता. शीर्षकातून 'पाँडिचेरी' हा शब्द वगळण्याचे कारण चित्रपटातील प्रौढ आणि संवेदनशील आशय एका केंद्रशासित प्रदेशाच्या नावाशी जोडला जाऊ नये, असे बोर्डाच्या सदस्यांचे मत होते.

कार्तिक चौधरी दिग्दर्शित या चित्रपटात पत्रलेखा आणि मानवी गागरूसोबत आरिफ झकेरिया, श्वेता साळवे आणि निशांक वर्मा यांच्या महत्त्वाच्या भूमिका आहेत.

यापूर्वी 'द काश्मीर फाईल्स', 'द केरळ स्टोरी', 'उदयपूर फाईल्स' आणि 'द बेंगॉल फाईल्स' यांसारख्या चित्रपटांना नावांमध्ये बदल न करता मंजुरी देण्यात आली होती, मग याच चित्रपटाला वेगळा न्याय का, असा प्रश्न उपस्थित केला जात आहे.



# राखीवर वरुणची स्तुतीसुमने

**बॉलीवूड** अभिनेता वरुण धवन याने राखी सावंतचे कौतुक करत तिला भारतीय पॉप कल्चर आयकॉन म्हटले आहे. हास्यकलाकार तन्मय भट याच्या डिजिटल शोमध्ये हजेरी लावली असताना वरुणने राखीबद्दल आपले मत व्यक्त केले. या कार्यक्रमादरम्यान इंटरनेटवरील एक मीम दाखवण्यात आली. एका संगीत मैफिलीमध्ये म्युझिक कॉन्सर्ट उभारण्यात आलेली एक कलाकृती हुबेहूब राखी सावंतसारखी दिसत असल्याचा तो मीम होता. तो पाहून वरुण म्हणाला की, राखी सावंत आता आपल्या पॉप संस्कृतीचा एक अविभाज्य भाग बनली आहे. ती एक आयकॉन असून, तिला पाहून आजवर अनेक लोकांनी तिची नक्कल करण्याचा किंवा तिच्यासारखे वागण्याचा प्रयत्न केला आहे. मात्र, राखी सावंतसारखी दुसरी व्यक्ती होणे शक्य नाही, राखी सावंत फक्त एकच आहे.



# जागतिक मनोरंजनविश्वात हृतिकचे मोठे पाऊल

**बॉलीवूडचा** सुपरस्टार हृतिक रोशन याने जागतिक मनोरंजन क्षेत्रात एक मोठे पाऊल टाकत ॲनोनिमस कंटेंट या विख्यात आंतरराष्ट्रीय मीडिया कंपनीसोबत करार केला आहे. ही कंपनी जगभरातील नामवंत दिग्दर्शक, लेखक आणि अभिनेत्यांचे प्रतिनिधित्व करण्यासाठी ओळखली जाते. या नव्या करारामुळे हृतिक रोशनला जागतिक पातळीवरील विविध प्रकल्पांमध्ये काम करण्याची संधी मिळणार असून, त्याच्या आंतरराष्ट्रीय कारकिर्दीला एक नवी दिशा मिळण्याची शक्यता आहे.



गेल्या अडीच दशकांपासून भारतीय चित्रपटसृष्टीत स्वतःचे अढळ स्थान निर्माण करणाऱ्या हृतिकने अनेक ब्लॉकबस्टर चित्रपट दिले आहेत. सध्या 'क्रिश ४' या बहुप्रतीक्षित सुपरहिरो चित्रपटाच्या तयारीमध्ये तो व्यस्त आहे. अभिनयासोबतच तो आता निर्मिती क्षेत्रातही आपले पंख पसरवत आहे. एचआरएक्स फिल्म्स या स्वतःच्या निर्मिती संस्थेअंतर्गत तो स्टॉर्म नावाच्या एका थ्रिलर चित्रपटाची निर्मिती करत आहे. नवीन करारामुळे हृतिकच्या जागतिक लोकप्रियतेत आणखी भर पडणार असल्याचे चित्रपट वर्तुळात बोलले जात आहे.

# आयेशाच्या आक्षेप, प्रणितची माफी



अभिनेत्री आयेशा खान हिने हास्यकलाकार प्रणित मोरे याच्या स्टँड-अप शोमधील एका व्हायरल व्हिडिओवर तीव्र आक्षेप घेतला आहे. एका मुलाने डेटवर ३७० रुपये खर्च केल्याच्या बदल्यात मुलीकडून अपेक्षा ठेवल्याचे वक्तव्य केले होते. या दृश्याला आयेशाने अत्यंत भयंकर आणि चिंताजनक म्हटले आहे. या वाढत्या वादानंतर प्रणित मोरे याने जाहीर माफी मागितली आहे.

या वादाची सुरुवात एका स्टँड-अप शोमधील प्रेक्षकांसोबतच्या संवादातून झाली. शोदरम्यान गुरुग्राम येथील एका २३ वर्षीय मुलाने सांगितले की, त्याने एका डेटवर चिकन बिर्याणीच्या प्लेटसाठी ३७० रुपये खर्च केले होते आणि त्यानंतर त्याने मुलीकडून शारीरिक संबंध किंवा इतर काहीतरी बदल्यात मिळण्याची अपेक्षा उघडपणे व्यक्त केली. हा व्हिडिओ सोशल मीडियावर वेगाने पसरल्यानंतर 'धुरंधर' चित्रपटातील गाण्यामुळे प्रसिद्धीझोतात आलेल्या आयेशा खानने तिच्या इन्स्टाग्राम स्टोरीवर तीव्र संताप व्यक्त केला. ती म्हणाली, त्या खोलीत उपस्थित असलेला प्रत्येक पुरुष ज्या पद्धतीने हसत आहे, ते पाहणेही अत्यंत भयंकर आहे. शोचा सूत्रधार (प्रणित) ज्या प्रकारे हसत आहे आणि कोणताही विचार न करता ती सोशल मीडियावर टाकली गेली, हे खरंच भीतीदायक आहे.

डेटवर जाऊन पैसे खर्च केल्याने त्या महिलेच्या शरीरावर तुमचा हक्क निर्माण झाला, असे एखाद्याला कसे वाटू शकते असा सवालही तिने केला. सोशल मीडियावर प्रचंड टीका झाल्यानंतर प्रणित मोरे याने यावर मौन सोडले आणि जाहीर माफीनामा सादर केला.

# महँगाई डायन खाये जात है। मेलोडी खाओ सब भूल जाओ

## पुण्यात बॅनरबाजी

■ पुणे

**वाढत्या** महागाईविरोधात पुण्यात ना. सी. फडके चौक, निलायम टॉकीज परिसरात युवक काँग्रेसकडून बॅनर लावण्यात आले आहेत. या बॅनरमधून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यावर थेट निशाणा साधण्यात आला आहे.




घरगुती गॅस सिलिंडरच्या दरवाढीच्या मुद्यावरून काँग्रेसने हे बॅनर लावले आहेत. मागील तीन महिन्यांत सिलिंडरच्या किमतीत सुमारे ८९ रुपयांची वाढ झाल्याचा उल्लेख करण्यात आला आहे. 'महँगाई डायन खाये जात है, मेलोडी खाओ सब भूल जाओ!' असा उपरोधिक टोला या बॅनरवर देण्यात आला आहे.

विशेष म्हणजे, या बॅनरवर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हातात मेलोडी चॉकलेट दाखवणारा फोटो वापरण्यात आला असून, त्यातून सरकारवर टीका करण्यात आली आहे. या बॅनरमुळे सध्या पुण्यातील राजकीय वर्तुळात जोरदार चर्चा रंगली आहे.

# मुंबईत पालिकेच्या वरदहस्ताने फेरीवाला परवाना घोटाळा

■ मुंबई

**मुंबई** पालिका प्रशासनाच्या वरदहस्ताने मुंबईत फेरीवाला परवान्यांचा घोटाळा सुरू असल्याचा आरोप करणाऱ्या याचिकेची उच्च न्यायालयाने गंभीर दखल घेतली. न्यायमूर्ती अजय गडकरी आणि न्यायमूर्ती कलम खाता यांच्या खंडपीठाने गोरेगाव पोलीस स्टेशनला याप्रकरणी चौकशी करून १४ दिवसांत कारवाई करण्याचे आदेश दिले.

रस्त्यावरील अनधिकृत फेरीवाल्यांविरोधात उच्च न्यायालयात दाखल झालेल्या याचिकेची दखल घेतली. न्यायमूर्ती अजय गडकरी आणि न्यायमूर्ती कलम खाता यांच्या खंडपिठासमोर सुनावणी सुरू आहे. आज बुधवारी झालेल्या सुनावणीच्या वेळी पालिकेच्यावतीने वकील

## हायकोर्टाचे सहाय्यक पोलीस आयुक्तांना चौकशीचे आदेश

चैतन्य चव्हाण यांनी, मुंबईतील ९९,४३५ अधिकृत परवाना धारक फेरीवाले असून, त्यांची ओळखपत्र तपासून त्यांना परवाने देण्याचे काम सुरू आहे. तसेच २० हजार फेरीवाल्यांचे 'क्यू आर' कोड तयार असून, त्यांचे वितरण केले जात आहे. मात्र अनेकजण त्यांच्या मूळगावी गेल्याने प्रक्रिया अजूनही पूर्ण झाली नसल्याची कबुली दिली. यावेळी अमायकस क्युरी (कोर्टाचा मित्र) ज्येष्ठ वकील जमशेश मिस्त्री यांनी पालिकेच्या कार्यपध्दतीवर शंका उपस्थित केली. याबाबत पालिकेकडून कोणतीही जनजागृती केलेली नसल्याचे कोर्टाच्या निदर्शनास आणून दिले. तर गोरेगावचे रहिवासी असलेले वकील आशिष दुबे यांनी मुंबईत एक लाखाच्या घरात अधिकृत परवानाधारक फेरीवाले असल्याची माहिती देणाऱ्या पालिका प्रशासनाच्या भोंगळ कारभाराची पर्दाफाश केला.




# वसई-विरारमध्ये ९५ टक्के नालेसफाईचा पालिकेचा दावा

■ वसई

**वसई-विरार** शहरात ९५ टक्के नालेसफाईचे काम पूर्ण झाले असून, पहिल्यांदाच १ लाखाहून अधिक गटारांची चेंबरही साफ करण्यात आली. या नालेसफाईच्या दरम्यान ८० हजार ६१४ घनमीटर इतका गाळ उपसा करण्यात आला, असा दावा पालिकेने केला.

वसई-विरार महापालिकेने १५ एप्रिलपासून नालेसफाईचे काम सुरू केले होते. शहरात एकूण २०६ नाले असून त्यांची लांबी सुमारे १९१.२१ किलोमीटर इतकी आहे. आतापर्यंत यातील ९५ टक्के नाल्यांची स्वच्छता झाली आहे. या नालेसफाईच्या दरम्यान ८० हजार ६१४.३३ घनमीटर इतका गाळ उपसा करण्यात आला आहे. त्यापैकी २२ हजार ५६८ घनमीटर इतका गाळ उचलण्यात आला. शहरात १ लाख १९ हजार २६६ गटारांचे चेंबर्स आहेत. त्यात गाळ आणि कचरा साचल्याने सांडपाण्याचा निचरा होत नाही. यासाठी पालिकेने पहिल्यांदाच गटारांच्या चेंबर्सचे काम हाती घेतले होते. आतापर्यंत आम्ही १ लाख ११ हजार ४९८ चेंबर्स साफ केले आहे.

# श्री नारायण गुरू कॉलेजमध्ये 'स्वायत्त दर्जा' निमित्त आनंदोत्सव

■ मुंबई

**चेंबूरमधील** श्री नारायण गुरु कॉलेज ऑफ कॉमर्स महाविद्यालयाने स्वायत्त दर्जा प्राप्त करीत शिक्षण क्षेत्रातील आणखी एक महत्त्वाचा टप्पा गाठल्याबद्दल आनंदोत्सव साजरा करण्यात आला. महाविद्यालयाला स्वायत्त दर्जा प्राप्त झाल्याबद्दल महाविद्यालयाच्या सेमिनार सभागृहात आयोजित करण्यात आलेल्या भव्य सोहळ्यात स्वायत्त दर्जा मिळाल्याची घोषणा करीत मान्यवरांची मार्गदर्शक भाषणे आणि शैक्षणिक विकासावर विचारमंथन झाले.



या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून विश्वविद्यालय अनुदान आयोगाचे उपाध्यक्ष, रिलायन्स जिओ विद्यापीठाचे सल्लागार आणि प्रतिष्ठित प्राध्यापक, राष्ट्रीय मूल्यमापन आणि मान्यता परिषदेचे अध्यक्ष प्रा. डॉ. व्ही. एन. राजशेखरन पिल्लई तर विशेष अतिथी आणि प्रमुख वक्ते म्हणून मुंबई विद्यापीठाचे माजी कुलगुरू राजन वेळुकर आदिसह एसएनएमएस ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूशन्सच्या डायरेक्टर डॉ. एन्सी जोसेफ, महाविद्यालयाच्या मुख्याध्यापिका डॉ. जयश्री व्यंकटचलम, एसएनएमएसचे अध्यक्ष एन. मोहनदास, एसएनएमएसचे अध्यक्ष एम. आय. दामोदरन आदिसह मान्यवर मंडळी उपस्थित होती.

# १३ जून रोजी दादरमध्ये 'कोकणची कैफियत'

**मुंबई- कोकणातील** विविध समस्यांवर चर्चा करून त्यावर कोकणी जनतेची भूमिका निश्चित करण्यासाठी शनिवार १३ जून रोजी दादरच्या मुंबई मराठी ग्रंथ संग्रहालय येथे 'कोकणची कैफियत' या मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे.

जनता दल सेक्युलर महाराष्ट्र, कोकण जनविकास समिती आणि मूलभूत अधिकार संघर्ष समिती यांच्या संयुक्त विद्यमाने दादर पूर्व येथील मुंबई मराठी ग्रंथ संग्रहालयाच्या प्रा. सुरेंद्र गावस्कर सभागृहात सायंकाळी ५ ते ८ यावेळेत हा मेळावा पार पडणार आहे. या मेळाव्यात कोकणातील पर्यावरण, रोजगार, शिक्षण, आरोग्य, मत्स्यव्यवसाय, शेती, पर्यटन आणि पायाभूत सुविधा आदी विषयांवर चर्चा केली जाणार आहे.

# पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या विक्रमांवर मनसेकडून मंदिरात उपरोधिक पूजा



■ मुंबई

**देशाचे** सर्वाधिक काळ कार्यरत राहिलेले पंतप्रधान म्हणून नरेंद्र मोदी यांचे भाजपा आणि मित्रपक्षांकडून अभिनंदन केले जात असताना महाराष्ट्र नवनिर्माण सेनेने त्यांच्यावर उपरोधिक टीका केली आहे. महागाई, बेरोजगारी, डॉलर, पेट्रोल आणि घरगुती गॅसच्या वाढलेल्या दरांबाबत मोदींनी विक्रम केल्याचा टोला लगावत मनसेच्या वतीने मुंबईतील सिद्धिविनायक मंदिरात उपरोधिक पूजा करण्यात आली. मनसे नेते संदीप देशपांडे यांनी सिद्धिविनायक चरणी नतमस्तक होत पंतप्रधान मोदी यांच्या कार्यकाळावर टीका केली. भाजपा मुंबई अध्यक्ष अमित साटम यांनी नरेंद्र मोदी यांच्या विक्रमी कार्यकाळानिमित्त केलेल्या पूजेनंतर मनसेने ही भूमिका मांडत प्रतिउत्तर दिले.

यासंदर्भात संदीप देशपांडे यांनी एक्सवरील पोस्टमध्ये म्हटले की, बाबूमोशाय, जिंदगी बड़ी होनी चाहिए, लंबी नहीं. एखाद्या व्यक्तीने एखाद्या पदावर किती वर्षे काम केले यापेक्षा त्या काळात किती चांगले काम केले हे अधिक महत्त्वाचे आहे. सर्वाधिक काळ पंतप्रधानपदी राहण्याचा विक्रम, सर्वाधिक महागाईचा दर, सर्वाधिक डॉलरचा दर, सर्वाधिक पेट्रोल दर, सर्वाधिक घरगुती गॅस दर, सर्वाधिक बेरोजगारीचा विक्रम तसेच एकही पत्रकार परिषद न घेण्याचा विक्रम केल्याबद्दल मोदीजी आपले मनसेकडून अभिनंदन. असेच महाविक्रम मोदीजी, आपणांकडून होत राहावे ह्यासाठी श्री सिद्धिविनायकचरणी मनसे प्रार्थना केली.

# गोवंडीतील बेस्टच्या शिवाजी नगर आगारात चौकीचे छप्पर कोसळले

■ मुंबई

**गोवंडी** परिसरातील बेस्टच्या शिवाजी नगर आगारातील चौकीचे छप्पर कोसळल्याची घटना ७ जून रोजी संध्याकाळी घडली. त्यामुळे काही काळ परिसरात गोंधळ उडाला. छप्पर कोसळत असल्याचे लक्षात येताच कर्मचारी तसेच उपहारगृहातील कर्मचाऱ्यांनी तातडीने बाहेर धाव घेतली. त्यामुळे मोठा अनर्थ टळला.

सुदैवाने या घटनेत कोणतीही जीवितहानी किंवा दुखापत झालेली नाही. दरम्यान, या घटनेचा व्हिडिओ सध्या व्हायरल होत असून, बस स्थानकांच्या सुरक्षिततेबाबत प्रश्न उपस्थित केले जात आहेत.

# सुरक्षा बलाच्या कर्मचाऱ्यावर हात उगारला विरार पोलिसांनी गुंडाची काढली धिंड

## सरकारी कामात अडथळा! गुन्हा दाखल

■ विरार


**महाराष्ट्र** सुरक्षा बलाच्या जवानाची कॉलर पकडून धक्काबुकी करणाऱ्या एका कुख्यात गुंडाची विरार पोलिसांनी बुधवारी संध्याकाळी धिंड काढली. मनीष झा असे या गुंडाचे नाव आहे. त्याच्या हातात बेडी घालून रस्त्यात फिरवत नेले आणि त्या गुंडाची परिसरात असलेली दहशत संपविण्याचा प्रयत्न केला.

मंगळवारी रात्री विरार पोलिसांचे एक पथक गस्त घालत होते. एका चहाच्या टपरीवर गुटखा विक्री होत असल्याचा पोलिसांना संशय होता. पोलीस चौकशी करण्यासाठी त्या टपरीवर गेले. तेव्हा टपरीचालक मनीष झा याने पोलिसांशी वाद घातला. त्याने पोलिसांसोबत असलेल्या महाराष्ट्र सुरक्षा बलाच्या (मसुब) एका कर्मचाऱ्याची कॉलर पकडून त्याला धक्काबुक्की केली. पोलिसांनी मनीष झा याला अटक करून सरकारी कामात अडथळा आणल्याप्रकरणी गुन्हा दाखल केला.

मनिष झा हा सराईत गुंड आहे. त्याच्याविरोधात पोक्सो सह अन्य गंभीर स्वरुपाचे गुन्हे दाखल आहेत. दोन महिन्यांपूर्वीच झा तडीपारची शिक्षा भोगून बाहेर आला होता. त्याने विरार पूर्वेला स्थानक परिसरात चहाची टपरी टाकली होती.

झा याने सुरक्षा बलाच्या कर्मचाऱ्यावर हात उचलल्याने पोलिसांची प्रतिमा मलीन झाली होती. त्यामुळे बुधवारी संध्याकाळी विरार पोलिसांनी त्याची धिंड काढत त्याला शहरातून फिरवले. कायदा हातात घेत दहशत माजविणाऱ्याची गय केली जाणार नाही, असे विरार पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक लालू तुरे यांनी सांगितले.

# नवाकाळ शब्दकोडे-१६३४



## आडवे शब्द –

१. राजाची रयत ४. गणपतीचे एक नाव ७. जास्वंदीचे फूल १०. पातळ पदार्थ वाढण्याचे एक पात्र १२. ऐश करणारा, चैनीत जगणारा १४. खोचक १६. पसरलेला सुगंध, घमघमाट १८. भय, भीती १९. छुपा २१. छोटा चपळ प्राणी, खार २२. पदवी, किताब २४. करिश्मा व करीना कपूरची अभिनेत्री आई २६. घरधनी, कारभारी २८. कुबेराचा सेवक, गुह्यक ३१. वापरात नसलेली शेतजमीन ३३. उसाचा रस काढण्याचे साधन ३५. स्त्री, महिला ३७. विष्णूचा पहिला अवतार ३९. टेंभा, दिवटी ४१. शैली, ढब ४२. रमलेला, गुंगलेला ४४. पाणी, जल ४५. गुरांचा समूह ४६. याग, यज्ञ ४७. हॉल, कक्ष ४८. किनारा, काठ ५०. वल्लरी, वेल ५२. उमर ५३. वावडी, हूल ५४. उंची दर्जाचे, महाग ५५. टोचणी, शल्य ५७. समतल पृष्ठभाग ६०. समूह, घोळका ६१. आवाज, ध्वनी ६२. लाकडी फळ्यांचे छत ६५. बड्याबोळ, बोऱ्या ६७. प्रतिशोध, वचपा ६८. नलिका ६९. एकच बैल जुंपलेली गाडी ७१. रुची, स्वारस्य ७४. राजाची पत्नी ७५. घेतलेले, मिळालेले रीतसर परत करणे ७७. डोक्याला मालिश ७८. गैरसमज दूर होणे ८०. रेषा, रेघ ८१. सच्चा, प्रामाणिक ८२. हिरवे रत्न, पन्ना ८३. भूमी ८४. मोठा भाऊ ८६. ठक, फसवणारा ८७. किल्ला ८८. पुनश्च, फिरून ८९. शेकडो वेळा ९०. सख्खे भावंड ९१. बाजू, कैवार ९३. एक किळसवाणा कीटक, बागुरडा ९४. अहंकार ९५. स्त्रियांच्या कर्णभूषणांचा प्रकार ९७. कोंबडी ९९. बाळाचे नामकरण १०१. मूल्य १०४. झुकलेला १०६. भाडोत्री खुनी १०८. गंगेचे आठ पुत्र १०९. वस्तू वापरल्यामुळे तिची कमी होत जाणारी किंमत ११०. ज्वारीची वाळलेली ताटे १११. इयत्ता ११२. गुळगुळीत व आतून कठीण ११३. असूया ११४. कापसाची एक जात ११५. भार ११६. अन्ननलिकेच्या खालचा अवयव

## उभे शब्द –

१. अतिशय मोठे २. रात्री झोप न होणे ३. शंकराचे मंदिर ५. कंबरेचा अलंकार ६. सातू ७. घट्ट ८. वंद्य, पूज्य ९. किनारा १०. रांग, आवली ११. परराष्ट्रनीती, मुत्सद्देगिरी १३. दिवा १५. द्विधावस्था, दोलायमानता १७. नवरदेवाची आई २०. पातळ गादी २३. सावधगिरी २५. वायर २७. जिम्मेदारी, धुरा २९. फोडणीतील एक आंबट पदार्थ ३०. भूमी; मुलींचे एक नाव ३१. पक्ष्याचे पीस ३२. कमळातून जन्मलेली, लक्ष्मी ३४. लेखकाचे आयुध ३६. अरुंद रस्ता ३८. जहाजातून आयात केलेला माल ४०. तळतळाट ४२. गवताची काडी ४३. नाकातला अलंकार ४६. नौका ४९. अर्धचंद्र, हकालपट्टी ५१. साठ मिनीटे ५३. गोधडी ५४. विक्रीचा दर ५६. लपंडावाचा खेळ ५८. वाईट कृत्य ५९. फुलांचा अलंकार ६०. थोडे ६१. कसेबसे रेंगाळत चाललेले काम ६२. कलिका ६३. एकाग्र नजर ६४. ढग नसलेले आकाश ६६. किराणा दुकानदार ६७. स्वर ६८. तंगी, कडकी ७०. डाकू ७२. समंजस ७३. हेतू ७५. पाणी भरण्यासाठी पूर्वी वापरली जाणारी चामडी पिशवी ७६. हेलपाटा, चक्कर ७७. चोच ७९. सतत ८२. निभाव ८३. आकर्षण ८५. नक्षत्र, तारका ८७. हलगर्जीपणा ८८. थेट, परस्पर ९२. कालव्याचे किंवा पाटाचे पाणी आत घेऊन बांधलेला हौद किंवा कृत्रिम विहीर ९६. मूर्ख ९८. सगळी ९९. खोटा आरोप १००. नोकर, दास १०२. देवांचा राजा १०३. आशा संपणे १०५. वटवृक्ष १०६. रस्ता १०७. कडवा १११. रान •

**नवाकाळ कोडे क्रमांक १६३३ चे उत्तर**

**आडवे शब्द** : २. आदिमाया ४. भस्मसात ८. मखलाशी ११. त्राटिका १२. सागर १३. रुजवात १५. शशिकला १८. वणवण २०. लाडावलेला २४. जिवती २६. रावी २७. जड २८. हरळी २९. पारद ३०. चिंतामणी ३२. मकबरा ३४. रिता ३५. सारवान ३६. कवच ३८. रस ४०. तळ ४१. मखाणा ४२. कुळाचार ४३. रवण ४५. डाग ४६. कामसू ४८. जाच ४९. कुंती ५०. जवळ ५२. नमवणे ५४. राजगड ५६. अवसान ५८. सुमन ६०. साईल ६१. लेखन ६३. बिंग ६४. मार ६५. कारवाई ६६. चर्चा ६७. टवकारणे ६८. कवायत ७०. सफर ७२. बेकार ७४. मळवट ७६. आस ७७. तपासनीस ७९. ओक ८१. गुंजारव ८३. हाटक ८५. काढा ८६. पर ८७. लता ८९. रम्य ९०. शर ९१. साळसूद ९३. चाकर ९४. पठण ९५. नाक ९६. मद ९७. चिरकाल ९९. वहाण १०१. भाकरी १०३. हटके १०४. सतत १०५. पटल १०६. वातड १०७. सरकी

**उभे शब्द** : १. पत्रास २. आकाश ३. मादक ४. भगवती ५. स्मरण ६. तरुण ७. लावालावी ९. खवले १०. शीड १४. तडा १६. शिर १७. लाजिरवाणा १९. वदंता २१. वशीकरण २२. लाजरा २३. हरताळका २५. वदन २६. राणीव २८. हरित २९. पारखा ३०. चिंचोळा ३१. मकरकुंडले ३३. बस ३५. सामसूम ३७. चर ३९. टंगळमंगळ ४२. कुचराई ४४. वर्षाव ४५. डाव ४७. मनन ५०. जन ५१. कुसुमाकर ५३. वठार ५५. जलचर ५६. अनवरत ५७. सासुरवास ५९. मरवा ६०. साईस ६२. खटका ६५. कातळ ६९. यमक ७१. फत्ते ७२. बेसर ७३. घसट ७५. वखार ७६. आजारपण ७८. पाळ ७८अ. नीहार ७९. ओढाळ ८०. फलक ८२. वरणभात ८४. कर्बोदके ८५. कासावीस ८६. पदर ८८. तारवट ९०. शक ९२. सूचित ९३. चाल ९५. नारी ९६. मटकी ९८. काष्टा १००. हाल १०२. कड १०३. हर

## वाढदिवसाला राज्यभर वृक्षारोपण करा मनसैनिकांना राज ठाकरेंचे आवाहन

पान १ वरून

फुलांची, फळांची किंवा टिकतील अशी झाडं तुमच्या परिसरात लावा. फळांची आणि फुलांच्या झाडांना ऊन लागतं. त्यामुळे त्यांना ऊन आणि पाणी मिळेल अशाच ठिकाणी लावा. पुन्हा ती रस्ते रुंदीकरणात तुटली जाणार नाहीत याचीही काळजी घ्या. पुढे राज ठाकरे म्हणाले की, या नव्याने लावलेल्या रोपांची, झाडांची काळजी घेणे, त्याला पाणी घालणे या उपक्रमात सामील करून घ्या, जेणेकरून ती झाडे दीर्घकाळ टिकतील. साधारणपणे १ ते १.५ महिन्यांपूर्वी चंद्रपूरमध्ये प्राणी जंगलातून बाहेर येऊन शहरांत पाण्यासाठी वणवण भटकत आहेत अशी दृश्य मी पाहिली, आणि मी तत्काळ माझा चंद्रपूरमधला सहकारी मनदिप रोडेला फोन करून प्राण्यांसाठी पाणवठे करायला सांगितले. आणि त्याने तत्काळ ते पाणवठे तयार केले. त्यामुळे असेच पाणवठे तयार करा. यावर्षी जर पाऊस कमी झाला तर पुढच्या वर्षाच्या सुरुवातीपासूनच प्राणी पाण्यासाठी वणवण फिरणार आहेत. त्यामुळे प्राण्यांसाठी, पक्ष्यांसाठी जंगलांच्या तोंडाशी, अगदी शहरांमध्ये सुद्धा भटक्या प्राण्यांसाठी पाणवठे उभारा आणि फक्त पाणवठे उभारून थांबू नका.

# अजित पवारांच्या मृत्यूस कारणीभूत चार्टर विमानानेच सुनेत्रा पवारांचा प्रवास? व्हीएसआर की सीएमआर?

### अजित पवार अपघात अहवाल रोहित पवार पुन्हा आक्रमक

राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे आमदार रोहित पवार यांनी अहमदाबाद विमान दुर्घटनेच्या तपास अहवालावरून आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या विमान अपघात प्रकरणावरून आज पुन्हा सत्ताधाऱ्यांसह विरोधकांवरही टीकेची झोड उठवली आहे. रोहित पवार यांनी एक्स वर केलेल्या पोस्टमध्ये म्हटले आहे की, अहमदाबाद विमान दुर्घटनेला वर्ष पूर्ण होत आली आहेत. नियमानुसार अशा दुर्घटनांचा अंतिम तपास अहवाल एका वर्षाच्या आत सादर करणे अपेक्षित असते. मात्र अद्यापही अंतिम अहवाल समोर आलेला नाही. विमान अपघात तपास यंत्रणा तपास हा तांत्रिक स्वरूपाचा असतो आणि त्यामध्ये गुन्हेगारी तपासाचा समावेश नसतो. असे असतानाही अहवाल वेळेवर येत नाहीत, हे सर्वांनाच माहिती आहे.

रोहित पवार यांनी आपल्या पोस्टमध्ये 'अजितदादांच्या अपघाताचा अहवाल येऊ द्या, अहवालाची वाट बघूया', असे सांगणाऱ्यांवर त्यांनी थेट हल्ला चढवला.ते म्हणाले की, अशा प्रकारची भूमिका घेणारे लोक 'सत्तेचे दलाल, सत्तेचे लालची, नमकहराम आणि कृतघ्न' आहेत. फक्त सत्तेच्या जवळ राहण्यासाठी आणि राजकीय फायद्यासाठी काही लोक अशा प्रकारची भूमिका घेतात. मैत्री, नातीगोती आणि संबंध याबद्दल अनेकजण व्यासपीठावर बोलतात. पण प्रत्यक्षात त्याचे काहीच महत्त्व नसते का? त्यांच्या या वक्तव्याचा रोख अजित पवार यांच्याशी राजकीय जवळीक दाखवणाऱ्या, पण त्यांच्या विमान अपघात प्रकरणात ठोस भूमिका न घेणाऱ्या नेत्यांकडे असल्याची चर्चा राजकीय वर्तुळात सुरू आहे.

पान १ वरून

असते. अजितदादांच्या ज्याप्रकारे अपघात झाला, त्याची अनेक उत्तरे अजुनही आमच्याकडे नाहीत. एक बहीण म्हणून त्यांची उत्तरे मला हवी आहेत. आज नाही उद्या, पण उत्तरे मिळायला हवीत. ही उत्तरे आम्ही संसदेत नेहमी मागतो. कारण अजितदादा माझा फक्त भाऊ नव्हता, तर या राज्याचा उपमुख्यमंत्री होता. विमानाच्या मेन्टेनन्सचा प्रॉब्लेम होता का? असेल तर त्याला जबाबदार कोण? आज माझा भाऊ गेला, उद्या दुसऱ्या कुणाच्या घरावर असा दिवस येऊ नये.

अजित पवार यांच्या अपघातानंतर राष्ट्रवादी शरद पवार गटाचे आमदार रोहित पवार यांनी 'व्हीएसआर' कंपनीवर अनेक आरोप सतत केले आहेत. या कंपनीविरोधात अनेक पत्रकार परिषदा घेऊन त्यांनी मोहीमच सुरू केली आहे . महाराष्ट्रातील विविध नेत्यांनी व्हीएसआरच्या विमानांचा वापर टाळावा, असे आवाहनदेखील त्यांनी केले होते. मात्र, या आवाहनानंतरही अजित पवार यांचे पुत्र पार्थ पवार यांनीही एप्रिल महिन्यात मुंबई ते पुणे प्रवास याच विमानाने केला होता. आता त्याच कंपनीच्या विमानाने सुनेत्रा पवार यांनी प्रवास केला असल्यास ते धक्कादायक आहे.

या प्रवासाबाबत आणखी एक वाद निर्माण झाला आहे. पंतप्रधान मोदी यांनी इंधन काटकसरीचा संदेश दिल्यानंतर मुख्यमंत्री फडणवीस याच एनडीएच्या बैठकीला इंडिगोच्या विमानाने इतर प्रवाशांसह दिल्लीला गेले. सुनेत्रा पवार या मात्र खाजगी विमानाने गेल्या.

## तेलवाहू जहाजावरील अमेरिकेच्या हल्ल्यात तीन भारतीयांचा मृत्यू

पान १ वरून - बंदीचे उल्लंघन करण्याचा प्रयत्न केला. अमेरिकन नौदलाने इशारा देऊनही जहाजाने मार्ग न बदलल्याने हा हल्ला करण्यात आला. एफएसयूआयचे सरचिटणीस मनोज यादव यांनी अमेरिकेवर निशाणा साधत म्हटले की, अमेरिकन नौदलाला या जहाजावर भारतीय नागरिक आहेत याची माहिती नव्हती, यावर विश्वास ठेवणे कठीण आहे. अमेरिकेला सर्व काही माहीत होते. जर जहाजाने त्यांच्या सूचनांचे पालन केले नव्हते, तर त्यांच्यावर थेट क्षेपणास्त्र हल्ला करण्याऐवजी जहाज जप्त करता आले असते. हा निष्पाप खलाशांचा जीव घेण्याचा प्रकार आहे. दरम्यान, अमेरिका व इराणमध्ये आज सलग दुसऱ्या दिवशीही हल्ले सुरू होते. ट्रम्प यांनी सांगितले की, अमेरिकन सैन्याने इराणवर ४९ टॉमहॉक क्षेपणास्त्रे डागली आणि लढाऊ विमानांच्या सहाय्यानेही हल्ले केले.

बँक ऑफ महाराष्ट्र
Bank of Maharashtra
भारत सरकार का उद्यम
91
एक परिवार एक बैंक

**मुंबई उत्तर विभागातील बँक ऑफ महाराष्ट्रच्या ४५ शाखा आणि १ विभागीय कार्यालयाचे विद्युत लेखापरीक्षण**

बँक ऑफ महाराष्ट्र, मुंबई उत्तर विभाग, ६३२, यशोमंगल, गांधीनगर, वांद्रे पूर्व, मुंबई - ४०००५१ हे मुंबई उत्तर विभागातील ४५ शाखा आणि १ विभागीय कार्यालयाच्या विद्युत लेखापरीक्षणासाठी अर्ज मागवत आहे. अर्ज फॉर्मसह इतर सर्व तपशील आमच्या वेबसाइटवर उपलब्ध आहेत:
www.bankofmaharashtra.bank.in/tenders
अर्ज फॉर्म दि.११.०६.२०२६ पासून बँक ऑफ महाराष्ट्रच्या वेबसाइटवरून डाउनलोड करता येतील. कोणतेही कारण न देता कोणताही /सर्व अर्ज फेटाळण्याचा अधिकार बँकेकडे राखून ठेवलेला आहे. अर्ज सादर करण्याची अंतिम तारीख २५.०६.२०२६ रोजी दु.०३:०० वा. पर्यंत आहे. आवश्यक शुल्क न भरलेले किंवा अपूर्ण / स्वाक्षरी नसलेले अर्ज स्वीकारले जाणार नाहीत.

सही/-
उप विभागीय व्यवस्थापक,
बँक ऑफ महाराष्ट्र, मुंबई उत्तर विभाग,
मुंबई

दि म्युनिसिपल को-ऑपरेटिव्ह बँक लिमिटेड, मुंबई
म्युनिसिपल बँक भवन, २४५ पी.डि'मेलो रोड, फोर्ट, मुंबई - ४०० ००१.

**निविदा सूचना**

बँकेकरीता पोस्टल सर्व्हिसेसचा अनुभव असलेल्या संस्थांकडून निविदा मागविण्यात येत आहेत. सदर निविदा महाव्यवस्थापक, दि म्युनिसिपल को-ऑपरेटिव्ह बँक लिमिटेड, मुंबई यांना संबोधित करुन सिलबंद लिफाफ्यामध्ये **"Tender for Postal Mailing to The Municipal Co-operative Bank Ltd., Mumbai"** या नावाने शनिवार, दिनांक २०.०६.२०२६ रोजी सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत पाठविणे आवश्यक आहे. अधिक माहितीसाठी व निविदा दस्तऐवज (Documents) डाऊनलोड करण्यासाठी बँकेच्या www.mcb.bank.in या संकेतस्थळावर भेट द्यावी.

ठिकाण : मुंबई
दिनांक : १२.०६.२०२६
सही/-
महाव्यवस्थापक

महावितरण
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित

**जाहीर सुचना**

२२ के.व्ही. सोनारपाडा स्विचींग स्टेशन मधून निघणारी खालील आऊटगोईंग वाहिनी देखभाल व दुरूस्तीचे कामाकरिता दि. १२.०६.२०२६ रोजी खाली दिलेल्या वेळेत बंद राहणार असून या काळात कल्याण पूर्व विभागामधील खालील परिसरातील विदयुत पुरवठा पूर्णपणे बंद राहील याची ग्राहकांनी नोंद घ्यावी व म.रा.वि.वि.कंपनीस सहकार्य करावे ही विनंती.

| वाहिनीचे नाव | वेळ | प्रभावित क्षेत्र |
|---|---|---|
| २२ के.व्ही. जाडे रबर वाहिनी क्रं. ३०३ | ०८.०० ते १२.०० | एम आय डी सी परिसर |

कार्यकारी अभियंता, कल्याण (पूर्व) विभाग

पान ८ वरून - मी नेहमीच प्रयत्न करेन. पक्ष शिस्तीसाठी त्यांनी घेतलेले काही कठोर घेताना माझ्या स्वभावानुसार मला जड जाईल, याची मला जाणीव आहे. परंतु पक्षाला सर्वोच्च प्राधान्य हेच माझे धोरण राहील. पक्षापेक्षा कोणीही नेता मोठा नाही, हा माझा विचार राहील. पक्षात ज्येष्ठांचा योग्य मान राखला जाईल. त्याचवेळी पक्षात विनाकारण हस्तक्षेप खपवून घेतला जाणार नाही. पक्षाची बदनामी होणार नाही याची खबरदारी प्रत्येकाने घेतली पाहिजे. माझ्यावर कठोर भूमिका घेण्याची वेळ येऊ देऊ नका.

# पक्षात अनावश्यक हस्तक्षेप नको

पक्षाच्या पुढील वाटचालीसाठी घरोघरी राष्ट्रवादी, मनोमनी राष्ट्रवादी, हा नवा मंत्र त्यांनी कार्यकर्त्यांना दिला. त्या म्हणाल्या की, ज्येष्ठांचा अनुभव आणि तरुणांची ऊर्जा याचा समन्वय घडवून आपल्याला पुढील वाटचाल करायची आहे. प्रत्येक कार्यकर्त्याच्या कष्टांची दखल घेतली जाईल.योग्य वेळी प्रत्येकाला न्याय दिला जाईल.पदाधिकाऱ्यांना गुणवत्ता आणि पात्रतेनुसार संधी दिली जाईल. आगामी निवडणुकांसाठी आजपासूनच कामाला लागा. गावागावांत जा, लोकांशी बोला, त्यांच्या समस्या समजून घ्या.पक्ष विस्तारासाठी झटून काम करा. वादळांना पाहून आम्ही आमची गलबते कधी वळवली नाहीत, संकटांना सामोरे जाताना आम्ही आमची पावले कधी रोखली नाहीत, घड्याळाच्या काट्याचा प्रवास कधी थांबणार नाही आणि संघर्षाच्या रणांगणातून राष्ट्रवादी कधी मागे हटणार नाही,अशी प्रेरणादायक शायरी ऐकवत सुनेत्रा पवार यांनी भाषणाची सांगता केली.

**PUBLIC NOTICE**

This is to give Notice to the Public at large that my clients **M/s. AOS PRATISHTHA DEVELOPMENTS formerly known as AMBIT BUILDCON** have instructed me to investigate their right, title, interest and entitlement for development, redevelopment in respect of the property described in Schedule hereunder written.

Hence any person either having or claiming any right, title, interest or claim in and/or possession of the said property in any manner including by way of any agreement, undertaking, Arrangement, Sale, Transfer, Exchange, Conveyance, Assignment, Charge, Mortgage, Gift, Trust, Lease, monthly tenancy, Leave and license, Partnership, Joint Venture, Inheritance, lien, any right, title, interest or claim of any nature, dispute, suit, decree, other, restrictive covenants, order of injunction, attachment, acquisition, requisition or otherwise is hereby called upon and required to make the same known to the undersigned in writing within 14 days from the date of publication hereof either by hand delivery against proper written acknowledgement of the undersigned or by Registered Post A. D. only at the address of the undersigned viz. B/902, 903, Hubtown Shikher, Parsi Panchayat Road, Andheri (East), Mumbai- 400 069, failing which any such claim shall be deemed to be waived and/or abandoned and thereafter the investigation of the title and entitlement of my client will deemed to be completed.

**SCHEDULE OF PROPERTY**

All that piece and parcel of land of village Bandra A, H-West ward, Taluka Bandra, M.S.D., bearing CTS No. A/237, A/238, A/239, A/240 & A/241 situated at Bazar Road, Bandra West total area admeasuring 2460.70 sq mts as per PRC.

Dated, this **12th** day of **June, 2026.**

Sd/-
**(ANIL R. MISHRA)**
Advocate High Court
Mumbai

**जाहीर सूचना**

याद्वारे सर्वसामान्य जनतेस जाहीर सूचना देण्यात येते की, माझे अशील हे कार्यालयाचे मालक श्री.किरीट जयप्रकाश जैन यांच्याकडून कार्यालय क्र.४१०, मोजमाप सुमारे ४८२ चौ. फूट रेरा कार्पेट क्षेत्रफळ, ४थ्या मजल्यावर, 'ला प्रेंडा' म्हणून ज्ञात इमारतीत, केव्हज रोड, जोगेश्वरी (पूर्व), मुंबई–४०००६० येथे स्थित असून त्यासोबत बेसमेंट क्र.३ मध्ये १ कार पार्किंग समाविष्ट कार्यालय खरेदी करण्याबाबत वाटाघाटी करीत आहेत.

कोणत्याही/सर्व व्यक्ती आणि/किंवा वित्तीय संस्थांना खाली नमूद केलेल्या फ्लॅट संदर्भात विक्री, देवाणघेवाण, गहाणखत, शुल्क, भेटवस्तू, ट्रस्ट, ताबा, वारसा, पारेषण, धारणाधिकार, सुखसोयी, मृत्युपत्र किंवा इतर कोणत्याही प्रकारे कोणताही हक्क, शिर्षक, लाभ आणि/किंवा हितसंबंध असल्याचा दावा असल्यास त्यांनी याद्वारे ते लेखी स्वरूपात, दाव्याच्या समर्थनार्थ सर्व नोंदणीकृत कागदपत्रांच्या नोटरीकृत सत्य प्रतींसह, वकिल **श्री.दिपेश जे. सांचला,** कार्यालय क्र.ए-०२, तळ मजला, आलोक अपार्टमेंट कोहौसोलि, महंत रोड एक्स्टेंशन, विले पार्ले पूर्व, मुंबई ४०००५७ येथे यांच्या कार्यालयात, हे प्रकाशन झाल्यापासून १४ दिवसांच्या आत कळवावे, अन्यथा असे सर्व दावे, हक्क, शिर्षक, फायदे आणि/किंवा हितसंबंध, पुढील कोणत्याही सूचना न देता माफ केले गेले आहेत आणि/किंवा सोडून दिले आहेत असे मानले जाईल.

**मालमत्तेची अनुसूची**

सदर सर्व ते कार्यालय क्र.४१०, मोजमाप सुमारे ४८२ चौ. फूट रेरा कार्पेट क्षेत्रफळ, ४थ्या मजल्यावर, 'ला प्रेंडा' म्हणून ज्ञात इमारतीत, केव्हज रोड, जोगेश्वरी (पूर्व), मुंबई–४०००६० येथे स्थित असून त्यासोबत बेसमेंट क्र. ३ मध्ये १ कार पार्किंग आणि सदर इमारत मुंबई उपनगर जिल्ह्याच्या नोंदणी जिल्हा आणि उप-जिल्ह्यात, अंधेरी तालुक्यात, बांदिवली या महसूल गावात किंवा त्याच्या आसपास, सीटीएस क्र. २६२-ए आणि २६२-सी असलेल्या प्लॉटवर बांधकामित.

दिनांक: १२.०६.२०२६
सही/-
**(श्री.दिपेश जे. सांचला)**
वकिल

**PUBLIC NOTICE**

NOTICE is hereby given to the public at large that we are investigating the title of PEARL PALACE CO-OPERATIVE HOUSING SOCIETY LIMITED ("said Society") a Society registered under the provisions of the Maharashtra Co-operative Societies Act, 1960 and Rules made thereunder, under registration No. MUM/WKW/HSG(TC)/15196/12-13 and having its registered office Versova, J.P Road, Seven Bungalows, Andheri (West), Mumbai -400 061, to the property more particularly described in the Schedule hereunder written and also to the title/entitlement of M/s. SAACHI INFRA ("the said Developers"), a Partnership Firm incorporated under the Indian Partnership Act, 1932 under Certificate No. 27682441743P and having its registered office address at 101/102, 1st Floor, Sea View Apartment, Next to Hinduja House, Dr. Annie Besant Road, Mumbai -400 018, as Developers who have acquired development rights in respect of the property from the said Society vide Development Agreement dated 15th January, 2025 executed by and between the said Society (as Society) and Protima Rani Chowdhary & Ors (as Members) and the said Developers (as Developers) and duly registered with the office of the Sub-Registrar of Assurances at Andheri No.1 under serial No. BDR-1-681-2025 read with Supplemental Development Agreement dated 5th May, 2026 executed by the said Society (as Society) and Protima Rani Chowdhary (as Member) and the said Developers (as Developers) and duly registered with the office of the Sub-Registrar of Assurances at Mumbai -12 under serial No. MUM-12-8609-2026. The said Society also executed a Power of Attorney dated 15/01/2025 in favor of the said Developers and duly registered with the office of the Sub-Registrar of Assurances at Andheri No.1 under serial No. BDR/1/687/2025.

All and any person(s) having any direct or indirect, written or oral, share, right, title, benefit, interest, claim, objection and/or demand of any nature whatsoever against, in to or upon the said Property or any part thereof including in any transferable development rights (TDR), floor space index (FSI) or any built up areas constructed and/or to be constructed on the said Property or any part/portion thereof by way of sale, transfer, exchange, lease, sub-lease, agreement to lease, assignment, encumbrance, mortgage, charge, lien, partnership, inheritance, bequest, succession, gift, maintenance, easement, trust, tenancy, sub-tenancy, leave and license, care-taker basis, occupation, possession, family arrangement, settlement, contracts/ agreements, development rights, joint development rights, development management agreement, joint venture, option agreement, allotment, booking, barter arrangement, guarantee, covenant, trust, wakf, maintenance, easement, right of way, reservation, lis-pendens, beneficial interest, relinquishment, partition, power of attorney, pledge, loans, advances, order or decree or direction or order of any court of law or any other statutory or adjudicating authority or arbitration memorandum of deposit of title documents, security or otherwise howsoever, are hereby required to notify the same in writing along with supporting documentary evidence to the undersigned at 204-B, 2nd floor, "Hallmark Business Plaza", Near Gurunanak Hospital, Bandra (East), Mumbai – 400 051 , within 11 days from the date hereof, failing which any such right, title, benefit, interest , claim and/or demand in/qua the said Property shall be deemed to have been waived and/or abandoned and no such right, title, benefit, interest, claim and/or demand exists and we shall issue title certificate thereof without any reference /recourse to such claim and/or objections if any and the same shall be considered as waived and/or abandoned.

**THE SCHEDULE ABOVE REFERRED TO:**

(Description of the said Property)
All that piece and parcel of Plot of land or ground bearing Plot No. 60 admeasuring 846.80 sq.mtrs bearing Survey No. 95(pt) and corresponding to CTS No. 1301/2/A of Village Versova, Taluka Andheri in the Mumbai Suburban District within the Registration District and Sub-District of Mumbai City and Mumbai Suburban together with the existing building known as "Pearl Palace" consisting of basement, ground plus 8 upper floors comprising of 8 residential flats and 3 shops/ commercial premises situate, lying and being at Versova, J. P Road, Seven Bungalows, Andheri (West), Mumbai -400 061 and the said Plot is bounded as follows:

On or towards North: 1301/1;
On or towards South: 1301/4;
On or towards West: 1301/2B;
On or towards East: 1301/3.

Dated this 12th day of June, 2026
For **M/s. Law Origin**
Sd/-
**Namita Chetan Natekar**
Partner

# 'कॉकरोच'चे दुसरे आंदोलनही फेल

पान १ वरून - परवानगी दिली होती. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याजवळ आंदोलनाची सुरुवात करण्यात आली. यावेळी केंद्रिय शिक्षणमंत्र्यांच्या राजीनाम्याची मागणी करत आंदोलनकर्त्यांनी जोरदार घोषणाबाजी केली. तसेच विद्यार्थ्यांवरील अन्याय, पेपरफुटी प्रकरण आणि आत्महत्यांच्या घटनांवर कठोर कारवाईची मागणी करण्यात आली.

या आंदोलनात लडाखचे पर्यावरण कार्यकर्ते सोनम वांगचुक, ज्येष्ठ विचारवंत विश्वंभर चौधरी, प्रसिद्ध कायदेतज्ज्ञ ॲड. असीम सरोदे तसेच माहिती कार्यकर्ते कार्यकर्ते विजय कुंभार उपस्थित होते. त्यामुळे हे आंदोलन अभिजित दीपके यांच्या हातातून निसटून निवडक लोकांच्या प्रभावाखाली गेल्याची चर्चा सुरू झाली आहे. विद्यार्थ्यांच्या प्रश्नावर उभे राहिलेले हे आंदोलन आता राजकीय वळण घेत असल्याचे दिसून आले. आयोजकांनी मोठ्या संख्येने तरुण सहभागी होतील असा दावा केला होता. मात्र प्रत्यक्षात आंदोलनस्थळी अपेक्षेपेक्षा खूपच कमी गर्दी दिसून आली. यापूर्वी ६ जून रोजी दिल्लीतील जंतर-मंतर येथे झालेल्या आंदोलनालाही मर्यादित प्रतिसाद मिळाला होता. त्यानंतर पुण्यात मोठी चळवळ उभी राहील, असा दावा करण्यात आला होता. मात्र पुण्यातही आंदोलनाला माफक प्रतिसाद मिळाला. मात्र, अभिजीत दीपके आंदोलनाला संबोधताना म्हणाला की, मी आज सकाळीच माध्यमांना सांगितले होते की, जंतरमंतरपेक्षा अधिक 'कॉकरोच' पुण्यात येतील. पुण्याने ते करून दाखवले. जंतरमंतरपेक्षा आजची सभा अधिक मोठी झाली आहे. आता पुढील १२ जून रोजी लखनौ, १३ जून रोजी अमृतसर, १४ जून रोजी हैदराबाद आणि १५ जून रोजी जयपूर येथे होणार आहे. त्यानंतर २० जून रोजी दिल्ली येथे भव्य आंदोलन आयोजित करण्यात येणार असून, देशभरातील तरुणांना मोठ्या संख्येने सहभागी होण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

### पंतप्रधान मोदी- दीपकेची अमेरिकेत भेट संजय राऊत यांचा खळबळजनक दावा

पान १ वरून - समोर येते, तेव्हा माध्यमांसमोर मांडणे आवश्यक आहे. कोणत्याही राजकीय पक्षाचा नेता त्या आंदोलनाला गेला नाही. तरुणांचे प्रश्न आणि तरुणांना आम्ही पाठिंबा दिला. जे तरुण रस्त्यावर उतरले आहेत, त्या तरुणांचे सरकारने ऐकायला हवे यासाठी आम्ही भूमिका मांडली. या माध्यमातून सरकारला मदत करत असेल तर त्यावर लक्ष ठेवणे आमचे काम आहे. संजय राऊत यांनी केलेला दावा अभिजित दीपके याने फेटाळून लावला आहे. दीपके म्हणाला की, मला माहिती नाही. एआय वापरून तयार केलेले असू शकतात. कारण पंतप्रधानांना मी कसा भेटणार? मी तिथे एक साधा विद्यार्थी होतो.

महावितरण
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित

**जाहीर निवेदन**

बदलापूर (प) मधील ग्राहकांना सूचित करण्यात येते की खालील नमूद केकेल्या वाहिनीवर तांत्रीक दुरुस्तीचे काम करावयाचे असल्याने संबंधित वाहिनी दि. १२.०६.२०२६ रोजी विद्युत पूरवठा बंद राहील.ग्राहकांची होणाऱ्या गैरसोयीबद्दल महावितरण कंपनी दिलगिरी व्यत्य करीत आहे

| क्र. | उपकेंद्र | वाहिनी | दिनांक | भागाचे नाव |
|---|---|---|---|---|
| १ | २२/२२ केव्ही खरवई स्विचिंग केंद्र | २२ केव्ही MIDC फीडर | १०.०० ते १६.०० (सहा तास) दि. १२.०६.२०२६ | शिरगाव MIDC, घाडगे नगर, सत्यमशिला, पनवेलकर oxford, Deuluxuria |

Sd/-
कार्यकारी अभियंता, बदलापूर विभाग



# वर्ल्ड कप यावेळी नेदरलँड्स जिंकणार जर्मन गणितज्ञ क्लेमेंट यांचे भाकित

सविस्तर वाचण्यासाठी व शेअर करण्यासाठी हा क्युआर कोड स्कॅन करा

**बर्लिन** - जगातील सर्वात मोठी क्रीडा स्पर्धा अशी ओळख असलेल्या फिफा फुटबॉल विश्वचषक स्पर्धेचा थरार सुरू झाला. या स्पर्धेशी संबंधित एक चमत्कारिक गोष्ट आहे. ती म्हणजे जर्मन गणितज्ञ जोकीम क्लेमेंट यांचे भाकीत. मागील तीन विश्वचषक सामन्यांच्या सुरुवातीलाच त्यांनी जो संघ विजेता होण्याचे भाकित केले होते ते तंतोतंत खरे ठरले आहे. २०१४ मध्ये जर्मनी, २०१८ मध्ये फ्रान्स, २०२२ मध्ये अर्जेंटिना विजयी होणार ही त्यांची भाकिते खरी ठरली. यावेळी त्यांनी नेदरलँड्स चॅम्पियन होणार असे भाकीत केले आहे. देशाचे सकल राष्ट्रीय उत्पन्न (जीडीपी), लोकसंख्या, दरडोई उत्पन्न आणि देशात फुटबॉलची असलेली लोकप्रियता या बाबी विचारात घेत गणित मांडून ते विजेत्याचे नाव आधीच अचूक सांगतात. यावेळचे त्यांचे भाकित खरे ठरते का, हे पाहणेही विश्वचषक सामने पाहण्याएवढेच औत्सुक्याचे ठरेल.

## पक्षात अनावश्यक हस्तक्षेप नको सुनेत्रा पवार यांचा कडक इशारा

■ मुंबई

**दिवंगत** माजी उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या निधनानंतर झालेल्या राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या पहिल्याच वर्धापनदिन सोहळ्यात सुरुवातीला भावूक झालेल्या पक्षाच्या राष्ट्रीय अध्यक्षा सुनेत्रा पवार यांनी भाषणाच्या शेवटी अजित पवारांच्या कणखरपणाची झलक दाखवली. पक्षात ज्येष्ठ नेत्यांचा योग्य तो मान राखला जाईल, अशी ग्वाही देताना पक्षात विनाकारण हस्तक्षेप खपवून घेतला जाणार नाही,



असा कडक इशारा दिला.

सुनेत्रा पवार म्हणाल्या की, समाजातील सर्व घटकांना न्याय मिळवून देण्याचा अजित पवारांचा ध्यास, त्यांच्या कामाचा झपाटा आणि त्यांनी उभा केलेला कामाचा डोंगर या साऱ्याची जाणीव मला पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्षपद स्वीकारताना होती. अजित पवार यांच्या पावलावर पाऊल टाकून चालण्याचा » पान ७ वर

## यंदा मराठवाड्यात सर्वात कमी पावसाची शक्यता

■ पुणे

**यंदा** महाराष्ट्रात एल निनोच्या प्रभावामुळे पाऊसमान कमी राहण्याचे संकेत भारतीय हवामान खात्याकडून देण्यात आले आहेत. याचा सगळ्यात जास्त फटका हा मराठवाड्यातील जिल्ह्यांना बसणार असल्याचा अंदाज हवामानशास्त्र विभागाच्या तज्ज्ञांकडून व्यक्त केला जात आहे. एल निनोमुळे मराठवाड्यात पाऊस कमी राहणार असून, उन्हाची तीव्रता जास्त असणार आहे. तशी शक्यता वसंतराव नाईक कृषी विद्यापीठातील हवामानशास्त्र विभागाचे प्रमुख डॉ. कैलास डाखोरे यांनी व्यक्त केली आहे. त्यामुळे यावर्षी शेतकऱ्यांनी चांगला पाऊस झाल्याशिवाय पेरणी करू नये, यासह कमी कालावधीत येणारी पिके शेतकऱ्यांनी घ्यावीत, असे आवाहन त्यांनी केले आहे. सध्या मान्सून कोकणात दाखल झाला असला तरी राज्यभरात पोहोचलेला नाही. पुढील काही दिवसांत त्याची व्याप्ती वाढणार आहे. मुख्यमंत्री कार्यालयानेदेखील १५ जूनपर्यंत मोठा पाऊस होण्याची शक्यता आहे.

## जेटी प्रकल्पासाठी गिरगाव चौपाटीवरून बोटी हटवल्या! कोळी समाज आक्रमक

■ मुंबई

**गिरगाव** चौपाटीवर कोळी बांधवांच्या बोटी पोलिसांकडून आज सकाळी हटवल्याने मोठा वाद निर्माण झाला. या कारवाईचा कोळी बांधवांनी तीव्र विरोध केला. शासनाच्या नवीन जेटी प्रकल्पासाठी आम्हाला इथून जाणीवपूर्वक हटवले जात असल्याचा आरोप कोळी बांधवांनी केलेला आहे. विशेष म्हणजे, कोळी बांधवाच्या बोटींवर यापूर्वीही अशी कारवाई झाली आहे.

स्थानिक कोळी बांधवांना आणि त्यांच्या बोटींना तिथून हटवण्याचे आदेश मत्स्यव्यवसाय विभागाने दिले आहेत. या कारवाईमुळे दक्षिण



मुंबईतील पारंपरिक मच्छीमार आणि कोळी समाज आक्रमक झाला आहे. याबाबत बोलताना कोळी बांधव म्हणाले की, १९९५ मध्ये प्रमोद नवलकरांनी जागा पाडली. त्यानंतर आमचे या चौपटीवर दहा वेळा स्थलांतर झालेले आहे. त्यांचे सगळे पुरावे आमच्याकडे आहे. प्रॉपर्टी कार्डही आहे. आमच्याकडे कोर्टाचे आदेश आहेत. आमच्याकडे सगळ्या होड्यांची कागदपत्रे आहेत. सगळे बरोबर असतानाही आम्हाला त्रास होतो आहे. आम्हाला कुठलीही नोटीस दिली नाही आणि कुठला प्रोजेक्ट इथे होत आहे, हेही माहीत नाही. गिरगाव चौपाटी मध्ये मोठी जेटी तयार होत आहे. या जेटीच्या माध्यमातून आम्हाला त्रास दिला जात आहे.

## ठाण्याचा बिहार व्हायला वेळ लागणार नाही! अविनाश जाधवांचा इशारा

■ ठाणे

**ठाण्यात** किरकोळ कारणावरून सरोज दस्तुर यांना ओला चालकाने मारहाण केली होती. या घटनेचा व्हिडिओ समाजमाध्यमांवर व्हायरल झाल्यानंतर मनसेचे नेते अविनाश जाधव यांनी कार्यकर्त्यांसह विवियाना मॉल परिसरात जाऊन ओला-उबेर चालकांना इशारा दिला. यावेळी काही चालकांसोबत वादावादी झाल्यानंतर मनसे कार्यकर्त्यांनी त्यांना चोप दिल्याचा व्हिडिओही प्रसारित झाला आहे. यानंतर जाधव यांनी आज पत्रकार परिषद घेत ठाण्यात गुन्ह्यांचे प्रमाण वाढले असून, अशीच परिस्थिती राहिली, तर ठाण्याचा बिहार व्हायला वेळ लागणार नाही, असे वक्तव्य केले.

अविनाश जाधव म्हणाले की, ठाण्यात मागील काही दिवसांमध्ये चैन स्नॅचिंग आणि मोबाईल चोरीच्या घटनांमध्ये मोठ्या प्रमाणात वाढ झाली आहे. आता गुन्हेगार थेट नागरिकांवर हल्ले करू लागले आहेत. ठाण्यात पुन्हा एकदा कायदा सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झाला आहे. विवियाना मॉलच्या बाहेर ज्येष्ठ नागरिकाला मारहाण केल्याची घटना घडली. त्याठिकाणी मोठ्या प्रमाणात टपऱ्या उभ्या राहिल्या आहेत. तिथे सिगारेट, तंबाखू आणि गुटखा विकला जातो.

## राम मंदिर दानपेटी भ्रष्टाचारात मोठे शक्तिशाली लोक सहभागी

**ब्रजभूषण सिंह यांचा दावा**

■ नवी दिल्ली

**अयोध्येतील** राम मंदिराच्या दानपेटीतील कोट्यवधी रुपयांचा अपहार झाल्याच्या आरोपावरून उत्तर प्रदेशमधील राजकीय वातावरण तापले असताना भाजपाचे माजी खासदार आणि कुस्ती महासंघाचे वादग्रस्त माजी अध्यक्ष ब्रजभूषण सिंह यांच्या वक्तव्यामुळे खळबळ उडाली आहे. या गैरव्यवहारात खूप मोठे शक्तिशाली लोक सामील आहेत, असा दावा ब्रजभूषण सिंह यांनी केला आहे.

ब्रजभूषण म्हणाले की, राम मंदिर दानपेटी गैरव्यवहाराची खडान्‌खडा माहिती माझ्याकडे आहे. मी जर सर्व काही सांगून



टाकले तर अनेकांचे बुरखे फाटतील. मात्र हे लोक खूप मोठे आणि शक्तिशाली आहेत. ते त्यांचे पितळ उघडे पाडले तर ते मला सोडणार नाहीत. त्यामुळे मी सध्या भीतीपोटी खरे बोलणे टाळत आहे. योग्य वेळ येताच मी या विषयावर अधिक बोलेन. राम मंदिराच्या दानपेटीतून कोट्यवधी रुपये चोरण्यात आले आहेत, असा दावा समाजवादी पार्टीचे अध्यक्ष अखिलेश यादव यांनी केला होता. त्यानंतर या मुद्यावर राज्याचे राजकारण तापले. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी या गोष्टीची गंभीर दखल घेतली. राम मंदिर बांधकाम समितीचे अध्यक्ष आणि पंतप्रधानांचे माजी प्रधान सचिव नृपेंद्र मिश्रा यांनी तातडीने अयोध्येत दाखल होत पदाधिकाऱ्यांची बंद दाराआड बैठक घेतली होती.

## तुळापूर रेव्ह पार्टी प्रकरणावरून राष्ट्रवादी शरद पवार गट आक्रमक

■ पुणे

**तुळापूर** हाय-प्रोफाईल रेव्ह पार्टी प्रकरणावरून शरद पवार गटाने सरकारविरोधात आक्रमक भूमिका घेतली आहे. छत्रपती संभाजी महाराजांच्या स्मृतिस्थळाच्या परिसरात व छत्रपती शिवाजी महाराजांच्या राज्याभिषेक दिनी अशा प्रकारच्या मद्य व अमली पदार्थांच्या पार्टीला परवानगी देण्यात आलीच कशी, असा सवाल पक्षाच्या नेत्यांनी उपस्थित केला आहे.

यासंदर्भात पक्षाच्या शिष्टमंडळाने राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या सचिवांची भेट घेऊन या प्रकरणाचा जाब विचारला आहे. पक्षाच्या महिला प्रदेशाध्यक्षा रोहिणी खडसे यांनी सोशल मीडियावरून याबाबत माहिती देत सरकार व संबंधित यंत्रणांवर गंभीर प्रश्न उपस्थित केले आहेत. आळंदी-मरकळ रोडवरील तुळापूर येथील एका खासगी बंगल्यात आयोजित करण्यात आलेल्या प्रोजेक्ट एक्स नावाच्या रेव्ह पार्टीवर पुणे गुन्हे शाखेच्या पथकाने रविवारी पहाटे अडीच वाजण्याच्या सुमारास छापा टाकला. या कारवाईत १०७ तरुण व ४९ तरुणींना ताब्यात घेण्यात आले. याबाबत शरद पवार गटाच्या नेत्यांनी उत्पादन शुल्क विभागाच्या सचिवांची भेट घेऊन संबंधित पार्टीसाठी परवानगी देण्यात आली होती का, असल्यास ती कोणत्या निकषांवर देण्यात आली.

## न्यूजक्लिकवरील आरोपांचा पुरावा नाही दिल्ली हायकोर्टाने गुन्हा व कारवाई रद्द केली

■ नवी दिल्ली

**दिल्ली** उच्च न्यायालयाने न्यूज पोर्टल न्यूजक्लिक आणि त्याचे मुख्य संपादक प्रबीर पुरकायस्थ यांच्याविरोधात परकीय निधी नियमांचे उल्लंघन केल्याच्या आरोपांवरून आर्थिक गुन्हे शाखेने दाखल केलेले आरोपपत्र तसेच ईडीने सुरू केलेला मनी लाँड्रिंगचा खटला रद्द केला. न्यूजक्लिक विरोधात एकही पुरावा सादर करता आला नाही. त्यामुळे न्या. नीना बन्सल कृष्णा यांनी हा निर्णय दिला. ईडीला ही मोठी चपराक आहे.

न्यायालयाने नमूद केले की, एफआयआरमधील आरोप पूर्णपणे सत्य मानले तरी भारतीय दंड संहितेच्या कलम





४०६ विश्वासघात आणि ४२० फसवणूकअंतर्गत गुन्हा सिद्ध होण्यासाठी आवश्यक पुरावे नाहीत. कारवाई सुरू ठेवणे म्हणजे कायद्याच्या प्रक्रियेचा घोर गैरवापर ठरेल, असे निरीक्षण नोंदवत न्यायालयाने ईडीचे आरोपपत्र व ईडीने नोंदवलेला ईसीआयआर दोन्ही रद्द केले. ऑगस्ट २०२० मध्ये दाखल करण्यात आलेल्या आरोपपत्रात आरोप करण्यात आला होता की, अमेरिकास्थित वर्ल्डवाईड मीडिया होल्डिंग्ज एलएलसी या कंपनीकडून न्यूजक्लिकला थेट परकीय गुंतवणुकीच्या स्वरूपात ९.५९ कोटी रुपये मिळाले होते. ही गुंतवणूक शेअर व्यवहाराद्वारे करण्यात आली आहे.

## सिंहस्थ कुंभमेळ्याच्या तयारीला वेग ५१ फूट ध्वजस्तंभाचे पूजन संपन्न

■ नाशिक

**नाशिक** सिंहस्थ कुंभमेळ्याच्या तयारीच्या पार्श्वभूमीवर नाशिकमधील पंचवटी येथील रामतीर्थ परिसरात ५१ फूट उंच ध्वजस्तंभाच्या शिलान्यास पूजनाचा धार्मिक सोहळा आज पार पडला. जगद्गुरू रामानंदाचार्य नरेंद्राचार्य महाराज आणि राज्याचे कुंभमेळामंत्री गिरीश महाजन यांच्या प्रमुख उपस्थितीत हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.

गंगा-गोदावरी पंचकोठी पुरोहित संघ, नाशिक यांच्या वतीने आयोजित करण्यात आलेला हा सोहळा सिंहस्थ कुंभमेळ्याच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचा मानला जात आहे. परंपरेनुसार जुना ध्वजस्तंभ काढून त्याजागी अधिक मजबूत, सुरक्षित आणि भव्य ध्वजस्तंभ उभारण्यात येणार आहे. नव्या ध्वजस्तंभाची उंची ५१ फूट आहे. आज वैष्णव आखाड्यांचे जगद्गुरू रामानंदाचार्य नरेंद्राचार्य महाराज यांच्या हस्ते शिलान्यास पूजनाचा विधी पार पडला.

## जुहू गल्ली झोपडपट्टी पुनर्विकास रिलायन्स करणार

■ मुंबई

**मुंबईच्या** पश्चिम उपनगरांतील अंधेरी पश्चिम येथील जुहू गल्ली झोपडपट्टी समूह पुनर्विकास प्रकल्पाचे कंत्राट रिलायन्स इंडस्ट्रीज समूहातील उपकंपनी असलेल्या आरआयआर रिअल्टी प्रायव्हेट लिमिटेड कंपनीच्या नेतृत्वाखालील कन्सोर्टियम मिळाले आहे. झोपडपट्टी पुनर्विकास प्राधिकरणाच्या (एसआरए) स्पर्धात्मक निविदा प्रक्रियेनंतर यशस्वी निविदादार म्हणून या कंपनीची निवड करण्यात आली आहे.

जुहू गल्ली झोपडपट्टी समूह पुनर्विकास प्रकल्प हा मुंबईतील आजवरच्या सर्वात मोठ्या झोपडपट्टी समूह पुनर्विकास प्रकल्पांपैकी एक मानला जात आहे. १०१.३६ एकर क्षेत्रफळावर हा प्रकल्प उभारण्यात येणार आहे. यामध्ये २८ हजारांहून अधिक पात्र झोपडपट्टीधारकांसाठी पुनर्वसन घरे उपलब्ध केली जाणार आहेत. या निविदा प्रक्रियेत रिलायन्ससह जेएसडब्ल्यू आणि शापूरजी पालनजी यांच्यासारख्या देशातील दिग्गज कंपन्यांनी सहभाग घेतला होता. राज्य सरकारच्या समूह पुनर्विकास धोरणांतर्गत हा प्रकल्प राबविण्यात येत आहे. यशस्वी निविदादाराला झोपडपट्टीधारकांचे प्रलंबित भाडे तसेच पुढील दोन वर्षांसाठी सुमारे ७०० कोटी रुपयांच्या संक्रमणकालीन भाडे देयकांची हमी एसआरएकडे जमा करावी लागणार आहे. त्याव्यतिरिक्त आणखी एका वर्षाच्या भाड्याची रक्कम पोस्ट-डेटेड चेकच्या स्वरुपात जमा करावी लागणार आहे.

## पतंजलीवरील धाडसत्राला स्थगिती राज्य सरकारची हायकोर्टात माहिती


■ मुंबई

**आयुर्वेदिक** औषधांच्या जाहिरातींमध्ये दिशाभूल करणारे दावे केल्याप्रकरणी राज्य सरकारने पतंजली आयुर्वेद लिमिटेड आणि दिव्या फार्मसी यांच्याविरुद्ध सुरू केलेल्या धाडसत्राला न्यायालयाचा पुढील आदेश येईपर्यंत सरकारने स्थगिती दिली आहे, अशी माहिती राज्य सरकारच्या वतीने मुंबई उच्च न्यायालयात देण्यात आली.

पतंजली आयुर्वेद आणि दिव्या फार्मसी या कंपन्यांची उत्पादने असलेल्या आयुर्वेदिक औषधांच्या जाहिरातींमधून कर्करोग, मधुमेह आणि अन्य आजार कायमचे बरे करण्याचे दावे केले गेले होते. त्यावर आक्षेप घेत राज्य सरकारच्या अन्न आणि औषध प्रशासनाने या कंपन्यांविरुद्ध धाडसत्र सुरू केले होते.

सरकारच्या या कारवाईला पतंजली आणि दिव्या फार्मसी या कंपन्यांनी रिट याचिकेद्वारे आव्हान दिले. अशा प्रकारचे दावे जाहिरातीत करणे ही आयुर्वेदिक औषधांच्या क्षेत्रात सामान्य गोष्ट आहे. सर्व कंपन्या अशा जाहिराती करतात. त्यामुळे आमच्या जाहिरातींना आक्षेप घेऊन केली जात असलेली कारवाई ही बेकादेशीर आहे, असा युक्तिवाद या कंपनीच्या वतीने करण्यात आला.

न्या. रवींद्र घुगे आणि न्या. गौतम अंखड यांच्या संयुक्त खंडपीठासमोर या याचिकेवर सुनावणी झाली.



## महाराष्ट्रात पाणीटंचाईची चाहूल मुंबईत फक्त १२ टक्के साठा

■ मुंबई

**राज्यात** यंदा मान्सून उशिरा दाखल होत असल्याने पाणीटंचाईचे संकट निर्माण होण्याची चिन्हे दिसू लागली आहेत. मुंबईला पाणीपुरवठा करणाऱ्या सात तलावांमध्ये सध्या केवळ १२ टक्के उपयुक्त पाणीसाठा शिल्लक आहे. अप्पर वैतरणा तलावातील साठा शून्यावर पोहोचला असून, महापालिकेने आधीच १० टक्के पाणीकपात केली आहे.

मराठवाड्यातील ११ प्रमुख धरणांमध्ये सरासरी केवळ ३५ टक्के पाणीसाठा शिल्लक असून, काही ठिकाणी परिस्थिती अधिक गंभीर आहे. सीना-कोळेगाव धरणात केवळ ६ टक्के पाणी उरले आहे. पावसाअभावी नवीन पाण्याची आवक थांबली असून, खरीप हंगामावर परिणाम होण्याची भीती व्यक्त होत आहे. पुणे जिल्ह्यातील चासकमान धरणातील पाणी झपाट्याने कमी होत असून, राजगुरूनगर परिसरात पाणीपुरवठ्यावर परिणाम होऊ लागला आहे. पिंपरी-चिंचवडमध्ये पवना धरणातील साठा सुमारे २२ टक्के, तर आंद्रा धरणात ३१ टक्क्यांवर आला आहे. त्यामुळे पाणीकपातीचा प्रस्तावही पुढे आला आहे. भोरमधील भाटघर धरणाने तळ गाठला असून, केवळ १० टक्के साठा उरला आहे. सोलापूर जिल्ह्यातील उजनी धरणाची पातळीही मोठ्या प्रमाणात घटली आहे. रायगड जिल्ह्यातील अनेक धरणांमध्ये १० टक्क्यांपेक्षा कमी पाणी शिल्लक असून, काही गावांमध्ये एक ते दोन दिवसाआड पाणीपुरवठा केला जात आहे. बुलडाणा आणि धुळे जिल्ह्यांमध्येही पाणीसाठा झपाट्याने घटत असून तिथेही पाणीटंचाईचे संकट उभे ठाकले आहे.




राज्यातील कुंभार समाजाच्या आर्थिक सक्षमीकरणासाठी तसेच पारंपरिक माती उद्योगाला चालना देण्यासाठी राज्य सरकारने महत्त्वाचा निर्णय घेतला आहे. कुंभार समाज, मूर्तिकार आणि विटा बनविणाऱ्या कारागिरांना वर्षाला तब्बल ७०० ब्रासपर्यंत माती आणि वाळू मोफत उपलब्ध करून देण्याचा निर्णय घेण्यात आल्याची माहिती महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिली.

## कुंभार समाजाला मोठा दिलासा वर्षाला ७०० ब्रास माती-वाळू मोफत

■ मुंबई

**या निर्णयानुसार** विटा, कौले, मडकी आणि इतर मातीच्या वस्तू तयार करण्यासाठी लागणाऱ्या वाळूवर कोणतीही रॉयल्टी आकारली जाणार नाही. आवश्यक शासकीय परवानगी घेतल्यानंतर कारागिरांना स्वखर्चाने समुद्रतळ, नदी, नाले व खाडीपात्रातून वाळू उपसा करून वाहतूक करण्याची मुभा देण्यात आली आहे. कुंभार समाजाची ही मागणी अनेक वर्षांपासून प्रलंबित होती. मुख्यमंत्री देवेंद्र



फडणवीस यांनी याबाबत समाजाला आश्वासन दिले होते. त्यानुसार मध्य प्रदेशच्या धोरणाच्या धर्तीवर महाराष्ट्रातही ही योजना लागू करण्यात आली आहे. वाढत्या कच्च्या मालाच्या खर्चामुळे अडचणीत आलेल्या पारंपरिक माती उद्योगाला या निर्णयामुळे मोठा दिलासा मिळणार असल्याचे मानले जात आहे. योजनेची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी महसूल मंत्री बावनकुळे यांनी राज्यातील सर्व जिल्हाधिकारी व तहसीलदारांना आवश्यक निर्देश दिले आहेत.

## अशोक खरातचे अश्लील व्हिडिओ २० रुपयांत परदेशात पोहोचले

■ नाशिक

**लैंगिक** शोषण प्रकरणात अटकेत असलेला भोंदू बाबा अशोक खरात याच्याशी संबंधित अश्लील व्हिडिओंची विक्री आणि प्रसार झाल्याचा आरोप महाराष्ट्र सायबर पोलिसांनी केला आहे. अधिकाऱ्यांनी सांगितले की, खरात यांच्या केबिनमध्ये चित्रीत करण्यात आलेले कथित व्हिडिओ सोशल मीडिया आणि मेसेजिंग प्लॅटफॉर्मद्वारे अवघ्या २० रुपयांमध्ये विकले जात होते. हे व्हिडिओ केवळ महाराष्ट्रातच नव्हे तर २१ राज्य आणि केंद्रशासित प्रदेशांमध्येही प्रसारित झाले आहेत. ते संयुक्त अरब अमिराती, श्रीलंका, फिलिपिन्स आणि नायजेरिया यांसारख्या परदेशांत पोहोचल्याचे समोर आले आहे.

या प्रकरणाशी संबंधित ४०६ आक्षेपार्ह पोस्ट, व्हिडिओ आणि छायाचित्रे विविध ऑनलाईन प्लॅटफॉर्मवरून हटवण्यात आली आहेत. महाराष्ट्र सायबर पोलिसांनी ७४ टेलिग्राम गटांची आणि सोशल मीडिया खात्यांची ओळख पटवली आहे. सायबर पोलिसांनी ११ सोशल मीडिया मध्यस्थ संस्थांना नोटिसा बजावल्या असून, २५ खात्यांकडून उत्तरे प्राप्त झाली आहेत. या व्हिडिओंच्या प्रसाराशी संबंधित एका संशयिताची ओळख पटली असून, त्याची पडताळणी सुरू आहे.